TIGHT BINDING

UNIVERSAL LIBRARY
OU_192143
UNIVERSAL LIBRARY

भूगोलावरील

# कांहीं विचित्र प्राणी

लेखक—

**वि० आ० मोडक**

भूगोलविषयाचे अध्यापक,

( अध्यापिकाशाला आणि महिलाश्रम हायस्कूल, हिंगणें. )

सन १९३१

**किंमत १ रुपया.**

प्रकाशक व मुद्रक
रा० रा० शंकर नरहर जोशी, चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव पेठ, पुणें.
[ सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन ]

# भूगोलावरील कांहीं विचित्र प्राणी

## अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| १. उत्तर-ध्रुव-प्रदेश .... .... .... | १ |
| २. सूचिपर्णी—जंगलाचा प्रदेश ... .... | २४ |
| ३. सूचिपर्णी—जंगलाच्या दक्षिणेकडील अरण्यें आणि गवताळ प्रदेश .... .... | ४२ |
| ४. वाळवंटाचे, तुरळक गवताचे आणि कांटेरी झुडुपांचे प्रदेश .... .... .... | ६८ |
| ५. उष्णकटिबंधांतील घनदाट अरण्यें .... | ८९ |
| ६. दक्षिण-आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि इतर बेटें | ११८ |
| ७. दक्षिण-अमेरिका ( पूर्वार्ध ) ... .... | १२६ |
| ८. दक्षिण-अमेरिका ( उत्तरार्ध ) .... .... | १५२ |

# Foreword.

Children are children. They do not look at the world with the eyes of an adult. Their interests are different from those of their elders including teachers. These simple facts have too often been ignored in dealing with children. They have too long been treated as 'little men'. Their books have been mostly abridgments o books intended for grown-ups. The results have been disastrous. The child-mind, unable to assimilate the intellectual food presented to it, often develops a distaste for all learning. True as this is for all branches of knowledge it has been truer still in the case of Geography.

Books on Geography written for adolescent children–a decade ago–were so many juvenile gazetteers. Even at the present day books are on the market which have not yet lost their gazetteer characteristics. In the meantime the movement for humanising geographical instruction has been growing in volume and momentum. During the last ten or twelve years several excellent book on human geography have been published in the English language They are human in more than one sense. They are human because they treat of human life in the world and look upon the world as the home of man. But they are human also in the sense that they have in view the needs of the human beings for whom they are written.

Unfortunately the same thing could not be said about the geography books in our vernaculars. No doubt a few geography books have been written in the different vernaculars of the Presidency but their authors, though not unmindful of the claims of human geography, have given too much of geography–ands too little of human elements. Seldom, if ever, do they show any consideration for the 'human beings' for whom the books are intended.

The outlook of the present book is different. The view-point is that of the little human being who is to read the book. This world of ours is a place of varieties. Its stock of things, plants, and animals is marvellous. Of these, its animals are a veritable source of wonder and amusement to the young child. Who has not watched a child taking a keen interest in the cat and the dog and other domestic animals? What parents have not been asked by their children to tell them stories of animals? It is this love of animal stories that the author of the book seeks to exploit-if one may use the word-in giving some elementary notions about animal life of the world in its different climatic zones. The language is so simple and the style is so lucid that even the dullest child will be tempted to read the book through. The author is an old 'boy' of this college and the book really grew out of a project done by him during his period of training. I am glad to find that the 'project' has assumed the shape of a book for little ones-and I venture to say, for big ones -their parents.

With these words I have great pleasure in introducing the book to the public. I trust that it will soon be found in the hands of every child who can read the Marathi language.

Secondary Training College, **R. P. Kar**

Bombay, 14th, September. 1931. Prof. of Geography & Science.

# या पुस्तकाचा इतिहास

( १ ) १९२९ सालीं " अनाथ बालिकाश्रम–हिंगणे " या आमच्या संस्थेने मला 'शिकवावे कसें' हें शिकण्याकरिता म्हणजे 'बी० टी०'च्या परीक्षेच्या अभ्यासाकरिता मुंबईस असलेल्या सरकारी 'सेकंडरी टीचर्स् ट्रेनिंग कॉलिज'मध्ये पाठविलें. या ठिकाणीं अभ्यास करणाऱ्या प्रत्येक विद्यार्थिदशेंतल्या शिक्षकाला काहीं तरी 'संकल्पित कार्य' ( Project-work ) ठरवून घेऊन तें त्याला त्या वर्षांत पुरे करावयाचें असते. होतकरू शिक्षकाला त्याच्या विशेष आवडीच्या अशा आणि म्हणूनच विशेष अभ्यासाकरिता पसंत केलेल्या एखाद्या विषयांत शक्य तितकें प्रावीण्य मिळवावयाचे असून त्याचे वर्षांत पुरे करावयाचें 'संकल्पित कार्य' हि याच विषयासंबंधीं असतें.

( २ ) मीं 'भूगोल' हा विषय माझ्या विशेष आवडीचा म्हणून पसंत केला. कारण मीं या विषयाचा पूर्वी स्वतंत्रपणें बराच अभ्यास केला होता. हा विषय जे होतकरू शिक्षक पसंत करतात, त्यांना तेथील परंपरेला अनुसरून एखाद्या देशाचा 'उठावाचा नकाशा' तयार करून त्यासंबंधींच बाल-वाङ्मयाला शोभेल अशा भाषेत चित्रे, नकाशे, तक्ते, आराखडे, कोष्टकें, इत्यादिकाच्या साहाय्यानें विषय विशद होईल अशा तऱ्हेनें मानवी-भूगोलास प्राधान्य देऊन, एखादी चोपडी लिहावयाची असते. ही चोपडी इंग्रजी भाषेतच लिहिली जात असे. या परंपरेला सोडून मीं दोन गोष्टी करण्याचा निश्चय केला; आणि हा माझा निश्चय त्या वेळचे प्रिन्सिपल **प्रो० आर० पी० कार** ( ज्यानीं माझ्या या पुस्तकाला थोडक्यात पण सुंदर आणि मार्मिक अशी प्रस्तावना लिहून मला उपकृत करून ठेविलें आहे,) यांच्या अनुमतीनेंच मीं तडीस नेला. पहिली गोष्ट म्हणजे ज्यानें त्याने उठावे आणि एकाद्या देशाचा 'उठावाचा नकाशा' तयार करावा ही परंपरा मीं मोडली. मी म्हटले, " 'उठावाचा नकाशा' करणें हें एकच 'संकल्पित कार्य' होऊं शकतें कीं काय ? याच्याच तोडीचें दुसरें एकादे 'संकल्पित कार्य' मीं करून दाखविल्यास आपण ते मान्य कराल कीं

नाहीं ? ‘ उठावाचा नकाशा ’ करणें हे अवश्यच असल्यास मी माझ्या संस्थेच्या शाळेंत ( महिलाश्रमांत ) हिंदुस्थानाचा भला मोठा म्हणजे बारा फूट लांब व बारा फूट रुंद एवढ्या आकाराचा, चुना, विटा, आणि सिमेंट या वस्तूंचा उपयोग करून केला आहे, तो इथें परीक्षेकरिता दाखविण्यास मला आणिता येणार नाहीं हें खरें; तरी पण तो ‘ उठावाचा नकाशा ’ मींच केला आहे याची खात्री मी आपणास हवी तर पटवून देईन. म्हणून मला दुसरें एकादे ‘ संकल्पित कार्य ’ करूं द्या. कारण शिक्षण–शास्त्रांत सागितल्याप्रमाणें स्वयंस्फूर्तीने केलेले कार्यच जास्त उत्साहाने होत असल्यामुळें तें चागलें वठते. ” ही माझी विचारसरणी प्रिन्सिपलना पटून त्यानी मला मोठ्या आनंदानेच दुसऱ्या प्रकारचे एकादे ‘ संकल्पित कार्य ’ करण्यास अनुमति दिली.

( ३ ) मला आणखी एक गोष्ट करावयाची होती. ती म्हणजे ‘ संकल्पित कार्या ’संबंधी जी चोपडी लिहिली जाई ती इंग्रजीत लिहिण्याऐवजी मराठींत लिहिणे ही होय. पहिल्या गोष्टींत मला यश आले होते; आणि प्रिन्सिपल याची खात्री पटवून दिल्यास परंपरा मोडण्यासहि ते अनुमति देतात हें मला कळून आले होतें; म्हणून दुसऱ्याहि गोष्टींत मी त्याची अनुमति मिळविण्याचे ठरविले. कांहीं दिवसानीं पुन्हा त्याची गाठ घेऊन मीं त्याना म्हटलें,–“ जी चोपडी माझ्या ‘ संकल्पित कार्या ’संबंधीं मला लिहावयाची आहे ती बालवाङ्मयाला शोभेल अशा स्वभाषेत मला चागल्या प्रकारें लिहिता येईल कीं परभाषेत लिहितां येईल ? आणि जी चोपडी मी लिहीन ती इंग्लंडातल्या मुलाकरिता कीं महाराष्ट्रातील मुलाकरिता ? महाराष्ट्रातील मनुष्याने लिहिलेली चोपडी इंग्लंडातील मुलाच्या हाती देण्याइतके इंग्लंडांतील लोक काही वेडे नाहींत खास. मग आमच्या मुलानीं हे वाङ्मय वाचावें अशी जर खरोखर इच्छा असेल, तर ती माझ्या मातृभाषेंतच लिहिलेली निदान मला तरी आवडेल. ” प्रिन्सिपलनी मला अडविण्याकरितां विचारलें. “ ती चोपडी इथेच ठेवावयाची आहे ना ? परीक्षेकरितां लिहिलेली चोपडी इथेंच शिक्षक-गण ठेवून जात असतात. ” मीं म्हटलें,–“ कां ? मीं लिहिलेली चोपडी परीक्षेनंतर मला घेऊन जाण्यास काय हरकत आहे ? ती कांहीं कॉलेजची हक्काची वस्तु होऊं शकत नाहीं ना ? ” त्यावर “ तसें कांहीं नाहीं, पण– ” प्रिन्सिपल म्हणाले. “ माझ्या मातृभाषेंतून लिहिणें हें तत्त्व

आपणांस पटतें कीं नाहीं ?" मी पुन्हां प्रश्न केला. "बरं. कांहीं हरकत नाहीं: **प्रो० साने** आपली चोपडी वाचून पाहतील" **प्रि० कार** यांनी म्हटलें. नंतर "आपला मी अत्यंत आभारी आहें" असें म्हणून पडत्या फळाची आज्ञा मान्य करूनच मी तेथून निघालों.

(४) **प्रो० ए० एन्० साने** (भूगोल-विषयाचे आणि इंग्रजी-विषयाचे अध्यापक) याची मला या कामांत अगदीं पहिल्यापासून मदत झाली, हें येथें मला कृतज्ञतापूर्वक सांगणें अवश्य आहे. किंबहुना त्याच्या मदतीशिवाय मला या कामीं आलेलं यश आलेंहि नसते. असो. माझ्या 'संकलिपत कार्या'साठीं **भूगोलावरील कांहीं विचित्र प्राणी** हा विषय मी निवडला. हाच विषय मी कां निवडला याचें थोडक्यात कारण असें – एकदा मी पाठ देत असतांना वर्गाला एक चित्र दाखविण्याचा प्रसंग आला. मी आणलेलें चित्र लहान असल्यामुळे सर्व मुलांना तें चित्र दाखवावयास मला थोडासा वेळ जास्त लागला. लगेच या दोषाची नोंद होऊन तो दोष माझ्या नजरेस **प्रो० साने** यानीं आणिला. तेव्हांपासून कोणतेंहि वर्गास दाखविण्याचें चित्र मोठेंच असावें असें मीं मनाशीं ठरविले. माझे पुढचे लागोपाठ असलेले पाठ ध्रुव-प्रदेशातील प्राण्यांसंबंधीच असल्यामुळे मी असलीं चित्रें मोठ्या आकाराचीं मिळतात का हें पाहूं लागलों; पण तशीं मनाजोगीं चित्रे कोठें मिळेनात. शिवाय चित्रे शोधण्यांत वेळ जास्त जाऊं लागला. तेव्हा 'आपणच तशी चित्रें का काढूं नयेत?' असा माझ्या मनालाच मी प्रश्न केला. मी मनापासून चित्रे काढूं लागलो आणि मला माझें काम भागेलसें वाटले. हीं माझी चित्रें **प्रिन्सिपल कार** यांना आणि **प्रो० साने** व इतर अध्यापक यांनाहि फार पसंत पडूं लागली. कलेच्या दृष्टीनें ती फार सुबक होतीं म्हणून नव्हे, तर वर्गांतील मुलाच्या मनावर परिणामकरणारीं होतीं या दृष्टीनें. असो. इतर कटिबंधांतील प्राण्यांचीं चित्रें काढून या सर्व प्राण्यांच्या चित्रासंबंधींच भौगोलिक पार्श्वभूमि घेऊन 'संकलिपत कार्य' करावें, आणि त्याच्या अनुरोधानेंच प्राण्यांबद्दल भौगोलिक विषयासंबंधीं बालवाङ्मय लिहावें असें मीं ठरविलें. आणि मीं माझा बेत **प्रि० कार** आणि **प्रो० साने** या दोघांनाहि कळविला. माझीं चित्रे त्यांना आवडलीं होतींच, तेव्हां या गोष्टीस दोघांनींहि पसंति दर्शविली.

( ५ ) सर्व चित्रें काढून झाल्यानंतर आज जी माहिती मी पुस्तकरूपानें प्रसिद्ध करीत आहें, ती मीं लिहून काढिली. ती सर्वस्वी **प्रो० साने** यांना आवडल्यामुळें त्यांनीं या माझ्या ' कार्या'बद्दल प्रिन्सिपल यांजपाशीं प्रशंसा केली. त्यांना ती माहिती फारच आवडली व ते मला म्हणाले, " I say, Mr. Modak, you must get it printed anyhow." यावर "हा पैशाचा प्रश्न आहे. पुढें-मागे जमल्यास मी खात्रीपूर्वक ही चोपडी पुस्तक म्हणून प्रसिद्ध करीन" असे मी त्याना गुळमुळीतच उत्तर दिलें, आणि परीक्षा झाल्यानंतर मी पुन्हां हिंगण्यास आलों.

( ६ ) हिंगण्यास गुरुवर्य **अण्णा कर्वे** यांनीं स्थापिलेला " **अनाथ-बालिकाश्रम** " अखिल भरतखंडात सध्यां तरी प्रसिद्ध आहेच. याच आश्रमाच्या ठिकाणीं माझे गुरुसम गुरुबंधु, व्यवसायबंधु आणि परम ज्ञानवृद्ध स्नेही, प्रसिद्ध वाङ्मयभक्त **प्रो० वा० म० जोशी** यानीं वाङ्मययज्ञ अखंड चालू ठेविला आहे. त्याच्या सान्निध्यामुळेच " कवीचेनि मतिप्रकाश, कवित्वास होय " या समर्थांच्या उक्तीप्रमाणें तेथील त्यांच्या सहवासांत येणाऱ्या शिक्षकांमध्ये वाङ्मय-निर्मितीची पात्रता येऊं लागल्यास ती गोष्ट अनुरूपच होय. एखाद्या श्रेष्ठ कवींच्या तेजोमंडळात येणारे रसिक भक्त स्वतः कमी-अधिक कवि या संज्ञेस पात्र होतात हें जरी खरें असलें, तरी **प्रो० वा० म० जोशी** त्याच्या वाङ्मययज्ञाभोंवतीं जमलेल्या शिक्षकांचे तसें नाहीं, हें एक या क्षेत्राचे विशेष होय. वाङ्मय पाहिजे पण ते सर्व प्रकारचे पाहिजे, असें या काव्य-शास्त्र-विनोद-रसिक भक्ताचे मत आहे. म्हणून ज्याला ज्या क्षेत्रांत वाङ्मय लिहिण्याची आवड असेल त्यानें त्या क्षेत्रांत वाङ्मय निर्माण करावें, असें येथील त्यांच्या वाङ्मययज्ञाभोवतीं जमलेल्या भक्तांस त्यांचें सांगणे असते. या त्यांच्या शिकवणुकीला अनुसरूनच, **प्रो० मायदेव** आणि **डॉ० कमलाबाई देशपांडे** हे कवि आणि कवयित्री म्हणून, **श्री० मोने** हे व्याकरणकार म्हणून, **प्रि० पटवर्धन** हे नांवाजलेले भौगोलिक बालवाङ्मय-लेखक म्हणून आणि **प्रो० भा० धों० कर्वे** हे शिक्षणशास्त्र-वाङ्मय-प्रकाशक आणि लेखक म्हणून पुढें येत आहेत. मीहि **प्रो० जोशी** यांनींच प्रोत्साहन दिल्यामुळें **प्रि० कार** यांना गुळमुळीत असें दिलेलें वचन पूर्ण करण्यास समर्थ होऊं शकलों. **प्रो० जोशी** यांचें वाङ्मय

वाचून दूरस्थ लोकाना सुद्धां जर वाङ्मयस्फूर्ति होते, तर त्यांच्या अखंड सान्निध्यात असलेल्या लोकांना स्फूर्ति का होऊं नये, असा प्रश्न येईल खरा; पण दिव्याखालीं अंधेर नसतोच असेंहि नाहीं !

( ७ ) चोपडीचे पुस्तक छापावयाचें हें ठरलें. पण पुढें काय ? यावेळीं **रा० मो० स० मोने** शिक्षक-अध्यापिका शाळा हिंगणें ह्यानीं जर पुढाकार घेऊन आपुलकीच्या भावानें ' पुस्तक प्रसिद्ध कराच ' असा आग्रह धरिला नसता, आणि एथील चित्रशाळेचे चालक **रा० शंकर नरहर जोशी** याची आणि माझी मुलाखत घडवून आणून लेखक आणि प्रकाशक असे आमचें परस्पर नाते जुळवून दिले नसतें, तर पैशाच्या अभावीं हें पुस्तक-प्रकाशन-कार्य आणखी किती दिवस लांबणीवर पडलें असतें हें सागता येत नाहीं. चित्रशाळेच्या चालकानीं तें प्रेमपूर्वकच दत्तक घेतलें; आणि म्हणून स्वाभाविकपणेच ते जगापुढे अंतरर्बाह्य सुंदर तऱ्हेनें नटवून-सजवून आणण्याकरिता त्यानीं मला आनंदानें पूर्ण मोकळीक दिली. जन्मदाता आणि दत्तक-पिता अशा आम्हा दोघानाहि वात्सल्यामुळें पुस्तकाच्या सुरेख स्वरूपाबद्दल सहजानंदच होत आहे. या पुस्तकात एकंदर ८० मोठीं व सुबक चित्रे आणि नकाशे प्रकाशकानीं कोणतीहि काटकसर न करिता घातलीं आहेत, हें कोणासहि दिसून येईल.

( ८ ) माझ्या चोपडीची हस्तलिखित प्रत लिहून देण्याचें कंटाळवाणें काम माझे नूतन स्नेही रा० रा० मेडे ( शिक्षक-श्री० ना० दा० ठा० कन्याशाळा-मुंबई,) यानी स्वयंस्फूर्तीने आणि आनंदानें आपल्या सुंदर हस्ताक्षरात करून दिलें याबद्दल मी त्याचा मनापासून आभारी आहें. त्याचप्रमाणें प्रुफें तपासण्याच्या किचकट कामीं रा० रा० मोने यानीं आपण होऊन मदत केली. ती त्यानीं केली नसती तर माझें पुस्तक इतक्या शुद्ध स्वरूपात खात्रीनें निघाले नसते, हेहि सांगणे अवश्य आहे.

( ९ ) हे पुस्तक मराठी चवथीपासून इंग्रजी चवथीपर्यंत शिकत असलेल्या मुलांमुलींना निरनिराळ्या दृष्टीनें उपयुक्त व्हावें अशी माझी अपेक्षा आहे. तसें ते खरोखरच उपयुक्त ठरल्यास मी श्रेयाला पात्र होईन, नाहीं तर दोषांचा धनी मी आहेंच.

(१०) जातां जातां मला एक गोष्ट बी० टी० होऊं इच्छिणाऱ्या शिक्षकांना सुचवावीशी वाटते. यांना एकादें तरी 'संकल्पित कार्य' करावें लागतेंच. यासंबंधीं त्यांना जी माहितीची चोपडी लिहावी लागते, ती त्यांनीं आपल्या मातृभाषेंत लिहून पुढें-मागें पुस्तकरूपानें ती प्रसिद्ध करावी, म्हणजे आपोआप आपलें वाङ्मय अनेक विषयांत वाढल्याशिवाय राहणार नाहीं. मातृभाषेची ही सेवाच नव्हे का?

पुन्हां एकदां ज्या ज्या सद्गृहस्थांनीं मला उत्साह देऊन आणि प्रत्यक्ष दगदग सोसून अनेक तऱ्हांनीं मदत केली, त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानून हा माझ्या पुस्तकाचा इतिहास मी पुरा करतों.

महिलाश्रम, हिंगणे.
अनंतचतुर्दशी, शके १८५३.

**वि० आ० मोडक.**

# अभिप्रायः—

## (१) " भूगोलावरील कांहीं विचित्र प्राणी. "

[ले०:-व्ही. प. मोडक, हिंगणे ]

भूतलावर निरनिराळ्या हवामानामध्यें जे निरनिराळे प्राणी राहतात त्यांची रहाणी व उपयोग याची मनोरंजक माहिती या पुस्तकांत दिली आहे. भूगोलामधील सीमा, नद्यांचीं नांवें किंवा पर्वतांची उंची वगैरे गोष्टी विद्यार्थ्यांना कंटाळवाण्या वाटतात; पण भौगोलिक परिस्थितीमध्ये राहणाऱ्या प्राण्यांची माहिती फार मनोरंजक व उपयुक्त होणार आहे. या दृष्टीनें असलीं पुस्तकें फार महत्त्वाचीं आहेत. सुंदर चित्रे घातल्यामुळें पुस्तकाला फार मोहकपणा आला आहे. मराठी-वाङ्मयांत असल्या पुस्तकाचा भरणा जवळ जवळ नाही म्हटलें तरी चालेल. पहिल्या भौगोलिक परिषदेला अभ्यासक्रम आखतांना असल्या पुस्तकांची उणीव फार भासली. पण रा० मोडक यानीं हें पुस्तक लिहून ती अडचण दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. असल्या प्रकारचीं आणखी पुस्तकें त्यांच्याकडून लिहिली जावोत !

ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन्, पुणे. } S. R. Tawde. प्रिंन्सिपॉल.

---

(२) भूगोल-विषयांत आजपर्यंत माणसांना मज्जाव होता. 'नवीन शिक्षणां'त ही बंदी उठली. आणि 'पुस्तकी' भूगोलाच्या उजाड ओसाडीतून माणसांची रहदारी सुरू झाली. मोकळ्या मैदानांतून नद्यांचें पाणी नुसतेंच वाहून चाललें होतें तें कांठच्या दाट वस्तीच्या कामीं लागूं लागलें. दंतुर किनाऱ्याचे भागीं बंदराची उठावण झाली. माणसांना मिळालेल्या या सवलतीचा फायदा पशुपक्ष्यादि प्राण्यांना मिळावा हें साहजिकच आहे. वास्तविक त्यांचा वारसा आधींचा; पण जिथें माणसांचाच पाड नव्हता तिथें बिचाऱ्या पशूंची काय कथा? आतांपर्यंत मराठींत नवीन कल्पनानुसार जी भूगोलासंबंधी पुस्तकें लिहिण्यांत आलेलीं आहेत त्यांत निरनिराळ्या देशांतील आपल्या द्विपाद भाऊबंदाचा समा-

चार घेण्यांत आलेला आहे. ( आणि तो वाजवीपेक्षां फारच घेतला जात आहे अशी भीति वाटते ! ) तथापि आपल्या न बोलक्या चतुष्पाद भाऊबंदांची स्थिति मात्र श्रीमंतांच्या घरीं उतरणाऱ्या लाजाळू पाहुण्याप्रमाणें झालेली आहे. त्यांची योग्य वास्तपूस्त करून दाद लावण्याचे कामीं माझे मित्र श्री. मोडक यांनी जी मार्मिक समयसूचकता व दक्षता दाखविली याबद्दल या सर्व प्राण्यांतर्फे ( त्यांना आपली कृतज्ञता व्यक्त करण्याचे साधन नसल्यामुळें ) श्री. मोडक यांचे मराठी वाचकांनीं आभार मानावयास पाहिजेत. मराठींत अशा तऱ्हेचें हे पहिलेंच पुस्तक आहे. नेहमीं दिसणाऱ्या पशुपक्ष्यासंबंधीं देखील मुलांना किती कौतुहल असतें ? मग भूगोलाच्या निरनिराळया प्रदेशांतून राहणाऱ्या अपरिचित प्राण्याची अद्भुत माहिती वाचून त्यांची जिज्ञासा किती तीव्रतेनें जागृत होईल तें सांगावयास नको. प्राण्याची वर्गवारी नैसर्गिक विभागाच्या क्रमानें लावली असल्यामुळें त्या त्या विभागांतील हवा, पाणी, वनस्पति इत्यादि उपयुक्त माहिती मुलांना जातां जातां मिळते, व त्याबद्दल एऱ्हवीं वाटणारा रुक्षपणा मनोरंजक संदर्भानें नाहींसा होतो. प्रेमळ व विनोदी कौटुंबिक संवादाच्या भूमिकेवर ही माहिती दिलेली असल्याकारणानें ती मुलांच्या सहजच आहारीं पडेल. जागोजाग परिचित गोष्टींची सांगड घालण्याचा प्रयत्न केला आहे तो योग्य आहे. भाषा सोपी व सुगम आहे. क्वचित् स्थळीं ध्रुव-ससा, कस्तूरी-बैल, वई-डुक्कर असे इंग्रजी प्राणीवाचक नामांचें केलेलें भाषांतर गंगा-जमनी वाटतें. तथापि ती गौण बाब आहे. पुस्तकात चित्राची खुल्या हातानीं खैरात झाली असल्यामुळे शाब्दिक वर्णन वाचण्याचा धीर नसणाऱ्या मुलांचीहि चांगलीच सोय झाली आहे. थोडक्यांत पुष्कळ सांगावयाचें म्हणजे श्री. मोडक यांनीं ही छोटी ‘ राणीची बाग ’च मराठी बालवाचकांच्या हातीं दिली आहे. आतां आमचे चिमुकले बाबालोग मुंबईला जाण्याचा फारसा हट्ट करणार नाहीत. आणि कंजुष वडिलांना मुंबईच्या प्रवास-खर्चापेक्षां या पुस्तकाची किंमत अधिक परवडेल हें सांगावयास पाहिजे असें नाहीं.

ता. २०-९-३१

**प्रल्हाद केशव अत्रे,**
बी. ए., बी. टी., टी. डी., ( लंडन ).
प्रिन्सिपॉल, सेकंडरी ट्रेनिंग डिपार्टमेंट, पुणें.

भूगोलावरील

# कांहीं विचित्र प्राणी

## (१) उत्तर-ध्रुवप्रदेशांतील प्राणी

नरकचतुर्दशीच्या दिवशीं अभ्यंगस्नानानिमित्त वसंत व शरद् यांना लवकर उठावें लागल्यामुळें गुलाबी थंडीची किंचित् चुणूक त्यांना जाणवली. पण फटाकड्या व फराळ यांच्या आनंदामुळें त्या थंडीचें त्यांना फारसें वाटलें नाहीं. दिवाळीचे दिवस संपले व थंडीहि जास्त कडक पडूं लागली. रमाबाईहि, अभ्यंगस्नानें, फराळ, पंचपक्वान्नें, भाऊबीज, ओवाळणी, इत्यादि इत्यादि आनंदमय कार्यक्रमांतून आतां मोकळ्या झाल्या होत्या; त्यामुळें आपले पति माधवराव यांना या खेपेच्या थंडीच्या निवारणार्थ मुलांना व उभयतांना काय काय कपडे घ्यावयास पाहिजेत याबद्दलचा सल्ला देण्यास त्यांना फावलें. त्यांनीं त्यांच्यापाशीं एक दिवस हळूच गोष्ट काढून ऊबदार कपडे आणण्याबद्दलची प्रस्तावना केली. माधवराव हे सुखवस्तु तर होतेच, पण आपल्या पत्नीची व मुलांची हौस भागविण्यास ते सदा उत्सुक असल्यामुळें त्यांनीं त्याच दिवशीं बुधवारांत जाऊन निरनिराळ्या प्रकारचे लोकरीचे कपडे खरेदी करून आणिले. त्यामुळें मुलांनाहि मजा वाटली.

कार्तिकी पौर्णिमेच्या दिवशीं पिठासारखें स्वच्छ चांदणें पडल्यामुळें व संध्याकाळचीं जेवणें आटोपल्यामुळें माधवराव मुलांना घेऊन घरापुढील टुमदार बागेंत ठेवलेल्या आरामखुर्चीवर जाऊन गप्पागोष्टी करीत बसले. घरांतील थोडेंबहुत काम आटोपून रमाबाईहि पानांचा

डबा घेऊन तेथें आल्या. हवेंतील थंडी वाढत होती म्हणून त्या मुलांना म्हणाल्या, " बाळ शरद्, वसंत, आंत जाऊन निजा पाहूं. आतां दिवाळीची सुट्टी संपली. उद्यांपासून तुमची शाळा सुरू आहेना ? हा पहा गारठाहि वाढूं लागला आहे. आपले आंत जाऊन ऊबदार अशा बिछान्यांत निजा कसे पाहूं ? "

" आई, मला मुळींच थंडी वाजत नाहीं ग ! आणि आतां कुठें सात वाजताहेत. उद्यांचा अभ्यासहि नाहीं. " वसंत आपल्या आईचें बोलणें खोडून काढण्याकरितां म्हणाला.

" आई, चांदणें किती सुरेख पडलें आहे; आणि आमच्या आंगांत किती मजेदार आणि ऊबदार कपडे आहेत; मग थंडी वाजायला काय ग झालं ? बिछान्यावर पडून आम्हांला आतां काय झोंपा येणार आहेत ? " शरद् ठसक्यांत म्हणाली.

" का आहे ना मुलांचें निरुत्तर करणारें उत्तर ? त्यांना त्यांच्या मनाप्रमाणें करूं दे. मला कीं नाहीं, मुलांना अगदीं मोकळें सोडावें असेंच वाटतें. आपलीं मतें त्यांच्यावर लादावीं कशाला ?.................... थंडी वाजली, झोंप आली, तर मुकाट्यानें तींच आंत जातील आणि निजतील. आपल्याला कांहीं त्यांना सांगावें लागणार नाहीं. " माधवराव हंसत हंसत म्हणाले.

" अशानेंच तीं मुलें माझें ऐकेनातशीं होतात हो. तुम्हींच त्यांना शेफारून ठेवतां. " रमाबाई किंचित् विनोद व किंचित् राग ज्यांत आहे अशा आविर्भावानें म्हणाल्या.

" बरं तें असूं दे, पण कायरे वसंत, तुला तुझे गरम कपडे कसे काय आवडले रे ?" माधवराव विषय बदलण्याच्या उद्देशानें म्हणाले.

" अण्णा, ते फारच छान आहेत हो. रंग किती मजेदार ! किती मऊ आणि ऊबदारहि तसेच आहेत. अगदीं खरोखरच्या पेटींत बसल्यासारखें वाटतें. पण बाबा, ते कशाचे केलेले आहेत हो ? "

" हात्तेच्या ! अरे वेड्या, लोकरीचे ! एवढें का तुला समजत नाहीं ? आणि म्हणे चवथींत आहे ! मला बाईनीं सांगितलें आहे कीं, ऊबदार कपडे लोकरीचे असतात म्हणून. " शरद् वसंतला चिडविण्याच्या उद्देशानें हेल काढून म्हणाली. तेव्हां रमाबाईंना मुलींचें कौतुक वाटून हसूं आलें व इतका वेळ त्या विडा करीत उभ्या होत्या त्या आतां एका खुर्चीवर बसल्या.

" अग वेडे शरटूले, मला का एवढें माहीत नाहीं ? पण कसली लोकर ? कोणत्या प्राण्याची ? आहे तुला माहीत ? " वसंत तिच्या अंगावर गुरगुरून म्हणाला. " सांग, सांग ग, तुला माहीत असलें तर. "

" अरे, मेंढीची लोकर. " शरद् शांतपणें म्हणाली.

" म्हणे मेंढीची ! " वसंत वेडावून म्हणाला.

माधवराव आपल्या मुलांचा हा संवाद मोठ्या गमतीनें ऐकत होते. आतां ह्या प्रकरणाचें रूपांतर भांडणांत होणार हें पाहून ते म्हणाले, " बाळ शरद्, तुझंहि थोडें खरं आहे; पण लोकर कांहीं एकाच प्राण्याला नसते. वसंत, ती लहान आहेना ? तिनें आपल्या वयाप्रमाणें सांगितलें, त्यांत रागवावयाला काय झालें ? बरी आठ-वण झाली. मुलांनो, तुम्हांला झोंपा येत नाहींतना, बरं आहे. वसंत, जारे, कालच मीं " **भूगोलावरील कांहीं विचित्र प्राणी** " या नांवाचें सुरेखशा चित्रांचें एक पुस्तक आणिलें आहे, तें माझ्या कपाटावरच आहे, तें घेऊन ये पाहूं ? त्याच्यावरून तुम्हांला पुष्कळ केसाळ प्राण्यांची आज मी माहिती करून देईन. तुलाहि, पुष्कळ गम्मत वाटेल बरं. " माधवराव शेवटचें वाक्य आपल्या पत्नीला उद्देशून म्हणाले.

" मग आजची सारी रात्र चित्रें पाहण्यांतच घालविणार वाटतें? " रमाबाई विनोदानेंच म्हणाल्या.

वसंत हें बोलणें ऐकावयास तेथें नव्हताच. शरद्‌ही त्याच्या मागोमाग गेली होती. पण ती आंत जाण्याच्या आंतच वसंतानें तें सुंदर पुस्तक टेबलावर आणून ठेवलें सुद्धां !

" अय्या! किती छान पुस्तक आहे हें ! " शरद् उद्गारली व तें घेण्याकरितां तिनें हात पुढें केला.

" हो, तुम्हांला मी आतां तेंच दाखविणार आहें, जरा सबूर. " माधवराव म्हणाले.

नंतर माधवरावांनीं एक दिवाहि गड्याकडून मागवून घेतला. टेबलावर दिवा ठेवून गडी निघून गेला. त्याच्या उजेडांत तीं दोन्ही अधीर मुलें व रमाबाईहि पुस्तकांतील चित्रें निरखून पाहूं लागलीं. मुलें चित्रें एकसारखीं उलटीत होतीं आणि त्यांची गडबडहि थांबेना. तेव्हां माधवराव पुढें होऊन त्यांनीं तें पुस्तक आपल्या हातांत घेतलें व म्हणाले, " नुसतीं वेड्यासारखीं चित्रेंच काय पाहतां ? थांबा, मी तुम्हांला एक एक चित्र दाखवून त्यांची माहितीहि देतों; म्हणजे मनाची करमणूकच्या करमणूक होऊन तुम्हांला बरीच माहितीहि मिळेल. " असें म्हणून माधवरावांनीं एक एक चित्र उजेडांत धरून त्याबद्दलची पुढीलप्रमाणें मनोरंजक अशी माहिती दिली. रमाबाईंनाहि तीं चित्रें पाहून विस्मय वाटला व त्याहि लक्षपूर्वक माधवरावांनीं सांगितलेली माहिती ऐकूं लागल्या.

माधवराव म्हणाले, " हें चित्र पहा किती विलक्षण आहे ! तें '**सील**' नांवाच्या जलचर प्राण्याचें आहे. अगदीं उत्तरेकडे ' उत्तर-समुद्र ' नांवाचा एक समुद्र आहे. तेथें कडक ऊन असें कधींच पडत नाहीं. वर्षांतून त्या ठिकाणीं दोन महिनेच उन्हाळा असतो व तेथील उन्हाळा म्हणजे आपल्या उन्हाळ्यापेक्षांहि थंड असतो; पण या प्रदेशांतील लोकांना तेंच ऊन किती कडक वाटतें ! हा काळ त्यांना फारच प्रिय असतो. नेहमीं, जवळ जवळ दहा महिने, कडक थंडी.



सील ( जलसिंह )

समुद्र तर राहोच, पण जमीनसुद्धां बर्फाच्छादित असते. तेव्हां उन्हाळा सुरू झाला म्हणजे बर्फ वितळून पाण्याचे झरे वाहूं लागतात; आणि त्यावेळीं मात्र जमीन हिरव्यागार अशा अनेक प्रकारच्या शेवाळांनीं भरगच्च भरून जाते. अनेक प्रकारचीं अगदी भुईसरपट अशीं झुडपें पालवतात व त्यांना हरतऱ्हेचीं सुंदर व नाना रंगांची फुलें येतात आणि जणूं कांहीं जादूची कांडी फिरविल्याप्रमाणें सगळ्याचा सगळा प्रदेश एकजात फुलून राहतो. मात्र पुरते दोन महिने होत नाहींत तोंच सर्वत्र पुन्हां बर्फ पडूं लागतें व सगळीकडे एकसारखेंच शुभ्र पांढरें दिसूं लागतें. आतां बाहेर चांदणें पडलें आहेना, त्याप्रमाणेंच. अशा प्रदेशांत हा **सील** नांवाचा प्राणी सुखानें रहात असतो."

" पण अण्णा, तो खातो काय ? " वसंत म्हणाला.

" होय, " माधवराव म्हणाले. " तुझा प्रश्न बरोबर आहे. सगळी-कडेच बर्फ असल्यामुळें दहा महिने तेथें कांहीं-म्हणजे कांहींच-उगवत नाहीं खरें. उगवणार कसें ? जमीन मोकळी असते कुठें ? पण जरी जमि-नीच्या पृष्ठभागावरील पाणी गोठलें असलें, तरी आंतील सगळा भाग गोठलेला नसतो. आंत पाण्याची हालचाल असते व त्यांतून मासे व इतर जलचर प्राणी वावरत असतातच. हे प्राणी आपल्याहून बारक्या माशांना आणि पाण्यांत उगवणाऱ्या वनस्पतींना खाऊन आपली उपजीविका करितात. '**सील**' मासा ( त्याला " **जल-सिंह** " असेंही म्हणतात ) हा इतर माशांना खाऊन आपली उपजीविका करतो. केव्हां केव्हां ऊन खाण्याकरितां **सील** प्राण्यांचे थवेच्या थवे किनाऱ्यावर येऊन बसतात. त्यावेळी एक **पलटणच** आली आहे कीं काय असें वाटतें. त्यांना जमिनीवरूनहि चालतां येतें. "

" आई, हे पहा त्याचे पाय कसे विचित्र आहेत ते ! " शरद् म्हणाली. " असे कांहो अण्णा त्याचे पाय ? "

" त्याचे पाय त्याला दोन तऱ्हांनी उपयोगीं पडतात." माधवराव म्हणाले. " कसें तें पहा. त्याला पाण्यांत इकडून तिकडे नेहमींच फिरावें लागतें. त्यावेळीं त्याच्या पायांचा त्याला वल्ह्यांप्रमाणें उपयोग होतो; आणि तो ज्यावेळीं जमिनीवर येतो, त्यावेळी त्याला त्यामुळें चालतांहि येतें. "

" पण या प्राण्यांचा उपयोग काय ? " रमाबाई अचंबा करीत म्हणाल्या.

" हो, तेंच तर मी आतां सांगणार आहें. " माधवराव म्हणाले. " या प्राण्याला सदाच थंड प्रदेशांत रहावें लागत अस-ल्यामुळें ईश्वरानें त्याच्या अंगावर केस निर्माण केले आहेत; आणि"— माधवराव पुढें सांगणार तोंच शरद् म्हणाली, " त्यांचा उपयोग लोकरीप्रमाणेंच होतो तेंच कीं नाहीं ? "

" अग, सांगूं दे ग अण्णांना, तुझें नको मधें पुराण," वसंत त्रासिक स्वरानें म्हणाला.

" शरद्‌चें म्हणणें अगदीं बरोबर आहे." माधवराव म्हणाले. " त्यांच्या केसांचे ऊबदार कपडे तर करतातच. शिवाय त्याच्या कातड्याचे तंबू करून तेथील लोक—त्यांना '**एस्किमो**' म्हणतात—त्यांत राहतात. हिंवाळ्याचया दिवसांत मात्र या लोकांना बर्फाच्या घरांतूनच रहावें लागतें."

" म्हणजे! अगबाई एक एक विचित्रच!" रमाबाई म्हणाल्या.

" विचित्र तर खरेंच" माधवराव थोड्या गंभीर स्वरानें म्हणाले. बर्फाचे दगड इतके टणक असतात कीं ते दगडापेक्षांहि कठीण असतात. शिवाय तेथें दगड कोठें सांपडणार? जमिनीवर बर्फाचे इतके थर असतात कीं, ते काढून जमिनींतून दगड काढणें महा कर्म कठीण! शिवाय बर्फानें काम होतेंच; आणि इतर वेळीं **सील** आणि दुसरे असलेच प्राणी असतात त्यांच्या कातड्यांचे तंबू करितात. त्यांचें आंथरूणपांघरूण सर्व कांहीं **सील**च्या मऊमऊ लोकरीचेंच असतें. शिवाय या प्राण्यांच्या पोटांत चरबी असते ती खाल्ली असतां अंगांत उष्णता राहते.

" चरबी, इश्श बाई!" शरद् म्हणाली.

" अग, तुला मधें 'कॉडलिव्हर तेल' अण्णा देत होते तें काय बरें?" आपल्याला चरबी म्हणजे काय तें माहीत आहे हें दाखविण्याच्या स्वरानें वसंत म्हणाला.

" अगदीं बरोबर." वसंताला खूष करण्यासाठीच माधवराव म्हणाले. " या प्राण्याच्या प्रत्येक भागाचा या लोकांना उपयोग होतो. त्यांच्या हाडांचा, त्यांच्या कातडीचा, चरबीचा, मांसाचा आणि लोकरीचा—"

" आणखी कोणकोणते प्राणी या भागांत राहतात अण्णा?" वसंत खूष होऊन म्हणाला.

" हें पहा, दुसऱ्या एका विचित्र प्राण्याचें **चित्र.** " माधवराव **वॉलरस** प्राण्याचें चित्र दाखवीत म्हणाले.



**वॉलरस.**

" अगबाई, त्याला लांब सुळे आहेत की ! " शरद् तोंडावर हात ठेवून म्हणाली.

" आणि काय अक्राळविक्राळ त्याचें स्वरूप हें ! " रमाबाई म्हणाल्या.

" हें एक मोठें धेंडच असतें. आपण लांकडें घेतांना, असले ५६ मण किंवा जवळ जवळ तीन खंडी याचें वजन भरतें. अगदीं लोखंडानें भरल्यासारखें याचें आंग मांसानें भरगच्च भरलेलें असतें आणि म्हणून तें अति जड असतें. याची शिकार करणें फारच अवघड काम. शिकारीला जायचें म्हणजे पारध्यांना आधी आपलें सर्व शरीर दोन-दोन तीन-तीन

आंगरख्यांनी पायांच्या नखांपासून तों शेंडीच्या टोंकापर्यंत अगदीं मढवून घ्यावें लागतें. कारण तेथें इतकी थंडी; आणि बर्फांतून जावयाचें. केवळ डोळे उघडे ठेवण्याकरितां तेवढीं भोकें असतात. जर का एकादा भाग उघडा राहिला कीं, गारठून तो तुटल्यासारखाच वाटतो. बर्फ एकसारखें पडत असतेंच. डोळ्यांवरील बर्फ हातानें सारावें लागतें."

"अबब, काय थंडी हो ही!" वसंत म्हणाला.

"अरे मग जाऊन नीज." रमाबाई कोटि करण्याच्या उद्देशानें म्हणाल्या व हंसल्याहि.


"अग इथं नाही, तिथं हो." वसंत म्हणाला.

"या प्राण्याचाही उपयोग **सील**सारखाच होतो" माधवराव चित्राचें पान उलटीत म्हणाले.

"अरे हें तर **अस्वल**" वसंत म्हणाला.

"हो, आलें आहे अस्वल! **अस्वल** कधीं **पांढरें** असतें वाटतं?" शरद् हंसत हंसत म्हणाली.

"तें **अस्वलच** आहे." माधवराव जोर देऊन म्हणाले. "पुष्कळ वेळां आपली अशी खोटी समजूत असते कीं पोपट, हंस, घार, गरूड, कोल्हा, लांडगा, इत्यादि प्राण्यांचे रंग कायमचे ठरलेले असतात म्हणून; पण ईश्वरानें या रंगाच्या बाबतींत पुष्कळच गंमत केली आहे. प्राण्यांना पुष्कळ वेळां दुसऱ्या प्राण्यावर उपजीविका करावी लागते; किंवा त्यांना इतर प्राण्यांपासून आपला बचावहि करावा लागतो. तेव्हां ज्या प्रदेशांत हे प्राणी राहतात त्या प्रदेशांतील पदार्थांच्या किंवा वनस्पतींच्या रंगांप्रमाणेंच यांच्या शरीराचा रंग असतो; आणि मघाशीं सांगितल्याप्रमाणें ज्या प्राण्याची शिकार करावयाची असेल त्याच्या शेजारीं जाण्यास जसा या रंगाचा उपयोग होतो, त्याचप्रमाणें ज्या प्राण्यापासून आपला बचाव करावयाचा आहे, त्या प्राण्यापासून लपून राहण्याच्या कामीहि रंगाचा उपयोग होतो.



पांढरें अस्वल.

कसें तें पहा ? एथील सभोंवतालचा सर्व प्रदेश एकजात बर्फाच्छादित असल्यामुळें तो अगदीं शुभ्र असतो. या **अस्वलाचा** रंगहि पांढराच असल्यामुळें त्याला दबत दबत आपल्या भक्ष्याजवळ त्याच्या नकळत जातां येतें. हा **अस्वल** नेहमीं बर्फाच्छादित प्रदेशावरूनच आपलें भक्ष्य शोधीत हिंडत असतो. ”

"त्याचें भक्ष्य मी सांगूं का काय असेल तें, मासे!" शरद् म्हणाली.

"अग, मासे कसे असतील, वेडी कुठली!" वसंत म्हणाला.

"तुमचं दोघांचंहि थोडं चुकलं आहे व थोडं बरोबरहि आहे. तो **सील** प्राण्यावर आपली उपजीविका करतो. ज्यावेळीं **सील** प्राण्याचीं पिलें ऊन व हवा खाण्याकरितां किनाऱ्यावर येतात त्यावेळीं हा दबा धरून बसलेला **अस्वल** त्यांच्यावर झडप घालतो आणि मग त्यांच्या लुसलुशीत मांसावर आपली मेजवानी झोडतो."

"याच्यावरहि शुभ्र केस आहेत. त्यांचाहि उपयोग एथले लोक करीत असतील मग!" रमाबाई म्हणाल्या.


"हो, अलबत. याच टापूंत आणखी कितीतरी केसाळ प्राणी आहेत. त्या सर्वांच्या केसांचा उपयोग युरोपांतील साहेबलोक—कारण साहेबांचा देश फार थंड आहेना—फार करूं लागले आहेत."

"मग या प्राण्यांची खूपच हत्त्या होत असेल, नाहीं? आपल्या गाई नाहीं का रोज शेंकडोंवारीं खपत?" रमाबाई जरा केंविलवाण्या स्वरानें म्हणाल्या.

"होय, या प्राण्यांना पकडून आणि मारून त्यांच्या केसांचे ढीगच्या ढीग प्रतिवर्षीं युरोपाकडे रवाना होत असतात. त्याचप्रमाणें क्यानडा, आणि अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें, या देशांतील लोकहि यांचा बराच उपयोग करतात. त्यामुळें या प्राण्यांची संख्या कमी होऊं लागली आहे. पण हें पहा **देवमाशाचें चित्र.** अर्जुनाचा रथ याच माशानें गिळंकृत केला होता अशी महाभारतांत गोष्ट आहे नाहीं?" माधवराव म्हणाले.

"होय, त्या दिवशीं हरिदासांनीं खूप गंमतीनें ही गोष्ट सांगितली होती खरी." शरद् म्हणाली.

"ती गोष्ट खरी कीं खोटी काय असेल तें असो म्हणा," माधवराव म्हणाले. "मात्र हा प्राणी जगांतील सर्व प्राण्यांमध्यें



देवमासा.

अजस्र आहे खरा. कांहीं कांहीं **देवमासे** ९० फूट लांब असतात; आणि आपला जबडा त्यांनी उघडला म्हणजे एकमजली घर सहज आंत मावेल एवढें मोठें विवर त्यांच्या जबड्यांत दिसतें. हा मासा किनाऱ्यावर येत नाही. किनाऱ्यावर आला म्हणजे मग पाण्यांत जाणार कसा ? म्हणून तो खोल पाण्यांतच असतो. हा पहा याचा जबडा." माधवरावांनी ज्याचा जबडा पसरलेला आहे अशा **देवमाशाचें** चित्र दाखविलें.

" अबबबब, काय हे दांत ! " शरद् एकदम उठून म्हणाली.

" जणूं काय आंत करवतीच ठेवल्या आहेत! " वसंत आश्चर्यानें म्हणाला.

" आणि आंत गेलेल्या प्राण्याचे मग काय हाल होत असतील बरें ? " रमाबाई अनुकंपायुक्त स्वरानें म्हणाल्या.

" नाही, हा मासा आपलें भक्ष्य चावून असा फारसा खातच नाही. समुद्रांत ज्या ठिकाणीं लहान माशांचे थवेच्या थवे असतात, त्यांच्या कळपाजवळ हा जातो व एकदां ' आ ' पसरतो. त्यासरशीं हजारों मासे त्याच्या घशांत उतरतात. मग हा आपला जबडा मिटतो. त्याबरोबर खालचे दांत वरच्या दांतांच्या सांध्यांत अगदी बोटभरसुद्धां जागा उरणार नाही अशा तऱ्हेनें घट्ट बसतात. आणि मग काय ? ते सर्व तो मटामटा गिळतो. त्याला कांही चावावें सुद्धां लागत नाहीं. "

" असल्या प्राण्यांचा काय बरें उपयोग ! " रमाबाई म्हणाल्या.

" काय उपयोग ? मनुष्यानें सर्व प्राण्यांचा उपयोग करून घेतला आहे. मग तो खार-मुंगसासारखा लहान असो किंवा वाघ-सिंहासारखा क्रूर असो किंवा हत्ती, पाणघोडा किंवा देवमासा यांसारखा खूपच अजस्र असो, मात्र या प्राण्यांची शिकार करावयाची म्हणजे तें काम भयंकरच कठीण असतें. आधीं बोटींतून या माशाचा शोध करीत जावें

लागतें; आणि जर का, चुकून त्याच्या शेपटीच्या तडाख्यांत ती बोट सांपडली कीं झालें. शिकारी लोकांचीच शिकार झाली म्हणावयाची ! पण शिकार करावयास गेलेले लोकहि कांहीं कच्च्या दिलाचे नसतात. त्याचा बरोबर पाठलाग करून त्याच्या शेंपटीची बाजू व जबड्याची बाजू चुकवून त्याची शिकार ते साधतात. देवमासा दिसलारे दिसला कीं भला मोठा आणि लांबच लांब अशा दोरीला बांधलेला भाला नेम धरून टाकतात. तो त्याच्या अंगांत शिरला की तो मरतो. आणि मग तें धूड किनाऱ्यावर ओढून आणितात. त्याच्या मृत शरीराची वाट लावण्यास त्यांना किती तरी दिवस लागतात. ''

'' पण त्याचा उपयोग काय हें सांगावयाचें राहिलेंचना ? '' रमाबाई पुन्हां म्हणाल्या.

'' आई, पण ही शिकारीची माहिती किती गमतीची आहे नाहीं का ? माझ्या अंगावर तर शहारे आले बाई '' शरद् म्हणाली.

'' खरंच फारच गमतीची आहे. '' वसंतही म्हणाला.

'' हत्तीच्या दांतांचा जो उपयोग तोच उपयोग याच्या दांतांचा आणि हाडांचा लोक करितात. याचा सुद्धां व्यापार फार होतो. त्याचप्रमाणें त्याच्या चरबीचा उपयोग जगास पुष्कळच होतो. त्याच प्रदेशांत **ध्रुवजंबूक, ससा, लेमिंग** त्याचप्रमाणें **रेनडिअर, मस्कबैल,** हेहि प्राणी कमी अधिक प्रमाणांत आढळतात. या सर्व प्राण्यांच्या केसांचा उपयोग इतर प्राण्यांच्या केसांप्रमाणेंच केला जातो. त्यांतल्या त्यांत त्यांच्या अंगावर असलेल्या नाजूक व गुळगुळीत अशा लवीचा तर रेशमाहूनहि मऊ असें कापड करण्याच्या कामीं उपयोग केला जातो. याचे एवढाले सुंदर व नाजूक गळपट्टे तयार करतात की, युरोपांतील बायका ते आपल्या गळ्याभोंवतीं गुंडाळून अगदीं पारव्याप्रमाणें ठुमकत चालत असतात. ''

"मग आमच्या शरदूला कां नाहीं एक असा गळपट्टा आणलात?" रमाबाई म्हणाल्या.


"आई, हें काय ग तुझें आपलें कांहींच्या बाहींच."

"अण्णा, हेंच ना **रेनडिअरचें** चित्र?" वसंत पुढचें पान पहात म्हणाला. "हें कांहीं इतकें आपल्या इकडल्या सांबरासारखें सुंदर दिसत नाहीं."



**रेनडिअर.**

"होय, हा प्राणी इतका सुरेख नाहींच. पण या प्राण्याचा उपयोग **एस्किमो** लोकांना फारच होतो. आपल्याला ज्याप्रमाणें गाय अतिशय उपयोगीं पडते, त्याचप्रमाणें यांना **रेनडिअर**चा उपयोग होतो. **रेनडिअर**पासून त्यांना दूध तर मिळतेंच. शिवाय बर्फावरून गाड्या ओढण्याच्या कामी यांचा फारच उपयोग होतो."




स्लेज गाडी.

" आणि बर्फांत गाड्यांची चाकें नाही वाटतं रुतत ? " शरद् कौतुकपणें म्हणाली.

" अग, बर्फ कठीण नसतें का ? " वसंत आपलें शहाणपण दाखविण्याकरितां कुर्ऱ्यांत म्हणाला.

" तुम्हीं दोघेंहि शहाणीं आहांत. " माधवराव विनोदानें म्हणाले. " ही पहा तेथली गाडी. हिला इंग्रजीत ' स्लेज् ' म्हणतात. "

" अण्णा, गाडीला चाकेंच नाहीत वाटतं ? मग गाडी जागची हलणार कशी ? " शरद् म्हणाली.

" अग, आपण नाही का पत्र्यावर बसून एकमेकांना फरफटत नेत ? " वसंत म्हणाला. " चाकें असती तर बर्फांत चाकें रुतून बसली नसती का ?"

" होय तसेंच. पण बर्फ गुळगुळीत असल्यामुळें व **रेनडिअर** हा जातीनेंच चपळ असल्यामुळें ही गाडी ताशी ७।८ मैलांच्या वेगानें जाते. कधी कधी **रेनडिअर**च्या ऐवजी कुत्र्यांचा उपयोगहि ह्या गाड्या आढण्याच्या कामी करतात. एथील कुत्री शिकारीच्या कामीहि फारच उपयोगी पडतात. "

" **रेनडिअर**प्रमाणेंच गवतावर उपजीविका करून राहणारा हा दुसरा प्राणी पहा. याला **कस्तूरी-बैल** म्हणतात. याच्या सर्व अंगाला कस्तूरीप्रमाणें वास येतो. " माधवराव म्हणाले.

" पण हा बैलाप्रमाणें दिसतो नाही ? त्याचीं शिंगें पहा कशी कमानदार व डौलदार आहेत तीं ! " वसंत म्हणाला.


" किती लांब लांब केस हे याच्या अंगावरील ! " शरद् म्हणाली.

" ते अगदी थेट त्याच्या खुरांपर्यंत लोंबलेले आहेत. "

" पण त्याच्या मानेवर ते सिंहाच्या आयाळाप्रमाणें वळलेले दिसतात नाहीं ? " वसंत म्हणाला.

" होय, या लांब केसांच्या खाली मखमलीप्रमाणें मऊ लव

असते. तिचा थर सर्व आंगभर आंतल्या आंगरख्यासारखा पसरलेला असतो. ” माधवराव म्हणाले.



**कस्तूरी-बैल.**

“ म्हणजे ! हा काय त्याचा ओव्हरकोट वाटतं ? ” रमाबाई म्हणाल्या.

“ पण काय हो अण्णा, **रेनडिअरला** किंवा या प्राण्याला या एकजात बर्फाच्छादित प्रदेशांत गवत हो कुठलें मिळतें ? ” वसंत म्हणाला.

“ प्रश्न अगदी बरोबर. मागें सांगितल्याप्रमाणें आठ-दहा महिने एथल्या जमिनीवर बर्फाचा थर पसरलेला असल्यामुळें एथें इतर वनस्पति वाढत नाहीत हें खरें, पण बर्फाच्या खाली जमिनीवर कांहीं कांहीं जातीचें खुरटें गवत, शेवाळ व दगडफूल या प्रकारच्या वनस्पति उगवतात. या वनस्पतीवर बर्फाचा थर असतो; पण **रेनडिअर** आणि **कस्तूरी-बैल** या प्राण्यांना त्यांचा वास येतो आणि हे प्राणी आपल्या खुरांनीं तेथील बर्फ उकरून काढितात आणि खाली उगवलेल्या गवत-शेवाळावर आपली

उपजीविका करतात. " माधवराव ही माहिती सांगत असतांना मुलें व रमाबाई मोठ्या आश्चर्यानें ऐकत होतीं.

" पहा, देवानें या प्राण्यांच्या अंगी कसें शहाणपण दिलें आहे तें ! " रमाबाई म्हणाल्या.

" हे प्राणी कळप करून राहतात. कळपांत कधीं ३० ते ५० तर कधीं कधीं ८० ते १०० पर्यंत सुद्धां हे प्राणी आढळतात. कळप करून राहिल्यावर या प्राण्यांना लांडगे, कोल्हे, अशा हिंस्र श्वापदांपासून भीति नसते. उलट तेच त्यांना ठार करितात. " माधवराव म्हणाले. " शिवाय प्रसंग पडल्यास यांचे पाय बोजड व आंखूड असूनहि यांना चांगलें धावतां येतें. "

" या प्रांतांत कांहीं पक्षीहि आहेत वाटतें ? " **टर्मिगॅन्** पक्षाकडे पहात वसंत म्हणाला. " हा काळसर भुऱ्या रंगाचा असतो वाटतं ? "

" एथील बरेच पक्षी स्थायिक नाहींत. दोन–चारच म्हणजे **टर्मिगॅन्, ग्विलेमॉट्** आणि **रेड्पोल्** यासारखेच कायते स्थायिक आहेत. बाकी सर्व पक्षी ऋतुमानाप्रमाणें येतात व जातात. **टर्मिगॅन्** पक्षी आपली अंडी खडकावर दगडांच्या खबदाडींत घालतात. या पक्ष्यांचा खूप मोठा जमाव असतो. एकाएका जमावांत दोन-दोनशें, तीन-तीनशें, सुद्धां पक्षी असतात. **ग्विलेमॉट्** आणि **पेन्ग्विन्** पक्ष्यांचा जमाव याहूनहि मोठा असतो. हे पक्षी उभे बसतात; आणि अशा तऱ्हेनें बसलेल्या हजारों पक्ष्यांचा थवा एकत्र पाहिला म्हणजे तो एक देखावा अति विलक्षणच दिसतो. गंगेच्या वाळवंटावर ज्याप्रमाणें लाखों लोक स्नानाकरितां जमतात, त्याप्रमाणेंच यांचा जमाव दिसतो. हे सर्व पक्षी रंगानें पांढरेच असतात खरे; पण या पक्ष्यांचे आणि एथील कांहीं पशूंचेहि रंग ऋतुमानाप्रमाणें बदलतात. "


" म्हणजे ? " रमाबाई उद्गारल्या.



टर्मिगॅन्.

" होय, यांचे रंग बदलतात. " माधवराव म्हणाले. " या दोन चित्रांकडे पहा. दोन्ही चित्रांत तेच पशु आणि पक्षी आहेत. **ध्रुव-जंबूक ध्रुव-ससा** हे पशु आणि **टर्मिगॅन्** हा पक्षी. पण एका चित्रांत त्यांचा रंग शुद्ध पांढरा असून दुसऱ्या चित्रांत त्याच प्राण्यांचा रंग काळसर भुरा आहे. "

" थंडीच्या दिवसांत यांचा रंग पांढरा होत असेल नाही ! " वसंत म्हणाला.



( हिवाळ्यातील देखावा ) ध्रुव-जंबूक व ध्रुव-ससा

" तसंच, या पक्ष्यांच्या मऊ मऊ लवीचीं आणि पिसांचीं वस्त्रें फारच ऊबदार आणि लुसलुशीतहि होत असतील नाहीं ? " रमाबाई ह्मणाल्या.

" हो तर, हीं वस्त्रें पांढरीं पांढरीं शुभ्र आणि आपल्या शरद्च्या गुल्गुलीत गालांप्रमाणें मऊ असतात. "

" इश्श ! कांहींतरीच आपलं. " शरद् किंचित् लाजून व मुरडून म्हणाली.



( उन्हाळ्यातील देखावा ) ध्रुव-जंबूक, ध्रुव—ससा वगैरे.

ही सर्व माहिती जरी गमतीची व मनोरंजक होती, तरी आतां जवळ जवळ दहा वाजावयास आल्यामुळें मुलांना मधून मधून जांभया येऊं लागल्या होत्या. म्हणून रमाबाईनीं मुलांना पुन्हां एकवार निजावयास जाण्यास सुचविलें. रमाबाईहि आतां डुलक्या घेऊं लागल्या होत्या. मुलांच्या मनांतून आणखी पुढलीं चित्रें पहावयाची होती व त्यांबद्दलची माहिती ऐकावयाची इच्छा व उत्सुकताहि त्यांना होती; पण माधवराव थोडेबहुत कंटाळले होतेच, त्यांतून दुसऱ्या दिवशीं त्यांना ऑफिसांत लवकरच जावयाचें होतें; त्यामुळें " उद्यांपासून रोज रात्रीं मी तुम्हांला हीं चित्रें दाखवून त्यांची सर्व माहिती सांगत जाईन " असें मुलांना आश्वासन देऊन त्यांनीं त्या दिवशी चित्रें दाखविण्याचें काम तेथेंच पुरें केलें. मुलांना आज बरीच माहिती मिळाल्यामुळें ती आनंदांतच निजावयास गेली. त्यांना त्या दिवशीं स्वप्नांतहि चित्रेंच दिसत होतीं. माधवरावांनी आपल्या पत्नीला चित्रांच्या साहाय्यानें मुलांना किती प्रकारची निरनिराळी माहिती सहज हंसत खेळत देतां येते, हें झोंपण्यास जाण्यापूर्वीं समजावून सांगितलें आणि तें त्यांना पटलेंहि.


# भूगोलावरील
# कांहीं विचित्र प्राणी

## ( २ ) सूचिपर्णी-जंगलाचा प्रदेश

ठरल्याप्रमाणें दुसऱ्या दिवशी घरांतील सर्व मंडळी रात्रीं बरोबर सात वाजतांच आपआपल्या जागीं येऊन बसली. आज माधवरावांनीं कांहीं गोष्टी नवीन आणिल्या होत्या. पृथ्वीचा गोल व नकाशे या त्या वस्तु होत. पृथ्वीवरील कोणकोणत्या प्रदेशांत कोणते कोणते प्राणी सांपडतात, याची नक्की कल्पना येण्यास गोल व नकाशे यांचा उपयोग चित्रांप्रमाणेंच चांगला होईल असें वाटल्यामुळें, कोणत्याशा त्यांच्या ओळखीच्या शाळेच्या मुख्य शिक्षकाकडून त्यांनी या वस्तु संध्याकाळीच ऑफिसमधून येतांना आणविल्या होत्या

त्यांनी आज चित्रांची माहिती पुढें सांगण्यापूर्वी प्रथम पृथ्वीचा गोल आणि नकाशा यांबद्दलची बरीच माहिती आपल्या पत्नीला व मुलांना करून दिली. मुलांना ती माहिती आवडलीच; पण रमाबाईनांसुद्धां ती माहिती ऐकून त्यांच्या पृथ्वीबद्दलच्या बऱ्याच कल्पना जास्त स्पष्ट झाल्या.

माधवराव सांगूं लागले—" हा पहा **उत्तर-महासागर**. याच्यांतील हीं बेटें आणि याच्या दक्षिणेला हा जो **भू-प्रदेश** आहे तो काल सांगितल्याप्रमाणें जवळजवळ १० महिने बर्फाच्छादित असतो. काल जे प्राणी पाहिलेत ते याच प्रदेशांत राहणारे. आज आपण याच्या दक्षिणेस असलेला हा झुडुपांचा प्रदेश आणि त्याच्याहि दक्षिणेस अस-


उत्तर ध्रुव
क
र्क
वृ
त्त
वि
षु
व
वृ
त्त
म
क
र
वृ
त्त
दक्षिण ध्रुव
बर्फाच्छादित प्रदेश
सूचिपर्णी जंगलाचा प्रदेश
रुंदपर्णी जंगलाचा प्रदेश
गवताचा आणि काटेरी झुडपांचा प्र.
वालुकामय प्रदेश
घनदाट जंगलाचा प्रदेश
विरल जंगलाचा प्रदेश
जग

लेला हा **सूचिपर्णी अरण्याचा** प्रदेश, आणि यांत वावरणारे प्राणी कोणकोणते आहेत व त्यांचा मनुष्यांना काय उपयोग होतो हें पाहूं. एथील झाडें शंकूच्या आकाराचीं असतात, हा जो अरण्याचा प्रदेश आहे तो **उत्तर-अमेरिकेंत** ३००० मैल लांब आणि ८०० मैल रुंद असून तितकाच किंवा त्याहूनहि जास्तच लांब-रुंद असा **युरेशिआ**मध्यें पसरलेला आहे. म्हणजे पृथ्वीभोंवती याचा मोठा वेढाच आहे; या टापूंत बाराहि महिने झिम् झिम् पाऊस पडत असतो."

"बाराहि महिने पाऊस ! आणि किती मैल लांब ? ६००० मैल ? म्हणजे, पृथ्वी आहे तरी किती मोठी ?" वसंत आश्चर्य करीत म्हणाला.

"हें पहा, या विषुववृत्तावर पृथ्वीचा घेर २५००० मैल आहे. आणि जों जों उत्तरेकडे किंवा दक्षिणेकडे जावें तों तों हा घेर कमी कमी होत जातो. या अरण्याच्या या ठिकाणी तो ६००० मैल लांबीचा आहे. येथें बाराहि महिने पाऊस पडतो; पण तो ४० इंचांपेक्षां जास्त नाही हो ?"

"म्हणजे ? आपल्या कोंकणांत एका आठवड्यांत ४० इंच पाऊस पडतो की ?" रमाबाई म्हणाल्या.

"होय. एथें पाऊस खूप मोठा असा फारसा पडतच नाहीं; एथें उष्णताहि कमी असते; म्हणून एथली झाडें अगदीं निराळ्या प्रकारचीं असतात. हें सुरूचें झाड आहेना, असल्या प्रकारची एथलीं झाडें असतात. मात्र हीं झाडें ३०० फूट उंच वाढतात; आणि जों जों **उत्तर-महासागरा**कडे जावें तों तों तीं ठेंगू होत होत अगदी फूट – दोन – फूट इतक्याच उंचीची होतात. खुद्द **उत्तर-महासागरा**च्या आसपास मुळीं झाडेंच उगवत नाहींत हें काल तुम्हांला मी सांगितलेंच आहे."

"ही गंमतच म्हणावयाची !" रमाबाईना आश्चर्य वाटल्यामुळें त्या उद्गारल्या.

" हिमालयावर जों जों उंच जावें तों तों झाडें खुरटीं खुरटीं होत जातात असें मास्तरांनीं आम्हांला सांगितलें आहे. " वसंत म्हणाला. "तसेंच हें असेल ना ? "

" हो, तसेंच कांहीं अंशीं आहे. मात्र एथलें कारण थोडें वेगळें आहे. या अरण्यापासून जों जों उत्तरेकडे जावें तों तों पाऊस कमी कमी होत जातो व थंडी जास्त जास्त वाढूं लागते; म्हणून झाडें कमी व खुरटीं होत जातात. हिमालयावर जों जों उंच जावें तों तों पावसा-ऐवजी बर्फच पडूं लागतें. मग झाडें वाढणार कशीं ? शिवाय पर्वताच्या उतारामुळें जमिनीत पाणी सांचणार कसें ? पावसाळ्यांत एवढा जरी पाऊस आपल्या पुण्याला पडतो तरी या आपल्या बंगल्याच्या कौला-वर कधी पावसाचें पाणी तुंबून राहिलें आहे ? त्याचप्रमाणें——"

" खरंच, नाहीच रहात. कसें राहील तें ? बाई परवां सांगत होत्या की, पाणी उतरत्या बाजूला वाहून जातें म्हणून." शरद् एकाएकीं आठवून म्हणाली.

" शरद्, तुला बऱ्याच गोष्टी कळतात मग ? " तिच्या पाठीवर शाबासकी देत रमाबाई म्हणाल्या.

" अण्णा, हें आम्हांला सर्व कळलें. आतां या प्रदेशांत प्राणी कोणकोणते राहतात तें सांगा पाहूं ? " वसंत म्हणाला.


" हो, मला तूं बरी आठवण करून दिलीस. नाहीतर माझें हेंच वर्णन पुढें चाललें असतें. बरं, हा तो प्रदेश. हा पहा या नकाशांत आणि या पृथ्वीच्या गोलावर. नीट दिसला तुम्हां सर्वांना ? "

" हो. " सर्वजणें म्हणालीं.

" हें दाट अरण्य आणि हा उत्तरेकडील समुद्रकिनारा यांच्या दरम्यानच्या प्रदेशांत बरेच हिंस्र पशु भटकत असतात. या सर्वांच्या अंगावर लोकर व लव भरपूर असते. यांपैकीं हा पहा **अर्मिन्**. हा **लेमिंग्** नांवाच्या उंदरासारख्या प्राण्यावर आपली उपजीविका करतो. "

" हा जवळ जवळ मुंगसासारखाच दिसतो. " रमाबाई म्हणाल्या.

" हो, यांपैकी बरेच प्राणी आपल्याकडील मुंगूस, घोरपड, रान-मांजर, कुत्रीं, लांडगे, यांच्यासारखेच आहेत. फक्त यांच्या अंगावर केस असून शेपटीचा चांगला झुबका असतो. हें पहा याचें शेपूट



अर्मिन.

किती झुबकेदार आहे तें. याच्या केसांना फारच किंमत येते. कारण त्यांना एक प्रकारची तकाकी असून ते फार मऊहि असतात. बादशहांच्या कोटाला जी किनार असते ती याचीच होय. "

" हो, आमच्या शाळेंत बादशहा आणि राणी यांचे फोटो आहेत. बादशहांच्या कोटाला अशी रुंद किनार आहे खरी. " वसंत म्हणाला.

थंडीच्या दिवसांत याची लोकर दुधासारखी पांढरी शुभ्र असते. पण शेपटीच्या टोकाला काजळासारखे काळेकुट्ट पुंजके असतात. या काळ्या लोकरीचा उपयोग पांढऱ्या कापडावर मधून मधून ठिपके देण्याकरितां फार करतात. त्यामुळें कापडास एक विशेष शोभा येते."

" कशीदा काढल्याप्रमाणेंच होत असेल ? " शरद् म्हणाली.

" छट्, तुझ्या गोऱ्या गोऱ्या पान कपाळावर आणि गालांवर जसें गोंदलें आहे तसें दिसत असेल ! " वसंत हंसत हंसत म्हणाला.

" छान छान ! " रमाबाई म्हणाल्या.

" अगदी तसेंच ! " माधवराव म्हणाले. " हा प्राणी रक्त-मांसाचा

अतिशय शोकी आहे. तो अतिशयच चपळ आहे. त्याची स्वतःची राहण्याची जागा झुडुपांत अगर दगडांच्या खबदाडींत असते; पण शिकारी-करितां तो वाटेल त्या बिळांत शिरूं शकतो आणि शिकार साधे-पर्यंत चिकाटी सोडीत नाहीं. "

" हा असतो तरी केवढा ? " रमाबाई म्हणाल्या.

" हा ना ? तसा फारच लहान असतो. सारी दहा इंच लांबी भरते याची. शिवाय शेपटी चार इंच लांबीची. इतका जरी लहान प्राणी हा असला तरी तो सशाची शिकार करूं शकतो. सशाची एकदम मानगुटीच तो धरतो. " माधवराव म्हणाले.

" हो, गरीब बिचारा तो प्राणी. त्याची मानगुटी कोणींहि धरावी. " रमाबाई उसासा टाकून म्हणाल्या.

" हा दुसरा प्राणी थेट त्याच्याच सारखा दिसतो ना ? " शरद् म्हणाली. " त्याच्यापाशी अंडी आहेत तीं त्या प्राण्याचीच का ? "

" हा प्राणी अर्मिन्च्या वर्गांतलाच आहे खरा; पण हा त्याच्या-हून लहान असून दिसावयास फारच गोंडस असतो. या प्राण्याची



( Weasel ) वीझल्

लांबी शेपटीसुद्धां १० इंचच भरते; पण रक्त पिण्याची याची हांव आर्मिन्पेक्षां जास्त आहे. वाटेल त्या चिरा, बिळें, खबदाडी, यांतून हा

सहज जाऊं शकतो. शिवाय झाडावर चढणें, पोहणें, यांतहि तो फार पटाईत आहे. " माधवराव म्हणाले.


" हें इवलेसें बाळ सर्वगुणसंपन्न दिसतें मग ? " रमाबाई म्हणाल्या.

" त्याच्यापाशी अंडी आहेत ती कुणाचीं पण ? हें सांगावयाचें राहिलेंच कीं ? " शरद् म्हणाली.

" आणि त्याचें नांव ? " वसंत म्हणाला.

" याचें नांव **वीझल्**. याच्याजवळ जी अंडी आहेत तीं खाण्या-करितां तो तेथें आला आहे. तीं त्याचीं नव्हेत. दुसऱ्या प्राण्याचीं अंडी चोरून नेण्यांत हा फारच प्रवीण आहे. " माधवराव म्हणाले.

" रानमांजर वाटतें हें ? " रमाबाई पुढचें चित्र पाहून म्हणाल्या.



( Sable ) **सेबल्**

" तें रानमांजरासारखें दिसतें खरेंच. याचा चेहरा बराच उग्र आहे. याला **सेबल्** म्हणतात. हा बहुतेक झाडावर अगर खडकावर शिकार साधण्याकरितां दबा धरून बसलेला असतो. हा अतिशय चपळ असून याच्या हालचाली फारच मनोवेधक असतात. झाडावर तर हा अतिशयच वेगानें चढतो. "

" हाहि पक्ष्यांची अंडीबिंडीं खात असेल मग ? " शरद् म्हणाली.

" हा ना, हा काय खात नाहीं ? बेडूक, उंदीर, खारी, पक्षी, साप, सरडे, ससे, पाली, सर्व कांहीं हा भक्षितो. " माधवराव म्हणाले.

" याची शेपूट कशी पिंजल्यासारखी दिसते पहा. " वसंत निरखून म्हणाला.

" होय, याच्या सर्वच अंगावर भरदार केस असतात. " माधवराव म्हणाले. " पण या प्राण्याच्या अंगावरील केस, त्याच्या वयोमानाप्रमाणें आणि नर किंवा मादी असेल त्याप्रमाणें कमी किंवा जास्त असतात; आणि त्याचप्रमाणें ऋतुमानाप्रमाणें ते मऊ लुसलुशीत आणि पांढरे स्वच्छ किंवा निबर, राठ आणि काळसर होतात. "

" एथील सर्वच प्राणी रंग पालटतात म्हणावयाचे मग ? " रमाबाई म्हणाल्या.

" कालच नाहीं का अण्णांनीं आपल्याला सांगितलें असें ? " शरद् आठवून म्हणाली.

" हा पहा यापुढील प्राणी. हाहि यांच्याच वर्गातला आहे.



स्कंक्

मात्र हा दिसण्यांत या सर्व प्राण्यांमध्यें फारच नाजूक, गोंडस आणि

डौलदार असतो." माधवराव स्कंक् प्राण्याचें चित्र दाखवून म्हणाले.

"खरोखरच हा खारीसारखा आणि खारीएवढाच दिसतो नाही ?" वसंत म्हणाला.

"हा खारीसारखा दिसतो खरा, पण हा मांजराहूनहि मोठा असतो." माधवराव म्हणाले.

"याच्या अंगावर हा पांढरा पट्टा आहे वाटतें ?" शरद् म्हणाली.

"होय, याच्या दोहीं अंगांस पांढरे पट्टे असतात, त्यांमुळेंच हा प्राणी गोंडस व सुरेख दिसतो. याच्या लोकरीला काळी तकाकी असते; पण याच्या कांही ग्रंथीतून एकप्रकारचा रस गळतो. त्याला अतिशय वाईट अशी घाण मारते आणि या घाणीचा दर्प एक एक फर्लांगापर्यंत पसरतो. कधी कधी वाऱ्याबरोबर तो मैलभरसुद्धां पसरतो." माधवराव म्हणाले.


"असेंच का सांग हें ?" रमाबाई नाकास पदर लावून म्हणाल्या.

"आतां नको कांही नाकाला पदर लावायला." माधवराव हंसून म्हणाले. त्यासरशी वसंत व शरद् हीहि हंसली.

"हे दुसरे दोन-तीन प्राणी पहा." माधवराव म्हणाले. "यांना बीव्हर म्हणतात."

"अरे, हे घुशीसारखे दिसतात." शरद् म्हणाली.

"अगदी बरोबर, हा प्राणी घुशीप्रमाणेंच आहे. घूस ज्याप्रमाणें घराखाली मोठमोठी बिळें करते त्याप्रमाणें हा प्राणी ओढ्या–नाल्यांच्या कांठी आणि बेटांवर बिळांत बिळें, बिळांत बिळें, करून राहतो. मधलें बीळ म्हणजे त्याचा मुख्य दिवाणखाना. तें फारच सुंदर असतें. हा मोठमोठाली झाडें आपल्या नखांनी कुरतुडून व दांतांनी कंगोरे पाडून त्यांचे ओंडके बरोबर ओढ्यावर आडवे पडतील असें करतो."



बीव्हर



बीव्हर

" ते कशाला ? त्याला काय पूलबील बांधावयाचा असतो वाटतें ? " वसंत अधीरतेनें म्हणाला.


" अगदीं पूलच नाही कांही. त्याला तेथें धरण घालावयाचें असतें. लाकूड आडवें पडलें म्हणजे त्याच्या दोन्ही बाजूंना माती घालून हा सुंदर बांध घालतो; आणि अशा तऱ्हेनें पाणी तुंबून राहिलें म्हणजे त्या पाण्यांत कांही प्रकारच्या वनस्पति ( विशेषतः कमळाची वेल ) उगवतात, त्यांवर तो आपला उदरनिर्वाह करितो. याला झाडाच्या साली फारच आवडतात."

"बराच शहाणा प्राणी आहे म्हणावयाचा हा." रमाबाई म्हणाल्या.

" हा पोहण्यांत मोठा वस्ताद आहे. दोन-दोन, तीन-तीन मिनिटें-सुद्धां पाण्याखाली बुडी मारून हा राहूं शकतो. "

" अरे, या प्राण्यानें तर तोंडांत मासाच धरलेला आहे. कोणता हो प्राणी हा अण्णा ? " वसंत पुढच्या चित्राकडे बोट करून म्हणाला.

" अं ! हा ना ? याचें नाव **ओत्तर**. हाहि प्राणी पाण्याच्या आजूबाजूलाच राहतो म्हणून याला **पाणमांजर** म्हणतात. ते पहा



**पाणमांजर.**

त्याचे कल्ले, दाढी व मिशा. " माधवराव म्हणाले. याला मासे खाण्याची फारच हौस. तेंच त्याचें अन्न म्हणाना. **सॅमन्** नांवाची

एक माशाची जात आहे. तो मासा त्याला फारच प्रिय. ओत्तरच्या पायाला बदकांच्या पायांप्रमाणें पडदे असतात. ''



**पाणमांजर.**

'' हं, मी समजलों कां तें. '' वसंत म्हणाला.

'' कां रे का दादा ? '' शरद् म्हणाली.

'' सांगूं ? अग, त्याला पाण्यांत मासे पकडण्याला पोहत जावयाचें असतें म्हणून. ''

'' अगदीं बरोबर. '' माधवराव दुसरें चित्र पुढें धरून म्हणाले.

'' अहो अण्णा, हें एक चित्र मधें मोडलेंत पण. '' शरद् म्हणाली.

'' होय, अग तें लांडग्याचें आहे. हं पहा त्यांत कांहीं विशेष नाहीं म्हणून तें मोडलें हो ''

'' वा ! शरद्, तूं अगदीं फारच चौकस झाली आहेस म्हणावयाचें !'' रमाबाई म्हणाल्या.

'' हो, मुलांनी असें चौकसच व्हावें, म्हणजेच त्यांचें ज्ञान वाढतें. नाहीतर आपण–'' माधवराव म्हणाले.


'' असूं दे हो, मुलांसमोर ही थट्टा बरी दिसत नाहीं. '' रमाबाई किंचित् तुसड्या स्वरानें म्हणाल्या.

" हें पहा बॅजरचें चित्र, याच्या डोक्यावर एक पांढरें चिन्ह



**बॅजर**

म्हणजे बॅज् असतें म्हणून यास हें नांव पडलें. हा जमिनीमध्यें बिळें करून राहतो. त्यांत खूपच वाटा असतात. हा वाटेल तो पदार्थ खातो. मध खातो आणि गांधील माशांचीं अंडींसुद्धां खातो. याच्या शेपटीच्या खालीं एक पिशवी असते. तिच्यांत एक घाणेरडा पदार्थ असतो. त्या वासामुळें नर व मादी हीं एकमेकांना हुडकूं शकतात. असो. येथील सर्व प्राण्यांच्या अंगावर चांगली लोकर असते. यांची शिकार करावयाला फासेपारधी मात्र मोठे हुशार लागतात. कारण हे प्राणी चपळ तर आहेतच; शिवाय त्यांचीं नखें व दांत फारच तीक्ष्ण असतात त्यामुळें जमीन उकरणें किंवा दांतांनीं कांहीं कुरतडणें म्हणजे त्यांना कांहीं वाटतच नाहीं. यामुळें पारध्यांना या प्राण्यांची सर्व प्रकारची माहिती असावी लागते. त्यांना अरण्यांत व ओसाड प्रदेशांत दोन्ही ठिकाणीं राहण्याची संवय पाहिजे. या प्राण्यांच्या अंगीं असलेलें शहाणपण व चपळाई या गुणांची केवळ बरोबरीच नव्हे, तर ते गुण जास्त प्रमाणांत पारध्यांच्या अंगीं असावे लागतात, तेव्हां कुठें शिकार



समन.

साधते. पण त्यांच्या श्रमाचा मोबदलाहि त्यांना तसाच लाभतो. कारण, यांच्या केसांना व लोकरीला भारीच किंमत येते. ''

'' पण कायहो अण्णा, **सॅमन्** माशाचें सांगावयाचें राहिलेंच कीं ? ''

'' हो, बरी आठवण केलीस. हा पहा **सॅमन्** मासा. या नकाशांत पहा ह्या दोन-तीन नद्या आहेत, एकीचें नांव **नेल्सन्**, ही दुसरी **फ्रेजर** आणि ही तिसरी **कोलंबिया**. ''

'' हीं सगळींच नांवें साहेब लोकांचीं दिसताहेत. '' रमाबाई किंचित् नाक मुरडून म्हणाल्या.

'' हो, मग कुणाचीं असणार ? त्या लोकांनीं आपला स्वतःचा देश सोडून, धाडस करून, अनेक अडचणी सोसून, वेळी जीवावर उदार होऊन, हे प्रांत शोधून काढले, म्हणून त्यांची नांवें या पृथ्वीवर अमर होऊन राहिली आहेत. आमच्या हिंदु लोकांसारखें समुद्र ओलांडून जावयाचें नाहीं, असें म्हणत बसले नाहीत ते. ''

'' तें समजलं हो, '' रमाबाई गुळमुळीतपणें म्हणाल्या.

'' या नद्यांतून **सॅमन्** मासे लाखों गणती जात येत असतात. या माशांची मादी आपलीं अंडी समुद्राच्या म्हणजे खाऱ्या पाण्यांत घालीत नाहीं तर नद्यांच्या गोड्या पाण्यांत जाऊन घालते. या माशांचा अंडीं घालण्याचा एक ठरलेला काळ असतो. प्रत्येक मादी एका वेळीं बरींच अंडी घालते. त्यामुळें या हंगामांत नद्यांचें पाणी माशांनीं भरून जातें. हें पहा चित्र. पुष्कळ वेळां नदी जर खड-कावरून उड्या घेत खालीं येत असली तर हे मासे उड्या मारीत प्रवाहाच्या उलट दिशेनें उगमाकडे खडकावरून चढत जातात. ''


'' हो हो ! काय हे ! वाटाण्याच्या शेंगांचे ढीगच्या ढीगच दिसताहेत कीं ? '' वसंत उभा राहून म्हणाला.

'' अरे, त्या वाटाण्याच्या शेंगा नव्हेत. पाण–शेंगा आहेत त्या!''

'' इश्श मेलं ! '' रमाबाई म्हणाल्या.

" ते **सॅमन्** माशांचे थवे होत हो. हे मासे पकडण्यासाठीं कोळी लोक जाळीं नाहीं टाकीत कांहीं. "

" मग कसे पकडतात ते ? " शरद् माधवरावांकडे पहात म्हणाली.



कॉड.

" त्या पहा बोटी आणि हें पहा त्या बोटीवरील रहाट. या रहाटावरून ही मोट सोडली आहेना ? त्या मोटींत हे मासे येतात. "

“ आणि मग ती वर ओढून घेतात. ” वसंत लगबगीनें म्हणाला.

“ आणि हा दुसरा मासा कसला ? ” शरद् दुसऱ्या माशाच्या चित्राकडे बोट दाखवून म्हणाली.

“ हाच तो **कॉड् मासा.** ” माधवराव म्हणाले.

“ ज्याचें तेल तुला देत होतें तो. ” वसंत म्हणाला.

“ हे मासे **अटलांटिक्** महासागराच्या या भागांत पुष्कळ सांपडतात. ” असें म्हणून माधवरावांनी **न्यूफॉउंड्लंड्** व **नॉर्वे** या दोन देशांजवळील भाग दाखविले.

“यांचें का तेल काढतात तें ? ” रमाबाई शिसारी देऊन म्हणाल्या.

“ होय, पण या तेलानें कितीतरी जणाचे जीव वांचविले आहेत म्हटलें. आपली शरद् वांचली असती का ? ” माधवराव शरद्च्या पाठीवरून हात फिरवीत व तिचा एक पापा घेऊन म्हणाले.

“ तेंहि खरंच. ” रमाबाई उसासा टाकून म्हणाल्या.

“ या समुद्रांत एका प्रकारची वनस्पति उगवते. ती हा मासा खातो व तिचा अंश याच्या तेलांत उतरतो. तो औषधी आहे. शिवाय हें तेल पौष्टिकहि आहे. म्हणून या माशांचा व्यापार फारच मोठ्या प्रमाणावर चालतो. ”

“ अरे हा तर **गरुड.** केवढाले याचे हे पंख ! ” वसंत म्हणाला.

“ याची नखेंहि किती अणकुचदार दिसतात ? अगदी त्याच्या चोंचीसारखी. ” शरद् म्हणाली.

“ पुराणांत सांगितलेल्या गरुडासारखाच दिसतो हा. ” रमाबाई म्हणाल्या.

“ हा पक्षी **उत्तर-महासागरा**जवळच्या प्रदेशांत राहतो व तेथील मासे व इतर प्राणी यांच्यावर उपजीविका करतो. याचाहि रंग थंडीच्या दिवसांत पांढरा शुभ्र असतो. याची भरारी फारच मोठी असते. मोरोपंतांनी वर्णल्याप्रमाणें:—

"गरुड जसा गगनांतुनि वेगें उतरोनि पन्नगा झडपी"
अगदीं तशी याची झडप असते. असो. या प्रदेशांतले सर्व



गरुड.

प्राणी आज पाहून झाले. तेव्हां आतां तुम्हांलाहि कंटाळा आला असेल नाहीं? पुढील चित्रें आणखी केव्हांतरी पाहूं."

"असं काय अण्णा? चित्रें रोज दाखवीन म्हणून तुम्ही काल म्हणालांत तें विसरलांत वाटतें?" वसंत हातवारे करून म्हणाला.

"हो हो! विसरलां वाटतं!" शरद् माधवरावांच्या हाताला झोंबून म्हणाली.

"बरं बाबांनो, उद्यां दाखवीन हो. मला वाटलं कीं तुम्हांला आतां कांही हीं चित्रं इतकी आवडत नाहींत असं."

"मला समजलं कोणाला उद्देशून हें बोलावयाचं तें." रमाबाई माधवरावाकडे पहात म्हणाल्या "मलाहि आवडतात हो."

"ठीक आहे. मग उद्यां पाहूंच." असें म्हणत माधवरावांनीं नकाशे वगैरे सर्व सामान आवरलें; व मग सगळीच मंडळी उठली.

# भूगोलावरील
# कांहीं विचित्र प्राणी

## (३) सूचिपर्णी–जंगलाच्या दक्षिणेकडील अरण्यें आणि गवताळ प्रदेश.

मुलांना प्राण्यांचीं चित्रें पाहण्याचा नादच लागला होता. त्यांचीं जेवणें आज लवकर आटोपल्यामुळें वसंत आणि शरद् हीं दोघेंच चित्रांचें पुस्तक घेऊन दिवाणखान्यांत बसलीं होतीं. आज चांदणेंहि नसल्यामुळें बागेंत बसण्याचा त्यांचा विचार नव्हताच. माधवराव व रमाबाई यांच्या जेवणाला वेळ लागला; कारण माधवरावांना आज एका स्नेह्याकडे जाऊन यावयाचें होतें. पतिपत्नी जेवण आटोपून येईपर्यंत मुलांनीं चित्रांचें पुस्तक पुन्हां पहिल्यापासून नीट चाळलें. वसंत व शरद् एकमेकांना प्राण्यांसंबंधी माहिती पुरवीत होते व त्यांना नकळतच त्यांची ही उजळणी होत होती. कित्येक वेळां त्यांचें भिन्न मत पडे. त्यांनीं वडिलांना विचारण्याकरितां अशा मतभेदांच्या किती तरी गोष्टी आज काढून ठेविलेल्या होत्या. माधवराव व रमाबाई दिवाणखान्यांत आल्यावर मुलांनीं आपलें खरें कीं दुसऱ्याचें खरें याचा निकाल लावून घेण्याकरितां या प्राण्याबद्दल, त्या प्राण्याबद्दल विचारण्यास सुरवात केली. माधवरावांना खरोखर मनांतून आनंद झाला होता. मुलें भांडत होतीं म्हणून नव्हे, तर अशा प्रश्नोत्तरपद्धतीनें बऱ्याच खोट्या कल्पना दूर होतात व शंका मुलांकडूनच आल्यामुळें त्या निवारण केल्या असतां मुलांच्या मनावर खरें काय असेल तें चांगलें ठसतें

हें त्यांना माहित होतें. त्याचप्रमाणें त्यांच्यांत एकप्रकारची हितकर स्पर्धा असल्यामुळें त्यांच्या ज्ञानांत त्यामुळें भरच पडत होती. माधवरावांच्या अपीलकोर्टांत कांहीं वेळां वसंताचें म्हणणें खरें ठरे तर कांहीं वेळां शरदचें खरें ठरे. यामुळें दोघेंहि हिरमुसलीं झालीं नाहींत. शंका निवारण झाल्यावर माधवराव म्हणाले "मुलांनो, आज आपणांस दुसऱ्याच एका प्रदेशांतील प्राणी पहावयाचे आहेत. हा प्रदेश काल जें अरण्य पाहिलें त्याच्या जवळच आहे. हा—पहा—तो प्रदेश." असें म्हणून त्यांनीं तो प्रदेश दाखविला.

"अरे, हा प्रदेश काल दाखविलेल्या अरण्याच्या थेट दक्षिणभागीं पसरलेला आहे." वसंत नकाशाकडे न्याहाळून म्हणाला.

"हो, पण त्या अरण्याच्या उत्तरेकडे जसजसें जाऊं तसतसें ज्याप्रमाणें झाडें लहान व विस्कळित होत होत अगदी अखेर ओसाड प्रदेश लागतो त्याचप्रमाणें दक्षिणेकडे जाऊं लागलों म्हणजे—"

"मी सांगूं?" वसंत लगबगीनें म्हणाला "जों जों दक्षिणेकडे जाऊं तों तों झाडें लहान लहान होत अगदीं नाहींशीं होतात."

"तुझें म्हणणें बरेंचसें बरोबर आहे. पण या शंक्वाकार वृक्षांच्या अरण्याच्या उत्तरेकडे आणि दक्षिणेकडे असणाऱ्या या दोन अर्धवट ओसाड प्रदेशांत थोडा फरक आहे. हे पहा, हे जे या दक्षिणेकडील पट्ट्यांत पूर्वभाग व पश्चिमभाग आहेत, (दोन्ही गोलार्धांत) ते प्रदेश ओसाड नाहींत; तर मध्यभागच तेवढा ओसाड आहे. पूर्व आणि पश्चिम—किनाऱ्यांवर अरण्यें आहेत. मात्र या अरण्यांतील झाडें सुरूसारखीं निमुळतीं नाहीत, तर तीं रुंद पानांचीं व रुंद छत्रीच्या आकाराचीं आहेत. आणि या झाडांचीं पानें हिंवाळ्यांत एकूण एक गळून पडत असल्यामुळें प्रत्येक झाडाचा त्या ऋतूंत खराटा होतो. मात्र ज्या वेळीं हीं झाडें बुंध्यापासून शेंड्यापर्यंत बर्फानें मढविलीं जातात, तेव्हां तीं स्फटिकाच्या झुंबराप्रमाणें शोभतात. ते प्रदेश आपण

मग पाहूं. पण हा मधला बराच मोठा जो भाग आहेना त्या भागांत पाऊस पुष्कळच कमी पडतो आणि त्यामुळें तेथें झाडें वाढत नाहींत, पण गवत मात्र वाढतें. कारण गवताला पाणी फारसं लागत नाहीं."

"होय, अगदीं खरं रे दादा, बाई म्हणत होत्या कीं एवढंस कुठं पाणी पडलं कीं गवत आपलं उगवतंच." शरद् आपल्याला त्याचें कारण समजलें आहे असा आव आणून म्हणाली.

"अग, तुझ्या बाईंनीं कशाला सांगावयाला पाहिजे हें? आपल्या बागेंत जिथं फारसं पाणी पडत नाहीं आणि जिथं आपण पाणीहि घालीत नाहीं तिथं नाहीं का गवत उगवत?" वसंत ऐटीत म्हणाला.


"अरे, आपण ज्या टेंकडीवर सकाळीं फिरावयाला जातों तेथें नाहीं का नुसतं गवतच उगवलेलं. त्या टेंकडीवर पाणी सांचतंय कुठं? पण तें गवताला पुरतं." रमाबाई आपणालाहि हें शास्त्र कळतें हें दाखविण्यासाठीं माधवरावांकडे पहात म्हणाल्या.

"तुमचं सर्वांचं म्हणणं अगदीं बरोबर आहे. म्हणूनच या प्रदेशाला गवताळ प्रदेश असं म्हणतात. हें पहा या नव्या जगांत याला **प्रेअरी** असं नांव दिलं आहे आणि जुन्या जगांत अशाच गवताळ भागास **स्टेप्** हें नांव देण्यांत आलं आहे."

"म्हणजे जुन्या जगांत या पट्टयांत पश्चिमेस अरण्य, मधें स्टेप् किंवा गवताळ प्रदेश आणि पुन्हां पूर्वेस अरण्य आणि त्याचप्रमाणें नव्या जगांत; असंच कीं नाहीं अण्णा?" वसंत म्हणाला.

"होय, अगदीं बरोबर वसंत, आतां हे जगावरील वनस्पतींचे पट्टे तुला नीट समजूं लागले आहेत असं म्हणण्यास हरकत नाहीं." माधवराव म्हणाले. "या शंक्वाकार वृक्षांच्या अरण्याच्या या अगदीं उत्तरेकडील सीमेपासून तों थेट या दक्षिणेकडील गवताळ प्रदेशांपर्यंत येणाऱ्या सर्व टापूंत हा एक केसाळ प्राणी आढळतो. याला **लिंक्स्** म्हणतात."

" हा तर थेट चित्त्यासारखाच दिसतो." वसंत न्याहाळून पहात म्हणाला.



**लिंक्स्.**

" होय, तो चित्त्यासारखाच दिसतो. पण चित्त्याहून हा बराच लहान असतो; आणि रानमांजरापेक्षां बराच मोठा असतो." माधवराव म्हणाले. " त्याची दृष्टि मात्र अतिशय तीक्ष्ण आणि भेदक असते, इतकी तीक्ष्ण आणि भेदक कीं त्याला अपारदर्शक पदार्थांतून सुद्धां पलीकडचें दिसतें असा कांही लोकांचा समज होता; आणि म्हणून अति तीक्ष्ण आणि भेदक नजरेच्या माणसाला '**लिंक्स् डोळ्याचा**' म्हणण्याचा अद्याप तिकडे परिपाठ आहे."

" आपण जसें '**घाऱ्या डोळ्याचा**' म्हणतों तसेंच असेल." शरद् म्हणाली.

" होय. याची लोकर लांब असून मऊ असते आणि रंग फिक्कट पिंगट असतो आणि अंगावर काळे ठिपके असतात." माधवराव म्हणाले. " यामुळें त्याचें शरीर सुंदर दिसतें."


" मांजराप्रमाणें हा झाडावर चढत असेल का?" वसंत अर्थपूर्ण दृष्टीन म्हणाला.

" हा बराच वेळ झाडावर फांद्यांच्या आड बसून असतो; आणि

कधीं पक्षी तर कधीं शेळ्या-मेंढ्या यांच्यावर झडप घालून आपली उपजी-
विका करतो. कोंबड्यांचा तर हा फन्ना उडवितो. " माधवराव म्हणाले.

" आपल्या **लाल्या** मांजरासारखाच हा करतो म्हणावयाचा मग ?" शरद् म्हणाली " तो असाच चिमण्या, साळुंक्या, यांवर झडप घालतो. "

" याच्या कातड्याला फारच किंमत येते. " नंतर माधवराव पुढील चित्र दाखवीत म्हणाले.



सुतार

" आतां हें **पहा सुतारपक्ष्याचें चित्र.** हा पक्षी काल जो

शंकाकार अरण्याचा पट्टा मीं दाखविला त्यांत आणि आजच्या या पट्ट्यांतील पूर्व व पश्चिम भागांतील अरण्यांत आढळतो. याच्या पुष्कळ जाती आहेत. आपल्याकडेहि याच्या कांहीं जाती आहेत; पण एका बाबतींत या सर्वांचें साम्य आहे. हा पहा झाडाच्या बुंध्यावर कसा बसला आहे तो ! हा पक्षी झाडावर असा बसून आपल्या चोंचीनें झाडांवर घाव घालीत असतो. अरण्यांत सगळीकडे शांत असतें अशावेळी या पक्ष्यांच्या चोंचीचे घाव दूरवर ऐकूं येतात. या घावांनीं झाडांच्या बुंध्यांत केवढाल्या तरी ढोल्या तो पाडूं शकतो. ''

'' शरद्, याची चोंच पाहिलीस कशी लांब आणि अणकुचीदार आहे ती ! '' वसंत म्हणाला '' अण्णा, ती बरीच तीक्ष्ण आणि टणक असली पाहिजे नाहीं ? ''

'' होय, ती तशी तीक्ष्ण, टणक आणि अणकुचीदार असतेच. '' माधवराव म्हणाले. '' हे पक्षी बहुतरंगी असतात. कित्येकांच्यावर ठिपके तर कित्येकांच्यावर पट्टे असतात. कित्येक वेळां हे एक रंगी सुद्धां असतात. हा पक्षी स्क्रूच्या खिळ्याप्रमाणें किंवा मळसूत्राप्रमाणें झाडाच्या बुंध्या-भोंवती गरगर फिरत फिरत झाडावर चढतो. कांहीं जातीचे सुतारपक्षी देवदारवृक्षाच्या बुंध्यावरून किल्ल्याच्या दारावर ज्याप्रमाणें खिळेच खिळे बसविलेले असतात, त्याप्रमाणें ओकवृक्षांची फळें किंवा गोटे यांच्या रांगा बसवितात. ''

'' आपल्या एथील **शनिवारवाड्याच्या दिल्लीदरवाज्यावर** जसे खिळे बसविलेले आहेत तसे ? '' शरद् म्हणाली.

'' नवलच बाई हें एक ! याला दुसरं कांही काम नसतं वाटतं ? '' रमाबाई म्हणाल्या.

'' या शंकाकार अरण्याच्या ( त्यालाच सूचिपर्णी म्हणतात ) दक्षिणभागीं आणखी किती तरी प्राणी आहेत. हा पहा **कस्तूरी–मृग.**



कस्तूरी-मृग


मात्र या भागांत हा क्वचित् सांपडतो. याचें खरें स्थान हिमालयाचा उंच प्रदेश होय."

"काय ? या हरिणाला सुळे असतात !" वसंत उद्गारला.

"आणि त्याचे खूर पहा कसे निमूळते होत गेले आहेत ?" शरद् म्हणाली.

"मात्र त्याच्या अंगावरील केस राठ दिसतात नाहीं ?" रमाबाई म्हणाल्या.

"होय, या **कस्तूरी-मृगास** या सगळ्यांचा फार उपयोग होतो. याच खुरांमुळें डोंगराळ प्रदेशावरून त्याचे पाय घसरत नाहींत. मात्र जे **कस्तूरी-मृग** शंकाकार अरण्यांत किंवा गवताळ प्रदेशांत सांपडतात, त्यांचे खूर इतके अणकुचीदार नसतात. त्यांचे केस राठ पण लांब असतात. सुळ्यांचा उपयोग त्यांना स्वतःच्या रक्षणार्थ होतो."



सांबराची जात ( वॅपिटि )

" कस्तुरी याच हरिणाच्या बेंबींतून बाहेर पडते असं मीं ऐकलं आहे. खरं का ? " रमाबाई म्हणाल्या.

" होय, कस्तुरीकरितां या मृगाची पुष्कळ शिकार केली जाते व ती डोंगराळ प्रदेशांतून करणें कठीण आहे. "

" मग **मस्क-बैल** मागें सांगितलात त्याची ? " वसंत म्हणाला.

" त्याच्या अंगाला नुसता तसा वास येतो. ज्याच्या अंगाला कस्तुरीसारखा वास येतो असे आणखी पुष्कळ प्राणी आहेत. **पण** त्यांपासून कस्तुरी मिळत नाहीं " असें माधवरावांनीं सांगितलें. ते पुढें म्हणाले " हें मागील पानावरील चित्र ( **वॅपिटि** ) **सांबराचें** आहे. या हरिणांच्या व सांबरांच्या पुष्कळ जाति आहेत. त्यांपैकीं कांहीं अरण्याच्या मध्यभागीं राहतात तर कांहीं अरण्याच्या सीमेवर राहतात. आणि कांहीं तर डोंगराळ प्रदेशावरूनच भटकत असतात. मात्र निरनिराळ्या प्रदेशांत त्यांना निरनिराळीं नांवें आहेत. हीं पहा असल्याच जातीच्या प्राण्यांचीं दुसरीं दोन चित्रें. एकास **मूस** किंवा **एल्क** म्हणतात व दुसऱ्यास **कॅरिबु** म्हणतात. **कॅरिबु** हा **रेनडिअर**चाच एक प्रकार आहे. **सांबर** किंवा **मूस** किंवा **एल्क**, **रेनडिअर** किंवा **कॅरिबु** या सर्वांच्या डोक्यावर शिंगांचीं झाडें असतात. "


" आणि हा **मूस** कीं काय ? याच्या डोक्यावर फळ्या निवडुंगासारखेंच झाड उगवलेलें दिसतें ! " वसंत म्हणाला.

" आणि सांबरांना तर आपल्या शिंगांचा मोठा डौल असतो ना अण्णा ? मला कुठंसा एक धडा गेला आहे. " शरद् म्हणाली.

" अग, त्या धड्यांत त्याचीं शिंगें नाहीं का अडकलीं ? " वसंत आठवून म्हणाला.

" अरे, धड्यांत का शिंगें अडकलीं कीं झाडांत ? " रमाबाई हंसून म्हणाल्या. वसंत थोडा विरमला.

" असूं दे ग, थोडासा तो विसरला म्हणून त्याची काय एवढी




मूस.

थट्टा करावयाला हवी ? हा **मूस** आहे ना, याला अरण्यांतच राहावें लागतें. कारण याची मान जाड असल्याकारणानें त्याला वांकून गवत खातां येत नाहीं. त्याला झाड-पालाच खावा लागतो.''माधवराव म्हणाले.

"आणि हा कोण जाड मानेचा दुसरा प्राणी ? हा धड बैलासारखा दिसत नाहीं. धड मेंढ्यासारखा दिसत नाहीं. आणि त्याच्या मानेवर तर सिंहाच्या आयाळाप्रमाणें खूप लांब केस आहेत.'' शरद् म्हणाली.

" अण्णा, हा **वन-बैल** काय हो ?'' वसंत तर्क लढवून म्हणाला.



**वन-बैल.**

" होय, तो **वन-बैलच**. अगदीं बरोबर ओळखलेंस तूं. हें पहा, आतां कसें त्यानें अगदीं बरोबर ओळखलें तें ?'' आपल्या पत्नीकडे पाहून माधवराव म्हणाले, " याला **बायसन्** असें म्हणतात. **वन-बैला-प्रमाणेंच रान-रेडा** हि असतो. त्याचप्रमाणें **वन-गाई** युरोपखंडांत पूर्वीं पुष्कळ होत्या. पण त्यांची संख्या आतां पुष्कळच कमी झाली आहे. या **अमेरिकेंतील रॉकी** पर्वतांत **वन-बैल** अद्याप पुष्कळ आहेत. ''

" अण्णा, **वन-गाय** सिंहाबरोबर सुद्धां झुंजते, खरें का हो ? '' वसंतानें त्याला माहीत असतांहि प्रश्न केला.

"होय. मात्र त्यांचा कळप असतो आणि अशा कळपाच्या तडाख्यांत का सिंह सांपडला म्हणजे त्याचें चंदनच त्या करतात."



रान-रेडा.

"म्हैसुरांतल्या खिल्लारी गाई अशाच वाघाला मारतात ना अण्णा ?" शरद् म्हणाली.

"हो, मारतात हो." वसंत किंचित् चिडविण्याच्या स्वरानें म्हणाला.


"बाई सांगत होत्या. मग खोटं कां हो अण्णा?" शरद् जोरानें उसळून म्हणाली.

"खोटं नाहीं हो तुझं, अगदीं खरं आहे." माधवराव म्हणाले.

"गंगावनं वन-गाईच्या केसांचींच केलीं असतात ना ?" रमाबाई आठवून म्हणाल्या.

"होय, यांच्या केसांचीं गंगावनें चांगलीं होतात. यॅक् नांवाचा एक तिबेटी ओबडधोबड पण अत्यंत बळकट असा बैल आहे. तो

तिबेटासारख्या डोंगराळ प्रदेशांत ओझें वाहण्यास फारच उपयोगीं पडतो. त्याच्याही केसांचीं गंगावनें होतात. " माधवराव म्हणाले.



( यॅक् ) तिबेटी बैल.


" आई, पण गंगावन म्हणजे काय ग ? " शरद् म्हणाली.

" अग, गंगावन म्हणजे कीं नाहीं, पूर्वींच्या बायका केस कमी असले म्हणजे या गाईच्या केसांच्या बटा आपल्या केसांत घालीत. या गाईच्या केसांची एकत्र केलेली पेड असते तिला गंगावन म्हणतात हो. "

" अग, शेजारच्या सावित्रीबाई घालतात गंगावन. तें नाहीं का पाहिलेंस तूं ? " वसंत म्हणाला.

" होय, पाहिलें आहे खरें. आणि हे तर दोन्ही मेंढेच दिसताहेत; आणि हा तर उभा कसा राहिला आहे पहा, जणूं कांहीं ड्रिलच करणार आहे. " शरद् म्हणाली.


" ही पहा, रॉकी-पर्वताची ओळ. या रॉकी-पर्वताच्या कड्यावरून; तो बिनधिक्कत चालत असतो. शिंगें आहेत म्हणून, नाहींतर सिंहा-



एडका. ( मेंढा )

M. 1305

सारखाच भयंकर आणि उग्र तो दिसतो नाहीं ? " माधवराव म्हणाले. "या मेंढयांची लोंकर लांब व लुकलुकीत असते. हा दुसरा मेंढा गवताळ प्रदेशांत राहतो. याचीं शिंगें मोठीं आणि धनुष्यासारखीं वाकलीं आहेत. म्हणून याला **प्रचंड-शृंगी** ( अफाट-शिंगी ) म्हणतात."



## प्रचंड-शृंगी ( अफाट–शिंगी. )

" अहो अण्णा, या मेंढयाच्या अंगांवर केसांचं जंगलच वाढलं आहे कीं ! " वसंत म्हणाला "केवळ त्याचा काळा मुखवटा तेवढा मोकळा दिसतो आहे. बाकी सर्वच शरीर ( म्हणजे डोकें, मान, गळा, पाठ, पोट, मांड्या, पाय, तंगड्या, खूर सुद्धां ) लांबच लांब केसांनीं मढवलेलं आहे. काय हें केसांचं ऐश्वर्य ! "

" यांचा धनी किंवा धनगर म्हणा, या मेंढयांवर फारच श्रीमंत होत असेल मग ? " रमाबाई म्हणाल्या.

" श्रीमंत ! हे मेंढपाळ आपल्या मेंढवाड्याच्या उत्पन्नावर टोलेजंग सुवर्ण-मंदिर बांधूं शकतील एवढे धनाढ्य होतात. " माधवराव म्हणाले.

" या पुढच्या प्राण्यांना कसली सरकस शिकविली आहे ? असे मागच्या पायांवर कां बसले आहेत हे ? " शरद् म्हणाली " आणि हे बसले आहेत तरी कशावर ? आणि हा तर बिळांतून बाहेर पडतो आहे वाटतें. "



प्रेअरी डॉग ( कुत्रा )

" तोंड उंदरासारखं दिसतें आहे आणि अंगांवर खूप केस आहेत यांच्या." वसंत म्हणाला " हे मातीचे ढीग यांनींच रचले आहेत का ? अबब किती तरी ढीग हे ! सर्व प्रदेशांतून सगळीकडेच पसरले आहेत कीं हे ? "

" हे या गवताळ प्रदेशांतले चिमुकले कुत्रे होत. हे या अमेरिकेंतल्या **प्रेअरी** प्रदेशांत सर्वत्र सांपडतात म्हणून यांना **प्रेअरी—कुत्रे** म्हणतात. मातीच्या ढिगांखालून यांचीं बिळें आहेत. यांत ते खूप धान्य सांठवून ठेवतात. " माधवराव म्हणाले.


" म्हणजे हीं यांचीं धान्याचीं कोठारें आहेत वाटतं ? " वसंत म्हणाला.

" हा पहा **प्यूमा** किंवा **अमेरिकन् चित्ता** " माधवराव म्हणाले. " आतांपर्यंत आपणांला या मार्जार—वर्गांतील प्राणी फारसे कुठें आढळले नव्हते. **ध्रुव-शीत-प्रदेशांत** या वर्गांतले प्राणी फारसे रहातच नाहींत. त्यांना फार थंड हवा मानवत नाहीं. तथापि **हिमव्याघ्र** ( **बरफ—वाघ** ) म्हणून एक जात आहे. तो प्राणी मात्र १८००० फूट उंचीच्या प्रान्तांत सुद्धां क्वचित् आढळतो आणि दिसावयासहि तो उमदा आणि डौलदार असतो असें म्हणतात. कारण त्याच्या अंगावर लांब शुभ्र केस असतात. **प्यूमा** हा आपली उपजीविका **अफाट-शिंगी** मारून त्यावर करतो. "

" हा करडा अस्वल; होय ना अण्णा ? हा मला माहीत आहे " वसंत म्हणाला.

" होय. अस्वलांच्या पुष्कळच जाती आहेत. करडा, काळा, पिंगट, इत्यादि त्यांच्या केसांच्या रंगांवरून त्यांना नांवें पडलीं आहेत."

" पांढरें अस्वल तुम्हीं दाखविलेंच आहे कीं अण्णा, " शरद् म्हणाली " त्याचप्रमाणें हे निरनिराळ्या रंगांचे ना ? "



प्यूमा.

" हा असा अवजड दिसतो ना, तरी तो झाडावर चढूं शकतो." माधवराव म्हणाले.

" आणि तो मागच्या पायानें चढतो; होय ना अण्णा ? " वसंत म्हणाला.


" कांहीं तरीच याचें ! " रमाबाई हंसत म्हणाल्या.

" अगदीं खरं आहे त्याचं. हा झाड-पाला, कंद-मुळें, तर खातोच. शिवाय किडे, मुंग्या सुद्धां खातो आणि मधहि—"

" बराच आहे कीं ! " रमाबाई म्हणाल्या.

" हा **करडा अस्वल** भयंकर शक्तिमान् आणि प्रचंड प्राणी आहे. हा या अमेरिकेंतील रॉकी-पर्वतांत आढळतो. हिमालयांतहि पुष्कळ अस्वल आहेत. रॉकी-पर्वतांतील अस्वल गवताळ प्रदेशांतहि पुष्कळ वेळां येतात. "

" ही तर **साळू** दिसते. " रमाबाई आपणहि एक प्राणी ओळखला अशा तऱ्हेनें ऐटींत म्हणाल्या.



**साळू.**

" ओळखलं बुवा खरंच. हा प्राणी शंकाकार अरण्यापासून तों रुंद पानांच्या झाडांचं अरण्य, गवताळ प्रदेश आणि इतरत्रहि पुष्कळ

ठिकाणीं आढळतो. हा दिवसांतून आपला बराच वेळ झाडांवर बसून काढतो. पण हा आपली रहावयाची जागा जमिनीवर दगडाच्या खबदाडींत तयार करतो. याच्या अंगावर हे पहा कसे बाणासारखे तीक्ष्ण दर्भाइतके जाड केस आहेत ते. कोणी शत्रु जवळ आला कीं हा आपले आंग फुगवून फडफडावितो. त्यासरशीं हे केस बाणासारखे बाहेर पडतात. हे दाभणासारखे केस जर का अंगांत शिरले तर त्यांपासून बरीच इजा होते. ज्या झाडांवर हे जाऊन बसतात, त्या झाडांवर पाला, कीं डाहाळ्या कीं साल, कांहीं म्हणजे कांहीं ठेवीत नाहींत; सगळें खाऊन फस्त करितात. शेतांना सुद्धां यांचा फार उपद्रव होतो. साळूप्रमाणेंच दिसणारा हा दुसरा प्राणी पहा. हा चेंडूप्रमाणें गोळा होऊन बसतो. याचें नांव बुइ-डुकर. कारण तो कुंपणाच्या आसऱ्याला राहतो आणि नेहमीं कुंपणाच्या आसपास असतो. ”



हज् हाग्. ( बुइ-डुकर )

“ मागच्या पायांवर उभा राहणारा हा उंदरासारखा कोणता प्राणी ? ” रमाबाई पुन्हां अभिमानपूर्वक म्हणाल्या.

" हा उंदीरच आहे, मात्र हा खूप उड्या मारीत जातो. कारण याचे पुढचे पाय फारच आंखूड असतात, त्यामुळें याला नीट चालतां येत नाहीं. आणि अन्न खाण्याच्या वेळीं जमिनीवर आडवा पडून पुढील पायांनीं कुरतुडून हा आपलें अन्न खातो. ज्याप्रमाणें आपल्याकडील उंदरांमुळें प्लेगाची सांथ चोहोंकडे पसरते त्याप्रमाणेंच या प्राण्यामुळेंहि प्लेग पसरतो. रशियाच्या दक्षिणभागीं **स्टेप्** नांवाच्या गवताळ प्रदेशांत



यांची संख्या पुष्कळ आहे. यांचा रंग करड्या वाळूप्रमाणें असतो. "

" हं, समजलं कां तें, हा प्रदेश याच रंगाचा असेल म्हणून ना ? " वसंत उत्तर—सूचक प्रश्न करून म्हणाला.

" होय. हा प्रदेश अर्धवट वालुकामय, अर्धवट पिंगट-गवताळ, असा असल्यामुळें एथील प्राण्यांचे रंगहि या प्रदेशाला जुळतील असेच असतात. "

" याचे डोळे दिसतच नाहींत हें कसें ? " शरद् म्हणाली.

" होय. याचे डोळे मोठे व बटबटीत असूनहि ते दिसत नाहींत हें खरें. कारण ते त्यानें मिटले आहेत. त्याला डोळे नाहींत असें नाहीं. "

" याचे पुढील पाय फारच तुटके दिसतात खरे. पण त्यांना तीक्ष्ण नखें आहेत " रमाबाई म्हणाल्या.

" नखं आणि दांत हीं तर या प्राण्यांचीं आयुधें. " माधवराव म्हणाले. " पण दुसऱ्या प्राण्याला मारण्याकरितां नव्हेत हो. स्वतःचें अन्न मिळविण्याकरितां आणि बिळें करून राहण्याकरितांच ते त्यांचा उपयोग करितात. "

" आई, केवढा साप हा ! " वसंत एकदम ओरडला.

" अगबाई, कुठें आहे तो ? ऊठ ऊठ शरद्, बाजूला व्हा ना ? " रमाबाई माधवरावांकडे पहात आणि झटपट खुर्चीवरून उठत किंचाळल्या.


" आई, या चित्रांतला हो. आपल्या इथें नाहीं कांहीं साप आलेला " शरद् हंसत हंसत म्हणाली.

" खरंच का ? खरोखरच मी घाबरलें होतें हो, " रमाबाई हंसतच पण उसासा टाकीत म्हणाल्या.

" बसा आतां खुर्चीवर. झाली ना त्रेधा ! " माधवराव किंचित् हंसरा चेहरा करून म्हणाले. " हा साप या **उत्तर-अमेरिकेंतील प्रेअरीच्या** प्रदेशांतच सांपडतो. जगांत हा दुसरीकडे

आढळत नाहींच. याच्या शेंपटीकडे पहा. तेथें मूठ बसविल्याप्रमाणें आणि आंगठी घातल्याप्रमाणें कशीं वळी दिसताहेत तीं. "

" खरंच कीं. " शरद् म्हणाली " मळसूत्राप्रमाणेंच दिसतें तें ?"



खुळखुळ्या साप.

" अण्णा, काय आहे हो हें ? " वसंत निरखून म्हणाला.

" तो त्याचा खुळखुळा आहे, म्हणून त्याला **खुळखुळ्या-साप** म्हणतात. जन्मल्यापासून दर वर्षी एक एक वळें, कधीं कधीं दोन दोन सुद्धां वाढत जातात. आणि वळ्यांवरून तो किती वयाचा आहे, याचा अंदाज बांधतां येतो. हीं वळीं बारा ते अठरापर्यंत सुद्धां वाढतात. "

" या खुळखुळ्याचा त्याला काय उपयोग ? " रमाबाई म्हणाल्या.

" उपयोग आहे तर. पण त्याच्या स्वतःच्यापेक्षां दुसऱ्या प्राण्यांना त्याचा चांगला उपयोग होतो. कारण हा सरपटत जाऊं लागला म्हणजे याच्या खुळखुळ्याचा आवाज होतो. ही इतर प्राण्यांना सूचनाच मिळते म्हणाना; कारण हा अतिशय विषारी आहे. "

" हा दिसावयासहि सुंदर दिसतो नाहीं ? याच्या अंगावर चिटाप्रमाणें कसे सुंदर नक्षीदार ठिपके आहेत पहा. " वसंत म्हणाला.

" सुंदर आहे खरा. पण कांहीं झालें तरी तो विषारीच ना ? " रमाबाई म्हणाल्या.

" पण तो होऊन कुणास चावावयास जात नाहीं. उलट आपण येत असल्याची सूचना तो देतो हा त्याचा गुण काय कमी समजावयाचा ? तो जात्या दुष्ट नाहीं. शिवाय तो अति मंदहि आहे. चावल्याशिवाय आतां आपली सुटका नाहींच, अशी जेव्हां त्याची स्थिति होते तेव्हांच तो चावतो. प्रथम तो फूत्कारतो. ( त्याचा फूत्कारहि भयंकरच असतो. ) नंतर आंग फुगवून ताठ होतो; आणि आपला खुळखुळा जोरजोरानें वाजवूं लागतो. एवढ्यानेंहि जर त्याची सुटका झाली नाहीं तर मात्र मग तो चावतो. " माधवराव त्या सापाची बाजू घेऊन म्हणाले.


" मग खरोखरच साप असूनहि गुणाचा म्हणावयाचा हा. " रमाबाई म्हणाल्या.

" या सापाचा शत्रु **गरुड** किंवा **मुंगूस** नसून **डुकर** आहे !" माधवराव आश्चर्यपूर्वक म्हणाले.

" अगबाई, **डुकर** याला खातो ? " शरद् जास्त अचंबा करीत म्हणाली.

" तें कसें हा ? अप्णा, डुकराला हा साप चावत नाहीं ? " वसंत म्हणाला.

" काय असेल तें असा. या सापाला डुकर खुशाल खातात. हा साप त्यांना चावतो खरा. पण याचें विष त्यांना बाधतच नाही. तिकडील डुकरहि अगदीं गुटगुटीत असतात. हें पहा एका डुकराचें चित्र. " माधवराव म्हणाले.



" अरेच्या ! हा आमच्या फुटबॉलाप्रमाणें दिसतो. केवळ त्याला पाय आणि तोंड आहेत एवढेंच काय तें. " वसंत म्हणाला.

" खरोखरच काय फुगलेला आहे हा. अगदी गलेलठ्ठ, जसें कांहीं ' भट्ट जेउनी तट्ट फूगले ' " शरद् मनःपूर्वक हंसत म्हणाली तेव्हां सर्वच पोट धरधरून हसलीं.

" असो, या गवताळ प्रदेशांच्या आणि रुंद पानांच्या झाडांच्या अरण्यांच्या दक्षिणेस बरेच मोठमोठाले वालुकामय प्रदेश आहेत. हे पहा ते प्रदेश. जगांत सर्वांत मोठा असा **सहारा वाळवंटाचा प्रदेश** तो

हा. तेथें हजारों मैल नुसती वाळू. टेकड्या वाळूच्याच. पण त्या आज इथें असतात तर उद्यां तिथें जातात."

"म्हणजे! त्या चालत जातात की काय? काय तरी मेलं सांगायचं झालं!" रमाबाई म्हणाल्या.

"तें कसं काय? अण्णा," दोन्ही मुलें म्हणालीं.

"ही नुसती वाळू असल्यामुळें जेव्हां एकसारखा वारा त्यावरून वाहूं लागतो तेव्हां वाळूचे ढीग एका जागेवरून दुसरीकडे जाऊन पडतात. उन्हाळ्यांत रस्त्यावरची धूळ आपल्या घरांत नाही का येऊन सांचत?" माधवराव म्हणाले.

"आणि आई म्हणतेच कीं घरांत धुळीचा कोण ढीग झाला आहे म्हणून!" आईकडे पहात शरद् म्हणाली.

"**राजपुताना व सिंध** यांच्यामध्येंहि अशा प्रकारचा एक वालुकामय प्रदेश आहे म्हणून मास्तर सांगत होते खरेंच; आणि **उंटाशिवाय** तेथें दुसरा प्राणी जाऊंच शकत नाहींना अण्णा?" वसंत म्हणाला.

"होय, **उंटाबद्दल व वाळवंटाबद्दल** तुझ्याच पुस्तकांत एक सुरेख धडा आहे. पहा तो वाचून; आणि यांनाहि पण वाचून दाखीव. उद्यां हें काम कर बरं, म्हणजे मला यावर वेळ घालवावयास नको. आज आपण एथेंच पुरें करूं. मात्र तुझें काम लक्षांत राहील ना वसंत." माधवरावांनीं शेवटचें वाक्य उठत उठतच उच्चारिलें.

"हो, हो." म्हणतच वसंतहि उठला. मग शरद्, वसंत, रमाबाई व माधवराव सर्वच निजावयास गेलीं.

# भूगोलावरील
# कांहीं विचित्र प्राणी.

## ( ४ ) वाळवंटाचे, तुरळक गवताचे आणि कांटेरी झुडुपांचे प्रदेश.

दुसऱ्या दिवशीं नेहमींप्रमाणें सर्व मंडळी दिवाणखान्यांत जमल्या नंतर माधवराव वसंतास म्हणाले "वसंत, **उंट आणि वाळवंटाच प्रदेश** याबद्दलची माहिती आपल्या आईला व शरद्‌ला वाचून दाखविलीस ना ?"

"हो, सर्व कांहीं वाचून दाखविलें. पण **उंटाला वाळवंटांतील जहाज** कां म्हणतात, हें आम्हांला नीट समजलें नाहीं" वसंत थोडासा खजिलपणें म्हणाला.

" एवढेंच ना, मी सांगतों कां तें." माधवराव चष्मा पुशीत म्हणाले " हें पहा, जहाजाचा उपयोग काय ?"

" समुद्रावरून इकडून तिकडे जाण्याकरितां जहाज असतें." वसंत म्हणाला.

" समुद्र केवढा असतो ?" माधवरावांनीं पुन्हां प्रश्न केला.

" खूप खूप लांब आणि रुंदहि तसाच." शरद् म्हणाली.

" होय. खूप लांब-रुंद म्हणजे समुद्रावरून केव्हां केव्हां दहा-दहा दिवस एकसारखा रात्रंदिवस प्रवास केला तरी जमीन, कीं झाड, कीं घर कांहीं म्हणजे कांहींच दिसत नाहीं; इतका मोठा तो असतो. आणि एवढ्या मोठ्या समुद्रावरून प्रवास करावयास काय बरें उपयोगीं पडतें ?"

" जहाज. " शरद् लागलीनें म्हणाली.

" बरें. आतां ज्याप्रमाणें समुद्र लांब व रुंद असतो त्याचप्रमाणें वाळवंटहि खूप लांब–रुंद असतें. आणि वाळवंटांतहि घर नाहीं, कीं झाड नाहीं, कीं रस्ता नाहीं. सगळीकडे नुसती वाळू लांबवर पसरलेली असते आणि वरती आकाश, म्हणजे हा एक वाळवंटाचा समुद्रच नाहीं का झाला ? "

" हो हो, समुद्रांत नुसतें पाणी असतें एथें त्याच्याऐवजीं वाळू. " वसंत आपणास आतां नीट सर्व कांही समजलें आहे या आविर्भावानें म्हणाला.

" अगदीं बरोबर. " माधवराव म्हणाले " आतां समुद्रावरून प्रवास करावयाला काय उपयोगीं पडतें ? "

" जहाज " शरद् म्हणाली.

" तसेंच या वाळवंटाच्या समुद्रांतून प्रवास करावयाला काय उपयोगीं पडतें ? "

" **उंट** " वसंत म्हणाला.

" मग **उंटाला** काय म्हणतां येईल ? " माधवराव म्हणाले.


" **वाळवंटांतील जहाज** " वसंत व शरद् एकदम म्हणालीं.

" हें मला माहीत होतें. पण समजावून कसें द्यावयाचें तेंच समजत नव्हतें " रमाबाई आपल्याकडे कमीपणा घेऊन म्हणाल्या.

" असो, या वाळवंटाच्या प्रदेशांत आणि साधारण गवताळ प्रदेशांत **उंट** व **घोडा** हे दोनच प्राणी मुख्यत्वें आढळतात; व या दोन्हीं प्राण्यांचा उपयोग मनुष्याला त्या प्रदेशांत फारच होतो. **उंट** व **घोडा** हे दोन प्राणी या **अरबस्तानांतील** लोकांना फारच प्यार आहेत. "

" आपल्या **हिंदु लोकांना** जशी **गोमाता** प्रिय वाटते तसेंच ना ? " रमाबाई म्हणाल्या.

" आपल्या **हिंदु लोकांना गाय** जशी प्रिय तशी ती पवित्रहि वाटते. नव्हे. **गोमातेच्या** पोटांत सर्वच **देव** वास्तव्य करितात अशीहि आपली समजूत आहे. इतकी थोर आपण **गायीला**



दोन वाशिंडांचा ( मद्दारींचा ) उंट.

मानतो. **अरबी लोकांचें** या प्राण्यांवर आपल्या प्राणाप्रमाणें प्रेम

असतें एवढें मात्र खरें. " माधवराव प्रेम व पवित्रता या दोहोंतील फरक दाखविण्याकरितां म्हणाले.

" खरंच, ' **एक अरब आणि त्याचा घोडा** ' ही गोष्ट मीं वाचली आहे. त्या गोष्टींत त्या अरबाचें आपल्या घोड्यावर असलेलें निस्सीम प्रेमच दाखविलें आहे. " वसंत म्हणाला.

" असो, तुम्ही एक मदार असलेला **उंट** पाहिलेला आहे. **पण** हा दोन मदारींचा **उंट** पहा. " माधवराव चित्र दाखवीतच म्हणाले.

" त्याचें हें डोकें आणि ह्या दोन मदारी अगदीं एका उंचींत दिसतात कीं ? " वसंत म्हणाला " एक मदार असलेल्या **उंटापेक्षां** हाच जास्त सुंदर दिसतो नाहीं ? "

" सुंदर तर आहेच. शिवाय दोन मदारींच्या मध्यभागीं खोगीर घालून अंबारींत बसल्याप्रमाणें मनुष्याला मोठ्या सुखानें तेथें बसतां येतें. त्याचप्रमाणें दोहों मदारींच्या दोन्ही बाजूंवर बरेंच सामानहि लटकवितां येतें. "

" खरोखरच हें एक वाळवंटांतून चालणारें घरच होत असेल नाहीं याचें ! " रमाबाई म्हणाल्या.

" या उंटाच्या अंगावरून ढोपरांपर्यंत लांब व तुळतुळीत असे बरेच केसहि दिसताहेत. " शरद् म्हणाली.

" या केसांचे सुंदर सुंदर गालीचे व पांघरुणेंहि करितात. आपल्या दिवाणखान्यांतला गालीचा उंटाच्या केसांचाच आहे. " माधवराव म्हणाले.

" आणि याच्या कातड्याचा उपयोग तंबू व राहुट्या करण्याकडे हे लोक करितात असें आमचे शिक्षक परवां **अरबस्तानासंबंधीं** पाठ देतांना म्हणाले खरें. " वसंत म्हणाला.

" **घोड्याचा** उपयोग वाळवंटापेक्षां गवताळ प्रदेशांतच फार होतो. कारण " माधवराव सांगणार तोंच—

" त्याचे खूर वाळूंत रुततात. म्हणूनच ना ? " शरद् म्हणाली.

" शिवाय **घोड्याला** आठ आठ दिवस पाण्याशिवाय राहतां येत नाहीं हेंहि एक मुख्य कारण असूं शकेल. " वसंत म्हणाला.

" हीं दोन्हीं कारणें अगदीं खरींच आहेत. त्याचप्रमाणें **घोड्याला** गवत लागतें. त्याला झाडपाला चालत नाहीं. पण **घोड्यावर** स्वार होऊन या **अरबीं** आणि **मध्यआशियांतल्या** लोकांनी मोठा धुमाकूळ घातलेला आहे. टोळधाडीप्रमाणें आजूबाजूच्या सर्व सुपीक प्रदेशांवर धाड घालून त्यांनीं कैकवेळां ते देश फस्त केले आहेत. हा **चीन**, हा **हिंदुस्थान**, हे देश तर राहोच पण या **युरोपखंडांतील** दक्षिणेकडचे हे सर्व एकूणएक देश आणि त्याचप्रमाणें या **आफ्रिकाखंडांतील नाईलनदी**कांठचा हा सुपीक प्रांत आणि सर्व उत्तर किनारा त्यांनी एका काळीं पादाक्रांत केलेला होता. नव्हे त्यांनी ठिकठिकाणीं राज्यें व साम्राज्येंहि स्थापन केलेलीं होतीं. "

" बरेच धाडशी लोक आहेत कीं मग हे ! " रमाबाई म्हणाल्या.

" आपले **शिवाजी, संताजी, धनाजी, बाजीराव, राघो भरारी** या सर्व शूर योद्ध्यांनी नाहीं का या घोड्यावरूनच कैक स्वाऱ्या मारिल्या ? **राघोबानें** आपला घोडा **अटकेपार** नेला होता ना ? " वसंत अभिमानपूर्वक म्हणाला. " ' **मुलांच्या महाराष्ट्रांत** ' या सर्व गोष्टी दिल्या आहेत. "

" आपला इतिहास आतां राहूं दे. आपण पुढचीं चित्रेंच पाहूं." माधवराव हंसत हंसत व मुलांचें कौतुक करीत म्हणाले.

" हें कसलें सोंग इथें बसलें आहे हें ! " शरद् पुढील चित्राकडे पहात म्हणाली. " तें भलें मोठें लांब रुंद आणि काळें पांढरें नाक वाटतें त्याचें ? "

" त्याच्या नाकपुड्या आणि तोंड हीं सारखींच दिसत आहेत कीं ? आणि डोळे किती बारीक! कपाळ किती चिंचोळें! सर्वच कांहीं विलक्षण आणि विद्रुप ! त्याला ठेवण अशी कांहीं नाहींच." रमाबाई म्हणाल्या.

" होय, हा प्राणी खरोखरच विचित्र दिसतो. **बबून**—नांवाच्या माकडांच्या जातींपैकीं **मॅनाड्रिल** नांवाचें माकड हें आहे. याचे रंगहि



**बबून.**

विलक्षण असतात. हा निळा, किरमिजी, शेंदरी अशा चित्रविचित्र रंगांचा असतो. " माधवराव म्हणाले.

" पण एकंदरीत अगदीं बेडौलच आहे हा. नाहीं अण्णा ? " वसंत म्हणाला " कपाळावर पांढरी पट्टी काय ? कान कुठें ? कशाला कांहीं मेळच नाहीं. "

" हा जितका कुरूप आणि विद्रुप आहे तितकाच तो क्रूरहि आहे. पण काय असेल तें असो ! **इजिप्त** देशांत यांना पवित्र मानून यांच्या मूर्ति करून त्यांची पूजा करण्याची चाल एकदां पडली होती. " माधवराव म्हणाले.

" आपल्याकडे आपण **मारुतीची** पूजा करीत नाहीं का ? " रमाबाई म्हणाल्या " **मारुती** जसा **रामाचा** एकनिष्ठ सेवक तसाच हा कोणातरी देवाचा सेवक असेल तिथें ? "

" हा अति खादाडखाऊ आहे. फळबागांतून का एकदां यांची

टोळी शिरली कीं एका रात्रींत ती फळबाग फस्त झालीच. ते झाडावर चढण्यांत अतिशय पटाईत आणि चपळ असतात. त्यांचा कळप असतो. कळपांत त्यांचा एक राजा ते निवडतात. त्याचें सर्वांनीं ऐकावयाचें असें ठरलेलें असतें. एकाद्या बागेंत शिरल्यावर किंवा रात्रीं झोपीं गेल्यावर टेहळणी करण्याकरितां म्हणून पहारेकरी नेमलेले असतात. ”

“ म्हणजे त्यांचे हें ‘ **चिमुकलें स्वराज्यच** ’ म्हणावयाचें ! ” वसंत ‘ **स्वराज्य** ’ शब्दावर जोर देऊन म्हणाला.

“ होय, ‘ **स्वराज्य** ’ तर खरेंच. कारण आपआपल्या कळपांत ते सुखानें राहतात. मात्र पुष्कळ वेळां कळपाकळपांत अतिशय मारामाऱ्या आणि भांडणें होतात. नव्हे तीं भांडणें म्हणजे त्यांच्या त्या लढाया होत. आणि या लढाया पिढयानपिढ्या चालतात. ” माधवराव म्हणाले.

“ मग त्यांच्यांत तहबिह होत नाहीं वाटतें कधीं? ” वसंत हसत म्हणाला.

सर्वांच्याच चेहऱ्यावर थोडीशी हास्याची छटा उमटली.

“ बरें, तें असो. ” माधवराव म्हणाले “ या माकडांना दारू फार आवडते. यांना पकडावयाचें झाल्यास प्रथम दारू पिण्यास देतात. आणि दारू पिऊन हे झिंगले म्हणजे मग यांना सहज पकडतां येतें. ”

“ पण यांना पकडावयाचें तरी कशाला ? ” शरद् म्हणाली.

“ कशाला म्हणजे ? पुष्कळ **इजिप्शिअन** लोक या माकडांना मांजर, पोपट, कुत्री, या प्राण्यांप्रमाणें पाळतात. यांना माणसांची संवय झाली म्हणजे मग मात्र हीं माकडें घरांतील मुलांबाळांशीं मोठ्या प्रेमानें वागतात. ” माधवराव म्हणाले.

“ ओहो ! दुधासारखे पांढरे पांढरे शुभ्र आणि सुंदर तरी किती

हे पक्षी हो, अण्णा ? '' शरद् म्हणाली. '' त्यांचा डौल तरी किती आहे. ? ''



राजहंस.

'' अग, हेच ते **हंस** हो, हे **हंस मानससरोवरांत** असतात न अण्णा ? '' आपल्याला या पक्ष्यासंबंधीं बरीच माहिती आहे हें दाख-

" होय, **हंसपक्षी** ज्यांना म्हणतात ते हेच होत. याला आपले लोक **ब्रह्मदेवाचें** वाहन समजतात." माधवराव म्हणाले. " **गरुडाला** ज्याप्रमाणें **श्रीविष्णूचें** वाहन समजतात किंवा **मोराला** ज्याप्रमाणें " माधवरावांना हें वाक्य पुरें करून देण्यापूर्वींच शरद् म्हणाली " **सरस्वतीचें** वाहन मानतात त्याचप्रमाणें **हंसाला ब्रह्मदेवाचें** वाहन समजतात असेंच कीं नाहीं. ! "

" यांच्या पायांना बदकाच्या पायांप्रमाणेंच पडदे असतात. चोंचाहि रुंद असते; पण ती बदकांच्या चोंचीपेक्षां डौलदार असते. ती तांबूस रंगाची असते. मानेची ठेवण पहा किती गोंडस आणि ऐटींत आहे ती ! " माधवराव म्हणाले.

" हा पक्षी केवळ कमळांचीं फुलेंच तेवढीं खातोना ? आणि **नलदमयंती आख्यानामध्यें सोन्याचा हंस** सांगितलेला आहे तो कोणता ? तो तर नुसती मोत्येंच खात असे असें सांगतात. " रमाबाई म्हणाल्या.

" या दोन्ही गोष्टींना कांहींच आधार नाहीं. केवळ त्या कवींनी करून दिलेल्या सुंदर समजुती होत. " माधवराव म्हणाले " हा पक्षी पाण्यांत नेहमीं पोहत असतो. आणि पाण्यांत उगवणाऱ्या निरनिराळ्या वनस्पति त्याचप्रमाणें मासेहि तो खातो. कमळांचीहि पानेंफुलें तो खातो. नाहीं असें नाहीं. "

" तो सदा पाण्यांत असतो म्हणूनच **आकाशगंगेंतल्या** कांहीं **तारकापुंजाला हंस** हें नांव दिलें आहे वाटतें ? " रमाबाई म्हणाल्या.

" तें एका अर्थी खरेंच आहे. **हंस** आपले पंख अर्धवट पसरून व आंत वारा घेऊन शांत अशा जलसंचयांत पोहूं लागला म्हणजे जें त्याचें सौंदर्य खुलून दिसतें तें खरोखरच अवर्णनीय आहे. " माधवराव म्हणाले. " **आकाशगंगेंतला हंस** असाच सुंदर दिसतो. "

" **मानससरोवरांतच** हे **हंस** पहावयाला मिळतात असें जें म्हण-

तात तें खरें का ? " रमाबाई आपल्या मनांतील शंकेचें निरसन करून घेण्याकरतां म्हणाल्या.

" या आपल्या **हिंदुस्थानदेशाच्या** उत्तरेस असलेल्या **हिमालय, हिंदुकुश, काराकोरम** या पर्वतप्रदेशांत हा आढळतोच. त्याचप्रमाणें तो या **आशियाखंडांतील** पूर्वेकडील **मंगोलिया** प्रांतापासून **युरोपखंडाच्या** पश्चिम भागापर्यंत ठिकठिकाणीं आढळून येतो. **युरोपखंडांतल्या** पाश्चात्य राष्ट्रांतल्या बऱ्याच राजांनीं व श्रीमंत लोकांनीं आपआपल्या उपवनांतून सुंदर जलाशयें मुद्दाम बांधून त्यांत या पक्षांना पाळलेलें आहे. इंग्लंडमध्यें हा सुंदरपक्षी राजघराण्यांतल्या लोकांशिवाय कोणीहि पाळूं नये असाहि एके वेळीं कायदा होता. "

" म्हणजे, एकादा पक्षी सुंदर असला तर राजघराण्यांतील पुरुषांचीच दौलत वाटते तो ? " वसंत दौलत या शब्दावर जोर देऊन म्हणाला.

" पूर्वीं तसें होतें खरें, आतां मात्र तसें कांहीं नाहीं. हा पक्षी दिसावयाला सुंदर असला तरी भांडणाचा प्रसंग आला असतां तो आपल्या पंखांनीं जोरजोरानें ठोसे देऊं शकतो. आणि चोंचीवाटें फूत्कारहि सोडतो. याचा आवाज तुतारीसारखा असतो. कित्येक हंस सुंदर शीळ घालतात. " माधवराव म्हणाले.

" शरद्, ही पहा **वाघ-सिंहांची** जोडी. " वसंत म्हणाला.

" खरंच की, आपण सरकशींत पाहिले होते त्यापेक्षां किती तरी मोठे आणि गलेलठ्ठ हे दिसताहेत ! " शरद् म्हणाली.

" अग वेडे, सरकशींतल्या **वाघ-सिंहां**पेक्षां चित्रांतले वाघ-**सिंह** कसे मोठे असतील ग ? " वसंत हंसत हंसत म्हणाला.

" आपलं शहाणपण पुरें हो, दिसावयाला हे अंगानें जास्त भरदार नाहींत का हो अण्णा ? " आपल्या वडिलांचें मत आपल्यास अनुकूल करून घेण्याकरतां त्यांचा हात आपल्या हातांत लडिवाळपणें घेऊन शरद् म्हणाली.


"खरंच आहेत हो. " शरद्च्या पाठीवरून हात फिरवीत माधवराव म्हणाले "हे वनांत स्वतंत्रपणें संचार करणारे **वाघ-सिंह** पिंजऱ्यांत चोवीस तास कोंडून ठेवण्यांत आलेल्या आणि चाबकाच्या माराखालीं दीन झालेल्या **वाघ-सिंहांपेक्षां** कितीतरी पटीनें सशक्त, बलवान् गुट-



वाघ.

मुटीत आणि प्रसन्न मुद्रा धारण करणारे असतात. **जंगलाचे राजेच** ते. त्यांना '**वनराज**' ही संज्ञा, हें नांव खरंच शोभतं "

" पण काय हो अण्णा; **सिंह** हा खरा राजा, कीं **वाघ** हा खरा राजा ? " वसंत म्हणाला.



" अरे, **सिंह** हा राजा आणि **वाघ** हा प्रधान असेल. " शरद् म्हणाली. त्यासरशीं मोठा हशा पिकला.

" **वाघ** हा शक्तीनं कांही कमी नाहीं. तो **सिंहाची** बरोबरसुद्धां करूं शकतो. पण दिसण्यांत **सिंह** हा अति भव्य असूनहि सुंदर दिसतो. त्याचे ते मानेवर लोंबणारे लांब लांब केस त्याच्या त्या उग्र मुद्रेस अपरिमित शोभा आणतात. शिवाय हा महा बलवान् असून सुद्धां त्याचा बांधा फारच गोंडस दिसतो. त्याच्या भव्य चेहऱ्यांत, त्याच्या कमानदार आयाळींत, त्याच्या बारीक कमरेंत, त्याच्या पीळदार पायांत, त्याच्या झुबकेदार शेपटींत, प्रत्येक भागांत सौंदर्य सांठवलेलें आहे. सिंहाकडे पाहण्यांत खरोखर मन रमतें. **वाघ** मात्र फारच भयंकर, क्रूर आणि उग्र दिसतो. त्याच्या शरीरावरील पट्टे त्याच्या उग्र स्वरूपांत जास्त भरच घालतात. शरीरहि अति बोजड असतें. या दोन्हीं चित्रांकडे तुम्ही निरखून पहा, म्हणजे मी म्हणतों तें तुमच्या लक्ष्यांत सहज येईल." असें म्हणून माधवराव कांहीं वेळ स्तब्ध बसले.

मुलांनीं व रमाबाईनीं चित्रांचें कांहीं वेळ निरीक्षण केल्यावर त्यांना खरोखरच हा फरक कळून आला. तेव्हां माधवराव पुढें म्हणाले " या दोघांचीहि गर्जना भयंकर असते. यांच्या गर्जनेनें आजूबाजूचा सर्व प्रदेश सर्व अरण्य, सर्व दऱ्याखोरीं दुमदुमून जातात. **सिंहाची** शक्ति इतकी प्रचंड असते कीं तो रेडा किंवा खोंड याचें डोकें तोंडांत धरून व शरीर पाठीवर अलगत टाकून सहज लीलेनें धावत जातो. **वाघाच्या** उडीपेक्षां **सिंहाची** उडी लांब तर जातेच पण ती जास्त सफाइदार व अचूक जाते. जर कदाचित् त्याची उडी फसली तर त्याची त्याला लाज वाटते, आणि मग तो निमूटपणें आपल्या जाळींत जातो. एकादे वेळीं तो संतापला म्हणजे आपल्या शेपटीनें स्वतःलाच तो तडाखे लगावून घेतो. शेपटीच्या शेवटीं जो सुंदर झुबका असतो त्याच्या टोकाला काट्यासारखे केस असतात. **वाघ-सिंहांना** विस्तव, दिवा, पेटलेली चूड यांची मात्र फार भीति वाटते. "

" हे प्राणी आपल्या **हिंदुस्थानांतच** सांपडतात की आणखीहि कुठें सांपडतात ? " वसंत म्हणाला.

" **वाघ** हा **आशियाखंडांतच** सांपडतो. **सिंह** मात्र **आशिया** आणि **आफ्रिका** या दोन्ही खंडांत सांपडतो. मात्र या दोघांहि प्राण्यांची संख्या पुष्कळच कमी झाली आहे. **वाघापेक्षां सिंह** जास्त चपळ आहे. आपल्या भक्ष्याची शिकार करण्याची पद्धत जरी दोघांची सारखी असली तरी **सिंह** जास्त वेळ पाठलाग करूं शकतो. पुष्कळ वेळां हे दोन्ही प्राणी जंगलांत पाण्याच्या ठिकाणीं दबा धरून बसतात. पाणी पिण्याकरितां हरीण, शेळ्या, मेंढ्या, रेडे, बैल यांसारखे प्राणी आल्यास हे एकाएकीं प्रचंड गर्जना करितात. त्यासरशीं त्या प्राण्यांची भीतीनें गाळण उडाली कीं एकदम त्यांच्यावर हे झडप घालतात. "

" शिकारी लोक यांची शिकार करितात, तेव्हां यांची भीति वाटत नाहीं का त्यांना ? " रमाबाई किंचित् भययुक्त स्वरानें म्हणाल्या.

" **वाघाची व सिंहाची** शिकार करावयास अंगीं विलक्षण शौर्य तर लागतेंच पण प्रसंगावधानहि पाहिजे. हल्लीं बंदुका, पिस्तुलें इत्यादि दुरून गोळी मारण्याचीं हत्यारें मिळत असल्यामुळें झाडावर बसून यांची शिकार करतां येते; म्हणून पूर्वीं इतकें शिकार करण्यांत हल्लीं भय राहिलें नाहीं हेंहि खरें. पण त्यांत भय मुळींच नाहीं असें मात्र नाहीं. रात्रीं अपरात्रीं रानांत झाडावर बसून या उग्र प्राण्यांची वाट पहात राहण्यास कांहीं कमी धैर्य लागत नाहीं. शिवाय निढावल्या-खेरीज कित्येक नव्या शिकारीलोकांची झाडावर बसून सुद्धां यांची गर्जना ऐकूनच गाळण उडते; मग बंदूक किंवा पिस्तूल जें कांही असेल तें त्यांच्या हातांतून गळून सुद्धां पडतें. "

" खरंच होत असेल बाई असं. " रमाबाई म्हणाल्या.

" **संभाजीमहाराजांनीं वाघाशीं** कुस्ती खेळून त्याची रग जिरविला असें जें कुणी कुणी म्हणतात तें खरं का हो अण्णा ? " वसंत म्हणाला.

" **संभाजीराजे** अति सामर्थ्यवान् आणि शूरहि होते यांत तिळप्राय शंका नाहीं. पण प्रत्यक्ष कोणत्याहि हत्याराशिवाय केवळ आपल्या बाहुबलावर त्यांनीं वाघाशीं कुस्ती केली कीं काय याबद्दल तितकासा ऐतिहासिक पुरावा नाहीं. मात्र अशी आख्यायिका आहे. आणि ती खरीहि असूं शकेल. कारण अजूनसुद्धां या आपल्या **सह्याद्रीच्या** पायथ्याशी असलेले शेतकरी लोक केवळ एकादी काठी घेऊन चित्त्यास किंवा वाघरास झोडपून काढितात. एकादे वेळीं हातांत कांहीं हत्यार नसतांना सुद्धां वाटेंत वाघरूची गांठ पडल्यास मनुष्य त्याबरोबर झटापट करतो असें आपण वर्तमानपत्रांतून ऐकतोंहि. तेव्हां **संभाजीसारखा वीर राजबिंडा वाघास** सहज चीत करीत असेल असें खरें मानण्यास बिलकूल हरकत नसावी. "

" हा कोणता प्राणी अण्णा ? याचे पुढचे पाय ताठ असून मागचे पाय कसे आंत वाकलेले दिसतात ते ! " शरद् म्हणाली, " तोंड आपल्या वाघ्यासारखे दिसतें पण शेपूट पहा कितीं केसांनीं भरलेलें आहे तें ! "

" हाच तो **तरस,** याचे मागचे पाय तूं म्हणतेस त्याप्रमाणेंच वाकलेले असल्यामुळें याला सरळ चालतां येत नाहीं. तोंड कुत्र्या सारखें आहे खरें पण याच्या मानेवर लहानसर आयाळ असते. गळ्याखालींहि थोडेबहुत लांब केस असतात. आंगभरहि केस असतात. एका जातीच्या **तरसाच्या** अंगावर पुसकट पुसकट ठिपके असतात, त्यामुळें त्याला कांहींशी शोभा येते. "

" **तरसाला** हलका पशु समजतात तें का बरं ? " वसंत म्हणाला.

" **तरस** काय, **कोल्हे** काय, किंवा **लांडगे** काय यांना कमीप्रतीचेच लोक समजतात. एक तर **वाघ-सिंहां**पेक्षां यांचा आकार क्षुद्र असतो, दिसावयालाहि हे बेढब असतात आणि हे सर्व पशु

मेलेल्या प्राण्यांचें मांस खातात. **वाघ सिंहांचें** विशेषतः **सिंहाचें** तसें नाही. त्यांनीं स्वतः मारलेला प्राणीच ते खातात. आणि **तरस, कोल्हे**



**तरस.**

आणि **लांडगे** हे **वाघ-सिंहांनीं** खाऊन उरलेल्या ( तेथून **वाघ-सिंह** निघून गेल्यावर ) त्या उष्ट्या भागावर उपजीविका करितात. **तरस** तर मढीं उकरून खातात." माधवराव पुढें कांहीं सांगणार तोंच "काय मेले घाणेरडे हे प्राणी!" असें रमाबाई सहजगत्या उद्गारल्या.


"घाणेरडे तर खरेच" माधवराव म्हणाले, "पण जगाचा एकंदरींत हे फायदाच करून देतात. **गिधाड, घार, कावळे, लांडगे कोल्हे, तरस** या सारख्या प्राण्यांनीं जर प्राण्यांचीं मृतशरीरें खाल्लीं नसतीं तर ही शरीरें कुजून हवेवर त्या घाणीचा खात्रीनें वाईट परिणाम झाला असता. **तरसाला** मात्र आणखीहि एक दुष्ट संवय आहे. तो पुष्कळ वेळां मुलांना व अर्भकांना चोरून नेऊन त्यांना खातो."

" तरसाबद्दल जी लोकांच्या मनांत अढी आहे ती उगाच नाहीं मग ! " वसंत म्हणाला.

" तो घाणेरडाहि तसाच आहे. **बॅजर** प्राण्याच्या शेपटीखालीं ज्याप्रमाणें एका घाण पदार्थाची पिशवी असते तशी पिशवी याहि प्राण्याच्या शेपटीखालीं असते. आवाज तरी काय बाळाचा ! कोल्ह्याप्रमाणें कुई कुई तर करतोच तो. शिवाय तो पुष्कळ वेळां खद-खदां हंसतो. थेट एखाद्या मनुष्याच्या आचरट हंसण्याप्रमाणें हंसतो."

" मग पुष्कळ लोक फसत असतील याच्या हंसण्याला. " शरद् म्हणाली.

" इतकें असूनहि माणसाळला म्हणजे विश्वासु कुत्र्याप्रमाणें घरावर पाहरा करण्याच्या कामीं हा फारच उपयोगीं पडतो. " माधवराव म्हणाले.



झांब्रा.


" सारेंच विलक्षण या प्राण्याचें ! " रमाबाई म्हणाल्या.

दुसरीं दोन चित्रें दाखवीत माधवराव म्हणाले "याच प्रदेशांत आणखी एक दोन प्राणी आहेत. ते हे पहा. हा **झीब्रा** आणि हा **जिराफ.** हे गवताळ प्रदेशांत राहतात. **क्विआंग** आणि **गॅझेली** नांवांचे प्राणी यांचेच भाऊबंद होत. "

" **झीब्र्याच्या** आंगभर पट्टे पट्टे आहेत आणि **जिराफाच्या** आंगभर मोठमोठालीं ठिगळें आहेत. " शरद् म्हणाली.

" पण **झीब्रा घोड्यासारखा** दिसतो आणि **जिराफ उंटासारखा** दिसतो. " वसंत म्हणाला.


" तुमचं दोघांचं वर्णन बरोबर आहे. **झीब्र्याच्या** अंगावरचे पट्टे काय किंवा **जिराफाच्या** अंगावरचे डाग काय ज्या प्रदेशांत हे प्राणी राहतात त्या प्रदेशाच्या एकंदर स्वरूपामुळेंच ते त्यांच्या अंगावर आहेत. सावली व ऊन यांचे पट्टे आलटून पालटून ज्या प्रांतीं विरळ झाडांमुळें पडतात तेथील पशूंच्या अंगावरच पट्टे व डाग आहेत. म्हणजे ज्याप्रमाणें ध्रुव प्रदेशांतील प्राणी शुभ्र पांढरे आढळले त्याप्रमाणें एथले प्राणी पट्या-पट्यांचे किंवा ठिपक्याठिपक्यांचे आहेत. भोंवतालच्या जागेचा आणि झाडाझुडुपांचा परिणाम प्राण्यांच्या शरिरावर पुष्कळवेळां बराच होतो. त्याचप्रमाणें हवेचाहि परिणाम कातडीवर होतो. थंड प्रदेशांतले लोक जास्त गोरे व अतिउष्ण प्रदेशांतले लोक काळेकुट्ट असतात. अति उष्ण नाहीं अति थंड नाहीं अशा प्रदेशांतले लोक, निमगोरे, पिवळे किंवा तांबडे असे आढळतात. प्राण्यांतहि तसाच प्रकार आहे. उष्ण प्रदे-शांतले आणि जंगलांत राहणारे प्राणी चित्रविचित्र रंगाचे असतात. ओसाड वाळवंटांतील प्राणी, भुऱ्या, करड्या रंगांचे असतात. गवताळ प्रदेशांतले व विरळ जंगलांतले प्राणी पट्यांचे आणि ठिपक्यांचे अस-तात; उदाहरणार्थ **वाघ, सिंह, झीब्रा, जिराफ** इत्यादि. असो, **हे** दोन्ही प्राणी अनुक्रमें झाड-पाला आणि गवत खाऊन आपआपली उप-



जिराफ.

जीविका कारितात. मात्र **जिराफ** हा कांटेरी झाड-पालासुद्धां खातो. आणि **झीब्रा** खुरटें गवत खाऊं शकतो. **जिराफाला** बऱ्याच उंचीच्या

झाडावरचा पाला खावयाचा असल्यास आपले पुढचे दोन्ही पाय झाडावर ठेवून आपली मूळचीच लांब मान जास्त ताणून व नाकपुड्यांनें



ओकापी.

हुंगून पानें पुढें ओढून घेऊन मग तीं तो खातो. मात्र पाणी प्यावयाचें झाल्यास त्यास फार त्रास होतो. पाणी पितांना त्याला आपले पुढचे पाय रुंद करून त्यांच्यामधून लांब मान खूप खालीं वाकवून मग

त्याला पाणी प्यावें लागते. पण पुष्कळ वेळां तो किती तरी दिवस पाण्याशिवाय राहूं शकतो. ”

“खरोखर **उंटा**चा भाऊच म्हणावयाचा हा ” रमाबाई म्हणाल्या, “ हे दोन्ही प्राणी अति चपळ आहेत. **जिराफ** हा आपल्या मागल्या पायांनीं हिंस्र पशूंना लाथा मारून त्यांना परतवूं शकतो, आणि त्याच्या उंचीमुळें व लांब मानेमुळें तो खूप दूरचेंहि पाहूं शकतो. आणि यामुळें त्याला शत्रूपासून आपला बचाव करतां येतो. **ओकापी** हा **जिराफ** व **झीब्रा** यांच्या मधला प्राणी आहे. म्हणजे त्याच्या अंगावर **झीब्र्या**सारखे पट्टे असतात तर तो **जिराफा**सारखा उंच असतो. ” मुलांना आतां झोपा येऊं लागल्यामुळें तीं पेंगूं लागलीं होतीं म्हणून संपविण्याच्या उद्देशानें माधवराव म्हणाले. “उद्यां आपणांला पृथ्वीवरील या सर्वांत कुग्रीर भागावर असलेल्या अति घनदाट अरण्यांत शिरून तेथील निरनिराळे प्राणी पहावयाचे आहेत. या अरण्यांत जगांतील बरेच अजस्र प्राणी राहतात. कोणते ते उद्यांच पाहूं. ” असें म्हणून त्यांनीं आटोपलेंच. मुलें उठलीं तशा रमाबाईहि निजानीज करण्याकरितां निघाल्या.

---

# भूगोलावरील
# कांहीं विचित्र प्राणी.

## (५) उष्णकटिबंधांतील घनदाट अरण्यांत वावरणारे प्राणी.

आदल्या दिवशीं सांगितल्याप्रमाणें **विषुववृत्तावरील** किर्र झाडीमध्यें वावरणाऱ्या प्राण्यांची माहिती सांगण्यास सुरवात करण्यापूर्वी माधवरावांनीं या घनदाट जंगलांची नीट कल्पना येण्याकरितां आज पुन्हा एकदां गोल व नकाशे यांच्या साहाय्यानें पृथ्वीवरील त्यांचें स्थान, तेथेंच इतकीं दाट जंगलें वाढण्याचें कारण व त्या जंगलांचें एकंदर स्वरूप इत्यादि गोष्टींची माहिती खुलासेवार सांगितली. वसंत, शरद्, आणि रमाबाई नित्याप्रमाणें आपआपल्या ठिकाणीं बसल्यावर माधवराव म्हणाले. " हें पहा, ज्या जंगलांतील प्राण्यांची माहिती आज आपण मिळविणार आहोंत तीं जंगलें **पृथ्वीवर** या **विषुववृत्ताच्या** दोहों अंगांस पांच पांच अक्षांशांपर्यंत म्हणजे उत्तरेस ३००–३५० मैल आणि दक्षिणेस ३००–३५० मैल पसरलेली आहेत. या टापूंत बाराहि महिने नित्य पाऊस पडत असतो. जसा पाऊस भरपूर पडत असतो तशीच येथील उष्णताहि एकंदरींत पुष्कळच असते. पाऊस पुष्कळ आणि उष्णताहि पुष्कळ . यामुळें झाडांची वाढहि झपाट्यानें आणि दाट म्हणजे अगदीं झाडाला झाड खेचून अशी होते. त्यामुळें जंगलांतून शेंकडों मैल जरी प्रवास केला तरी ( आणि प्रवास करावयाचा, म्हणजे पावलांगणिक झाडेंझुडपें आणि वेली यांचें जाळें

तोडूनच वाट काढावी लागते ) आंत उजेड किंवा मोकळी हवा मिळूं शकत नाहीं. बऱ्याच झाडांची उंची शंभर दीडशें फुटांहून जास्त असते. मात्र झाडें एकमेकांना चिकटून वाढत असल्यामुळें झाडांचा विस्तार असा होतच नाहीं; इतकीं निबिड अरण्यें **दक्षिण अमेरिकेंतील** या **ॲमेझॉन** नदीच्या कांठीं, **आफ्रिकाखंडांतील काँगो** नदीच्या कांठीं आणि **विषुववृत्तावर** असणाऱ्या या **जावा, सुमात्रा, बोर्निओ, ईस्ट इंडीज** इत्यादि बेटांतून हजारों मैल पसरलेलीं आहेत. त्याचप्रमाणें ज्या ज्या देशांत **मोसमी** म्हणजे वर्षांतून ठराविक वेळींच पण अतिशय पाऊस पडतो त्या त्या देशांत अशाच प्रकारचीं अरण्यें वाढलेलीं आहेत. पाऊस जरी चार पांच महिनेच पडला तरी तो इतका पडतो कीं, या पावसामुळें जमिनींत मुरलेला ओलावा वर्षभर पुरूं शकतो. **हिंदुस्थानांतील** या **आसाम** प्रान्तांतील **चेरापुंजी** एथें तर चार पांच महिन्याच्या अवधींतच ६०० ते ७०० इंच पाऊस पडतो. आपल्या पुण्यास सबंध वर्षामध्यें पंचवीस इंचांपेक्षां क्वचितच जास्त पाऊस पडत असला तरी **महाबळेश्वरी** तो ३५० ते ४०० इंचांपर्यंत पडतो. **हिंदुस्थानाप्रमाणेंच ब्रह्मदेश, सयाम, इंडोचायना, चीन, जपान** इत्यादि देशांतहि **मोसमी** पाऊसच पडतो. आणि या सर्व देशांतून थोडीं फार, कमी जास्त जंगलें वाढलेलीं आहेत.

या दाट जंगलाची तशी खरी कल्पना प्रत्यक्ष तसलें जंगल पाहिल्याशिवाय होणें शक्यच नाहीं. **मुंबईस** जातांना घाटामध्यें आपणांस बरीच झाडी दिसते खरी. पण ती झाडी या जंगलांच्या मानानें कांहींच नाहीं. **मुंबईस** जो आपण **राजबाई टॉवर** पाहिला तो कांहीं १५० फुटांपेक्षां जास्त उंच खास्तीनें नाहीं. १५ फूट उंचीचा एक मजला धरला तरी १५० फूट उंचीचीं झाडें म्हणजे तीं १० मजली घरांएवढीं उंच झालीं. आणि एकादें दुसरेंच असलें झाड नव्हे, तर हजारों लाखों झाडें एकमेकांस बिलगून वाढलेलीं. अशा अगदीं गर्द

झाडीची कल्पना आपणांस कशी येणार ? पण अशा जंगलांतूनहि मधून मधून नद्यांच्या कांठीं राहणारे कांहीं प्राणी आहेत; तेहि या जंगलांतील भयंकर देखाव्यास शोभतील असेच अजस्र आहेत. ''

रमाबाई आणि मुलें हें सर्व वर्णन अगदीं एकचित्तानें ऐकत होतीं. प्रत्येक जण आपआपल्यापरी स्वतःच्या मनामध्यें त्या विस्तीर्ण, निबिड आणि घनघोर अशा जंगलाची कल्पना करून राहिला होता. इतक्यांत माधवरावांनीं पुढील चित्र त्यांना दाखवून म्हटलें '' हा पहा, **ओरँग-**



**ओरँग-ऊटँग.**

**ऊटँग.** या **ओरँगऊटँग**सारख्या एका प्राण्यापासूनच आपली मनुष्याची जात उत्पन्न झाली बरं ! ''

'' कांहीं तरीच आपलं सांगणं ! हा तर एका धिप्पाड **माकडा**सारखा दिसतो आहे. आणि माकडापासून कधीं माणूस होईल का ? '' रमाबाई म्हणाल्या.

'' आपण रागावलांत म्हणजे एकादे वेळीं ' काय दिसतं आहे सोंग माकडासारखं ' असं वसंताला म्हणत नाहीं का ? तें काय

मग उगाच ? **श्रीरामचंद्रांनीं** माकड, वानर यांचीच नाहीं का मदत घेतली ? मारुती आणि माणूस यांत काय फारसा फरक आहे ? " माधवराव म्हणाले.

" त्या काय पुराणांतल्या गोष्टी खऱ्या कीं खोट्या कोणास ठाऊक. " रमाबाई हंसत म्हणाल्या. " बाकी वसंतास एकादेवेळीं मी **माकड** म्हणतें तें रागानें, तें काय खरं धरावयाचं ? "

" कां, आतां बाजू आपल्यावर घसरणार म्हणून पुराणांतल्या गोष्टी खऱ्या कीं खोट्या अशी शंका घेण्यापर्यंत पाळी आली होय ? " माधवराव उलट हंसून म्हणाले.

" आई, खरंच आतां मात्र पुराणांतल्या गोष्टी खोट्या नाहीं का ? " वसंतहि म्हणाला.

" तें कांहीं का असेना ? हल्लींच्या शास्त्रज्ञांनीं वानरापासून नर म्हणजे मनुष्य कसा निर्माण झाला याची जुळणी नीट लावण्याचा चांगलाच प्रयत्न केला आहे. त्यांना एक मधलाच तेवढा दुवा पाहिजे आहे. तेवढा दुवा त्यांना सांपडला—आणि तो केव्हांना केव्हांतरी सापडेल अशी त्यांना खरोखरची आशाहि वाटत आहे—म्हणजे मग त्यांचा सिद्धान्त आपल्याला मान्य करावा लागेलच. " माधवराव गंभीरपणें म्हणाले.

" हं, हं. अद्याप हा दुवा सांपडत नाहीं ना ? तेवढं एक बरं आहे मग. तोंपर्यंत तरी ही भीति नाहीं म्हणावयाची. **माकड** कुठें आणि मनुष्य कुठें ! त्यांच्यांत कांहींसा, किंचित् सारखेपणा असला, म्हणून कांहीं वानरापासून कधीं नर उत्पन्न होणं शक्य आहे ? " रमाबाई आनंदून म्हणाल्या.

" किंचित् का ? पुष्कळच साम्य आहे. आपण उभं राहून ताठ चालूं शकतों त्याचप्रमाणें कांहीं कांहीं वानर—हे **ओरँग ऊटँगच**— आपल्या मागील पायांवर चालूं शकतात. आणि त्यावेळीं त्यांचे

पुढचे पाय खरोखरच हातासारखे दिसतात. गॉरिला, माकड, वानर, ओरँग-ऊटँग इत्यादि या वर्गातले सर्व प्राणी मनुष्याप्रमाणें बसतात व आपल्या पुढच्या पायांनीं म्हणजे हातांनीं—कारण त्यांना दंड, पुढचा हात, तळहात, बोटें सर्व कांहीं मनुष्याच्या हाताप्रमाणेंच असतात—वस्तु धरूं शकतात. त्यांच्या डोक्याची आणि चेहऱ्याची एकंदरींत ठेवण मनुष्यप्राण्याच्या डोक्याप्रमाणें आणि चेहऱ्याप्रमाणेंच असते. रंगांत, आणि केसांत मात्र फरक असतो, तेवढंच काय तें." माधवराव साम्य बरेंच स्पष्ट करून दाखविण्याच्या हेतूनें म्हणाले.

"पण मग त्यांना शेपटी असते तशी आपल्याला कुठें आहे?" शरद् फरक दाखविण्याच्या हेतूनें म्हणाली.

"हो खरंच, शरद् तूं माझी बाजू आतां छान संभाळलीस." रमाबाई शरदच्या पाठीवरून हात फिरवीत म्हणाल्या. "साम्य जास्त आहे कीं फरक जास्त आहे पहा."


"साम्य जास्त आहे कीं फरक जास्त आहे तें मग पाहूं. पण वानरापासून नर कसा झाला असेल हें मात्र मला समजलं. मी सांगतों कसं तें." वसंत म्हणाला, "हे पहा, वानर शब्दांतला वा गाळला कीं नर हा शब्द राहतो. आणि नर म्हणजेच मनुष्य. म्हणजेच माकडाचा मनुष्य झाला कीं नाही? आणि वा अक्षर म्हणजेच हा मधला दुवा जो इतके दिवस सांपडत नव्हता तो."

वसंताची हीं कोटि ऐकून सर्वांनाच हंसू लोटलें. आणि माधवरावांनीं तर त्याला आपल्यापुढें घेऊन कुरवाळून म्हटलें, "शाबास शाबास वसंत, आपण मोठेच शास्त्रज्ञ झालांत. मुलीनें जशी आपल्या आईची बाजू राखली तशी तूं माझी बाजू छान राखलीस खरं."

"पण शेंपटीचं काय?" शरद्ला किंचित् हेवा वाटल्यामुळें ती चिडून म्हणाली.

"शेंपटीचं ना. अग, वा गळतां क्षणींच शेंपटी गळून पडली."

वसंत कुर्यांत पण विनोदपूर्वकच म्हणाला. तेव्हां जास्तच हसूं पिकलें.



## गॉरिला.

"हा पहा याच वर्गातला हा दुसरा प्राणी **गॉरिला.**" माधवराव म्हणाले "त्याचीं पाउलें पहा कशीं मनुष्याच्या पावलांसारखीच आहेत कीं नाहींत तें. त्याचं बसणं पहा. त्याचे हात पहा आणि त्यानें आपले हात कसे ठेवले आहेत तेंहि पहा. दिसतो आहे कीं नाहीं हा जवळ जवळ मनुष्याप्रमाणें?"

"आई, आमच्या शाळेच्या वाटेवर एक म्हातारी भिकारीण बसते ती थेट अशीच दिसते. तिचे डोळे असेच. चेहराहि असाच. कान मात्र एवढे मोठे नाहींत." शरद् म्हणाली.

"याचे ओठ शिद्द्याच्या ओठांप्रमाणेंच जाड दिसतात नाहीं?" वसंत म्हणाला.

"होय. हा रंगानेंहि शिद्द्याप्रमाणेंच काळा काळाकुट्ट असतो आणि याची शक्तिहि इतकी अचाट असते की पांच सहा माणसांना तो भारी होतो. शरीरहि तसेंच प्रचंड असतें. मात्र हा प्राणी केवळ शाकाहारी,

म्हणजे नुसतीं कंदमुळें आणि अरण्यांत होणारी सर्व प्रकारचीं फळ एवढींच खाऊन आपली उपजीविका करतो. '' माधवराव म्हणाले. '' केव्हां केव्हां मात्र मनुष्यांनी लाविलेल्या बागांतून शिरूनहि हा लुटालूट करितो. ''

'' केवळ शाकाहारी असूनहि हा शरीरानें धट्टाकट्टा आणि मजबूत असतो ना ? केवळ कंदमुळें आणि फळफळावळ खाऊनच जर प्रचंड शक्ति कमावितां येते, तर डॉ. **मुंजांनीं** सर्वांना मांसाहारी होण्याबद्दल उपदेश करण्याचा जो सपाटा चालविला आहे तें कां मग ? '' रमाबाई म्हणाल्या. कारण **डॉ. मुंजांचें** नुकतेंच **शिवाजीमंदिरांत** झालेलें एक व्याख्यान त्यांनीं ऐकलें होतें.

'' **डॉ. रुईकर** म्हणजेच **स्वामी लवणानंद** हे ज्याप्रमाणें ज्याला त्याला सपाटून मीठ खाण्याबद्दल सांगत तशांतलाच हा प्रकार आहे. पण त्यांत अगदींच तथ्य नाहीं असें नाही. '' माधवराव म्हणाले, '' कारण या **गॉरिला** प्राण्याला ज्याप्रमाणें सदा ताजी रसभरित फळफळावळ किंवा कंदमुळें मिळतात त्याप्रमाणें आपल्याला कुठें मिळतात ? शिवाय हा एक विश्वासाचा प्रश्न आहे. ''

'' हा रानटी मनुष्य पाहिलास कसा उकिरडा बसून झाडावरचें फळ तोडून खात बसला आहे तो ! काय त्याच्या पोटाचा नगारा हा ! आणि पाय किती बुटके त्याचे ! '' शरद् म्हणाली.

'' आणि त्यानें डोक्याला काय कानटोपी घातली आहे ? कीं टोपरें घातलें आहेन तें ! कपाळ तर काय दीड बोटच रुंद आहे त्याचें ! '' वसंत म्हणाला.

'' अगदीं मनुष्यासारखाच दिसतो आहे ना हा ! पण त्याचीं पाउलें कशी विचित्र आहेत तीं पहा ! त्याचा आंगठा चार बोटांना चिकटून नाहीं कांहीं. हाताच्या आंगठ्याप्रमाणें तो सुटा आणि वेगळा आहे. या प्राण्याला **चिंपँझी** म्हणतात. ही एक माकडाची

जात आहे. याच्या डोक्यावरील केसांची ठेवण अगदीं कानटोपी-



चिंपँझी.

प्रमाणें आहे ना ? रात्रीं निजतांना कांहीं लोक ज्याप्रमाणें कान-कपाळ झांकणारी टोपी डोक्याला घालतात तशीच ही दिसते. नव्हे, याच्या केसांसारखी कानटोपी दिसते; म्हणूनच तिला माकड-टोपी (मंकी कॅप) म्हणण्याची पद्धत पडली आहे. **चिंपँझी** हाहि **गॉरिला** सारखा फळफळावळ कंदमुळें तर खातोच पण हा कांहीं कांहीं प्राण्यांनाहि मारून खातो. म्हणजे हा शाकाहारी असून मांसाहारीहि आहे. **गॉरिला** आणि **चिंपँझी** हे दोघेहि दाट जंगलांत राहणारे प्राणी आहेत. आणि एथील जंगलें इतकीं दाट आणि विस्तीर्ण असतात कीं या वानरांना सबंध आयुष्यांत सुद्धां जमिनीचा स्पर्श करण्याचें कारण पडत नाहीं. त्यांचा सर्व व्यवहार तर झाडांवर होऊं शक-तोच शिवाय त्यांना हजारों मैलांचा प्रवासहि झाडांवरूनच करितां येतो. या झाडांवर या माकडांची वस्ति एवढी असते कीं कित्येक वेळां सर्व जंगलच यांनीं गजबजून गेलेलें असतें. ''

" आपल्या **पुण्यांतील** कांहीं वडांच्या झाडांवर ज्याप्रमाणें

वटवाघुळें दर पानागणिक खालीं डोकें वर पाय करून लोंबलेलीं असतात, त्याप्रमाणेंच असेल ? " वसंत म्हणाला.

" अगदीं छान उदाहरण घेतलेंस तूं. " वसंताला शाबासकी देत माधवराव म्हणाले. " वटवाघुळांचे घोळके ज्याप्रमाणें किलबिलाट करीत संध्याकाळचे झाडांभोंवती घिरट्या घालूं लागतात त्याप्रमाणेंच या वानरांच्या आणि माकडांच्या टोळ्या सकाळ होतांच किलबिलाट करीत, या झाडावरून त्या झाडावर उड्या मारीत, फांद्यांना लोंबकळत, दांत विचकीत अनेक प्रकारच्या चेष्टा कुचेष्टा करूं लागतात. त्यामुळें या अरण्यांतून सर्वत्र माकडांचेंच साम्राज्य असतें असें म्हटल्यास फारसें वावगें होणार नाहीं. "

" या इतक्या माकडांचा आणि वानरांचा मनुष्यांना कोणता उपयोग होत असेल ? " वसंत विचार करीत म्हणाला.

" अरे, **श्रीरामचंद्रांना** या वानरांनीच नाही का अप्रतिम साहाय्य केलें ! **सीतेचा** शोध **मारुतीनें** किती लवकर लाविला ! नाहीं तर **रामलक्ष्मणांना** वनांतून हिंडून **सीतेचा** शोध लावण्यासच कोण त्रास झाला असता ! " रमाबाई पुराणांतला दाखला देऊन या माकडांचा उपयोग किती होतो हें दाखविण्याच्या उद्देशानें म्हणाल्या.

" आई, त्या पुराणांतल्या गोष्टी झाल्या ग ! आज प्रत्यक्ष आपणांस त्यांचा काय उपयोग होतो हें मला कळावयास हवें आहे. अण्णा, आहे का यांचा कांहीं उपयोग ! की आपलें झाडांवरच आपलें साम्राज्य अबाधितपणें त्यांनीं चालविलें आहे ? " वसंत थोडासा मोठा आव आणूनच म्हणाला.

" यांचा उपयोग नाहीं कसा ? मनुष्यप्राण्याला तर यांचा उपयोग एका दृष्टीनें फार म्हणजे फारच झालेला आहे; आणि होणारहि आहे. मीं मघाशीं सांगितलेंचना, की माकड आणि मनुष्य यांच्या शरीररचनेंत फारसा फरक नाहीं म्हणून. त्यामुळें ज्या ज्या वेळीं एकाद्या रोगावर एकाद्या

नवीन औषधाचा शोध लावून त्या औषधाची उपयुक्तता आणि गुण सिद्ध करावयाचे असतात आणि त्यांचें प्रमाणहि ठरवावयाचें असतें, त्या त्या वेळीं नवे नवे शोध लावणारे डॉक्टर लोक आपल्या नवीन औषधाची खात्री करून घेण्याकरितां या माकडांवर आणि इतर अशाच प्राण्यांवर आपल्या रसशाळेंत प्रथम त्याचा प्रयोग करून पाहतात. ज्या नानाप्रकारच्या लशी तयार होतात त्यांचा मनुष्य–प्राण्यावर सररास उपयोग करण्यापूर्वी माकडांच्या अंगांत त्या लशी टोंचून घालून, त्यापासून होणारा परिणाम लक्ष्यांत घेऊन त्यांची उपयुक्तता सिद्ध झाल्यावरच त्या लशी बाजारांत इतर डॉक्टर लोकांच्या उपयोगाकरितां पाठविण्यांत येतात. ”


“ मनुष्यापायीं अशा प्राण्यांचा मग खूप संहारहि होत असेल ?” या प्राण्यांबद्दल वाटणारी दया दाखवीत रमाबाई म्हणाल्या.

“ मनुष्यप्राणी हा आपल्या सुखाकरितां सर्वच प्राण्यांची हत्त्या करणारा आहे हें जरी एका अर्थी खरें असलें, तरी हे शोध लावणारे थोर थोर डॉक्टर लोक एकंदर मानवजातीवर उपकारच करून ठेवीत आहेत हेंहि तितकेंच खरें आहे. माकडांच्या शरीरांत कांही मांसल ग्रंथी असतात, त्या ग्रंथी मनुष्याच्या शरीरांत घातल्यास म्हातारा मनुष्यहि तरुण जवान होतो, अशा प्रकारचा एक शोध नुकताच एका विद्वान् डॉक्टरानें लाविला आहे. पहावें आतां या शोधामुळें किती म्हातारे लोक तरुण होतात तें ! ” माधवराव कांहींसें गांभीर्यानें व कांहींसें विनोदानें म्हणाले.

“ म्हातारे लोक तरणे होणार ! ” रमाबाई चकित होऊन उद्गारल्या.

इतक्यांत माधवरावांनी पान उलटल्यामुळें शरद्चें लक्ष त्या पानावरील चित्राकडे गेलें. त्यासरशीं ती म्हणाली. “ अण्णा, हें पहा केवढं धूड आहे तें ! आकार तर टोणग्यासारखा दिसतो आहे. आणि नाकावर शिंग कसेंल हें ? ”

" अण्णा, हा **गेंडा** ना हो ? म्हशीच्या किंवा टोणग्याच्या डोक्यावरील शिंगाऐवजी नाकावर एक शिंग ठेवलें की **गेंडा** होतो असें परवां आमचे शिक्षक सांगत होते. " वसंत म्हणाला.



गेंडा.

" होय, या प्राण्याला **गेंडाच** म्हणतात. कित्येक **गेंड्यांनासुद्धां** नाकावरच दोन दोन शिंगें असतात. हा रेड्याप्रमाणें जरी दिसत

असला तरी याच्या अंगावरील जाड जाड कातडीच्या मल्या मोठ्या वळकट्या झालेल्या असतात, हा रेड्यापेक्षां पुष्कळच धिप्पाड असतो. **आफ्रिका** आणि **आशियाखंडां**तील जंगलांतल्या दलदलीच्या प्रदेशांत राहणारा हा प्राणी आहे. हा रानटी लोकांप्रमाणें स्वरोखरच अति रानटी, रागीट, आणि दुष्ट बुद्धीचा असून क्रूरहि तसाच असतो. दिसण्यांत या प्राण्याइतका कोणताहि प्राणी अवजड, बेढब, आणि बेडौल नाहीं. कांहीं प्राणी त्यांची कुरापत काढिल्याशिवाय ते मनुष्याच्या वाटेला जात नाहींत. या प्राण्याला मनुष्य दिसला रे दिसला कीं त्याचें पित्त खवळतें; आणि मनुष्याच्या अंगावर तो अति त्वेषानें व सपाट्यानें धावून जातो. कित्येक वेळां केवळ आपली रग जिरविण्याकरितां तो मोठमोठाल्या झाडांच्या बुंध्यावरच तुटून पडतो व त्यांच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडवितो."

"अगबाई ! मग अशा **गेंड्या**च्या तावडींत सांपडलेल्या मनुष्याचें चंदनच उडत असेल !" शरद् भीतभीतच म्हणाली.

"मनुष्याचें लक्ष नसल्यास तूं म्हणतेस तसेंच होतें." माधवराव म्हणाले. "पण मनुष्याचें लक्ष असल्यास त्याला **गेंड्याची** मुसंडी सहज चुकवितां येते. कारण **गेंडा** हा अति वेगानें येत असतो आणि त्याचें अंग अवजड असल्यामुळें त्याला सहज वळतां येत नाहीं."

"रान-डुकराच्या मुसंडीपासून जसे शिकारी लोक आपला बचाव करितात त्याप्रमाणेंच असेल हें." वसंत म्हणाला. "कारण रान-डुकरालाहि सहज वळतां येत नाहीं असें मीं कुठेंसें वाचिलें आहे."

"होय, रानडुकरालाहि सहज वळतां येत नाहीं हें खरं आहे. बहुतेक सर्व अवजड देहाच्या प्राण्यांना लवकर वळतां येत नाहीं; म्हणूनच मनुष्याचा त्यांपासून बचाव होतो." माधवराव म्हणाले. "मात्र

जरी यांचा देह विशाळ असला तरी हे प्राणी पळण्यांत कमी चपळ नसतात. रागावलेला गेंडा भरधांव पळणाऱ्या घोड्यापेक्षांहि जास्त वेगानें धांवतो. ''

'' रेड्याप्रमाणेंच हा काळा काळा रोम असतो का ? '' रमाबाई म्हणाल्या.

'' हा काळा असतो खरा. पण याच्या कातडीला एकप्रकारची तकाकी आणि तुळतुळीतपणाहि असतो. त्यामुळें सूर्यप्रकाशांत पुष्कळ वेळां याचें शरीर ( विशेषतः पाठ ) बहुतेक पांढरें दिसतें. त्यामुळें काळ्या गेंड्याप्रमाणेंच पांढरे गेंडे असावेत असा लोकांचा कांही दिवस समज होता; पण तो चुकीचा आहे. ''

'' रेड्याप्रमाणेंच गेंडाहि पाण्यांत आणि चिखलांत लोळत असेल मग ? '' वसंत अटकळ बांधीत म्हणाला.

'' खरंच, आपली म्हैस एकदां का नदीकांठच्या एखाद्या डबक्यांत जाऊन बसली म्हणजे किती वेळ तरी तिला तेथून हलावयाला नको असतं. '' शरद् म्हणाली.

'' आणि तुलाहि एकदां का तूं मोरींत आंघोळीस गेलीस म्हणजे तासन् तास तेथून बाहेर यावयाला नको असतं. '' रमाबाई चेष्टेनें म्हणाल्या.

'' हें काय ग आई ? '' शरद् लडिवाळपणें म्हणाली.

'' ए म्हैस ! '' वसंत शरद्ला चिडविण्याच्या हेतूनें म्हणाला.

'' आणि तूं कावळा, काय आंघोळ करतो ! धड अंगसुद्धां भिजत नाहीं. '' शरद् चिडूनच म्हणाली.

'' माझें अंग काय म्हशीसारखें थोडेंच शेण आणि चिखल यांनी माखलेलें असतें ? '' वसंत उलट शांतपणें म्हणाला.

'' वसंत, शरद्, तुमचं भांडण राहूं दे आतां. '' माधवराव दोघांनाहि शांत करण्याकरितां म्हणाले. '' या प्राण्यास नेहमींच पाण्यांत

गाणि चिखलांत बसावयास आवडतें; म्हणून याची कातडी जाड व नेबर असते. कातडं इतकें जाड, टणक आणि लवचीक असतें कीं याच्यावर तलवारीचा वार तर राहोच, पण बंदुकीची गोळी सुद्धां कैक ळीं लागत नाहीं. ”



पाणघोडा.

" म्हणूनच याच्या कातडीच्या ढाली करीत होते ना ? " वसंत विचार करीत म्हणाला.

" अबबब ! हा काय या प्राण्याचा जबडा कीं एक खोलखोल खबदाड आहे हें ? " रमाबाई **पाणघोड्याकडे बोट करून म्हणाल्या.**

"याचा गळा कोणता आणि धड कोणतें ? दोन्ही सारखेचि किल्ल्याच्या बुरुजाप्रमाणें भली मोठी वाटोळीं दिसताहेत ! " वसंत हातांनीं आकार दाखवीत म्हणाला.


" आणि कानांचीं नुसतीं भोकेंच दिसताहेत ! हत्तीला सुपासारखे कान तर याला उंदरासारखे इवले इवले कान ! मजाच आहे म्हणावयाची ! " शरद् खूपच आश्चर्य दाखवीत म्हणाली.

" **विजापूरच्या मुलुखमैदान** तोफेसारखाच एकूण याचा आकार दिसतो आहे. चाकांऐवजीं खालीं रुंद रुंद आणि भले मोठे जाड पण बुटके पाय लावलेले तेवढे दिसताहेत. " वसंत म्हणाला.

" तुमचं सगळ्यांचं वर्णन अगदी खरं आहे. याला **पाण-घोडा** म्हणतात. **घोडा** कसला ? खरोखर तो **हत्ती**एवढा अजस्र असतो. हा प्राणी **आफ्रिका** खंडांत राहतो. हा आपला बहुतेक सगळा वेळ पाण्यांतच घालवितो. त्याला दहा दहा मिनिटें पाण्याखालीं बुडी मारून बसतां येतें. त्याच्या नाकपुड्यांवर जाड कातडीचा एक पडदा असल्याकारणानें त्याच्या साहाय्यानें आपल्या नाकाचीं भोकें तो बंद करूं शकतो. त्यामुळें श्वास आंत कोंडून राहतोच. शिवाय आंत पाणीहि जात नाहीं. याचा देह इतका अवजड आणि अजस्र असूनहि या प्राण्याला पाण्यांत पोहतां येतें. याची कातडीहि जाड आणि तेलकट असून कातडीच्या बाजूस चरबीचे थरचे थर असतात. या चरबीच्या उष्णतेमुळेंच त्याच्या शरीरांत ऊब राहते. "

" **वाघ-सिंहां**प्रमाणेंच हे प्राणी एकएकटे राहतात की कळप करून राहतात ? " वसंत चिकित्सापूर्वक म्हणाला.

“ हे प्राणी कळप करूनच राहतात. एकएका कळपांत वीसपासून पंचवीसपर्यंत यांची संख्या असते. आणि इतक्यांची जलक्रीडा एकाद्या नदीच्या डोहांत सुरू झाली म्हणजे तो देखावा खरोखरच मोठ्या बहारीचा दिसत असेल. कांही आपल्या मुखांवाटे पाण्याचे झोत



हत्ती.

उंच उडवीत असतात, तर कांहीं नाकपुड्यांच्या वाटे पाण्यांत भात्याप्रमाणें हवा भरतात; कोणी पाण्यावर तरंगत असतात तर कोणी पाण्यांत बुड्या मारून बसतात; तर कोणी एकमेकांवरून बेलाशक उड्या मारीत असतात. त्यासरसें पाण्याचे लोट प्रचंड लाटेप्रमाणें उंच उसळतात. आणि यांचा खेळ असा रंगांत चालला असतांना जर एकादी नौका त्यांच्या तडाख्यांत सहज सांपडली तर तिचे तुकडे न् तुकडे झाले म्हणावयाचे ! ” इतकें सांगून

माधवराव कांहीं वेळ स्तब्ध राहिल्यानंतर त्यांनीं पुन्हां सांगण्यास सुरुवात केली. ते म्हणाले, " या प्राण्याचा जबडा एवढा मोठा असतो आणि आंतील दांत इतके तीक्ष्ण आणि भले भक्कम असतात कीं एका चाव्यांत हा प्राणी मनुष्याचे दोन तुकडे करूं शकतो. या प्राण्यांचा उपयोग कसा होतो पहा. हा प्राणी नद्यांतून वाढणाऱ्या वनस्पतीवर आपली उपजीविका करतो. नद्यांच्या पात्रांतून वनस्पति उगवल्यामुळें त्यांचा प्रवाह अडविला गेला असता, पात्र उथळ झालें असतें आणि गाळ साचून नद्या तुंबून गेल्या असत्या. पण या प्राण्यांचे थवे नेहमीं प्रवाहांतून खालीं-वर जात-येत असल्यामुळें आणि पाण्यांत वाढणाऱ्या वनस्पति आपल्या दांतांनी तोडून तुकडे करून खात असल्यामुळें तुंबलेल्या कालव्यांतून गाळ काढल्याप्रमाणें नद्यांची पात्रें नेहमीं मोकळीं राहतात. असें झालें नसतें तर नद्यांच्या मुखांशेजारी वनस्पतीचा बांध पडून नद्यांचें पाणी सर्वत्र पसरून बराच प्रदेश पाणथळीचा झाला असता. हा पहा आपल्या ओळखीचा प्राणी **हत्ती**. मात्र आपण जे **हत्ती** पाहतों त्यांपेक्षां हा निराळा आहे. हा आफ्रिका खंडांतील जंगलांतला **हत्ती** होय. आफ्रिका खंडांतले हत्ती फार मोठे असतात. जमिनीवरून चालणाऱ्या सर्व प्राण्यांमध्यें हा सर्वांत मोठा आहे. पण हा प्राणी गेंड्याप्रमाणें जात्या दुष्ट नाही, उलट या प्राण्याइतका अंतःकरणाचा प्रेमळ आणि अत्यंत विश्वासु प्राणी हाच होय. असें असूनहि आफ्रिका खंडांत याचा विलक्षण संहार केला जात असे, पण या संहारावर अलीकडे कायद्यानें नियंत्रण घालण्यांत आलें आहे."

" **हत्ती** लहान मुलांना चांगलें संभाळतो असं मी ऐकलं आहे तें खरं असेल का ?" रमाबाई म्हणाल्या.

" यांत कांहीच शंका नाहीं. **हत्ती** हा अत्यंत मायाळू आणि विश्वासु आहे हें मीं सांगितलेंच. शिवाय तो बुद्धिमानहि तसाच आहे., रानटी स्थितीत तो अतिशय आडदांड असतो खरा; पण

माणसाळल्यानंतर तो एवढा सामर्थ्यवान् असूनहि आपल्या माहुताच्या आज्ञा अक्षरशः पाळतो. नव्हे, माहुताच्या आठ–दहा वर्षांच्या मुलाच्यासुद्धां हुकमाप्रमाणें तो वागतो. माहुताच्या सर्व कुटुंबावरहि त्याचें प्रेम असतें. हत्तीच्या पुढ्यांत आपल्या तान्ह्या मुलाला सांभाळण्याकरितां ठेवून माहुताची बायको कुठेंहि निश्चिंतपणें चार घटका जाऊं शकते. "

" काय ? सर्व प्राण्यांत धिप्पाड असूनहि मनुष्यांच्या तान्ह्या मुलांना हा संभाळतो ! " वसंताला भारीच आश्चर्य वाटल्यामुळें त्याला आश्चर्य प्रकट केल्याविना राहवेना. " त्याचा पायबीय त्या मुलावर पडत नाहीं कसा ? खरोखर आश्चर्यच हें ! "

" हत्तीचा पायबीय तर मुलाच्या अंगावर पडत नाहीच. पण अशा वेळीं त्या ठिकाणी दुसरें एकादें हिंस्र श्वापदहि येण्यास धजत नाहीं. नव्हे, त्या मुलाला त्याच्या सोंडेबरोबर खेळून खेळून झोंप लागल्यास त्याला माशा, डांस, घुंघुरटी, यांपासूनसुद्धां त्रास पोहांचूं शकत नाहीं. कारण याची सोंड एकसारखी त्या निजलेल्या मुलाभोंवतीं फिरत असते आणि आपण ज्याप्रमाणें आपल्या हातांनीं माशा हाकतों त्याप्रमाणेंच **हत्ती** आपल्या सोंडेनें माशा, डांस, चिलटें यांना हाकीत असतो. "

" **हत्ती** आणि त्याच्या पुढ्यांत मूल ! आपण उगाच भितों हत्तीला मग ! " शरद् म्हणाली. " आणि तें मूल जागें झाल्यावर रांगत रांगत इकडे तिकडे गेलें तर ? "

" त्या मुलाला हत्ती दूर जाऊं देतच नाहीं. तें जाऊं लागल्यास त्याला तो आपल्या सोंडेनें इतकें हलकें धरतो कीं त्या मुलाला यत्किंचित्‌हि धक्का पोंहचत नाहीं. आपण एकाद्या नाजूक फुलाला आपल्या हातांत जसें अलगत धरितों, त्याप्रमाणेंच तो त्याला धरतो आणि मग पुन्हां जाग्यावर ठेवतो. "

" हत्ती आपल्या सोंडेनेंच त्याच्यापुढें पडलेल्या गवताच्या ढिगांतून चवलीसारखें नाणेंसुद्धां उचलून घेतो असें एका धड्यांत मीं वाचलें आहे; तें मग खरें असेलच. " वसंत म्हणाला.

" होय. चवली का ? टाचणीसुद्धां तो शोधून काढून उचलून देतो. " माधवराव म्हणाले.

" त्याच्या इवल्याशा डोळ्यांना टाचणी दिसते ? " शरद् म्हणाली.


" डोळे लहान असले म्हणून काय झालें ? त्याची दृष्टि तीक्ष्ण आहे. त्याचप्रमाणें त्याच्या नाकाला खूप दूरचा वास येतो. आणि सोंडेला कसलाहि स्पर्श कळतो. त्यामुळें यदाकदाचित् जर तो आंधळा झाला तरीहि त्याला इकडे तिकडे जातां येतें. "

" अरण्यामध्यें हा मोठमोठालीं झाडें मोडून खातो ना ? " वसंत म्हणाला.

" त्याच्या सोंडेचा जोरहि कांहीं विलक्षणच आहे. मोठमोठाले वृक्ष तो सहज लीलेनें उपटूं शकतो. याच्या या प्रचंडशक्तीचा मनुष्यानें भरपूर उपयोग करून घेतला आहे. लाकूड तोडण्याचा धंदा ज्या जंगलांतून चालतो त्या जंगलांतील तोडलेल्या मोठमोठ्या तुळया, ओंडके, यांना ओढून नेण्यास हत्तींचे तांडे लावतात. आपल्या हिंदुस्थानांत म्हैसूर, नेपाळ वगैरे संस्थानांतून माणसाळलेल्या हत्तींचे केवढाले तरी कळप आहेत. एक हत्ती माणसाळला की त्याच्या मदतीनें दुसरे हत्ती पकडतां येतात आणि माणसाळवितां येतात. ब्रह्मदेश, सयाम, मलाया, या देशांतल्या आणि आफ्रिकेच्या जंगलांत रानटी हत्तींचे केवढाले तरी कळप असतात. "

" एवढा मोठा अजस्र आणि प्रचंड शक्तीचा हा प्राणी असूनहि सुसरीनें जर का याचा पाय आपल्या जबड्यांत धरला तर याची कींव करण्यासारखी स्थिति होऊन हा चिरचिर असा किंचाळतो ना ? " रमाबाई म्हणाल्या. " ' गजेंद्रमोक्ष ' या आख्यानांत असं वर्णन

आलें आहे की त्या हत्तीला सोडवावयास त्याच्या मुलाबाळांचा सर्व कळप आला होता, तरी त्याची सुटका झाली नाहीं. ''



सुसर.

'' आई, ती गजेंद्रमोक्षाची गोष्ट सांगशील आम्हांस केव्हां तरी ? '' ' ~ ग्माबाईचा हात आपल्या हातांत घेऊन म्हणाली..

" होय, सांगेन हं. ती कथा फारच सुरेख आहे," शरद्च्या अंगावरून हात फिरवीत रमाबाई म्हणाल्या.

" ही पहा **सुसर**. आफ्रिकेंतल्या बहुतेक मोठमोठ्या नद्यांच्या डोहांतून भल्या मोठ्या **सुसरी** घर करून राहतात. ही **लिंपोपो नदी** म्हणजे **सुसरींची** नदी." माधवराव म्हणाले. " **हत्ती** पाणी प्यावयास किंवा पाण्यांत क्रीडा करण्यास जेव्हां नदीवर जातात तेव्हां **सुसरीच्या** जबड्यांत जर का त्यांच्यापैकीं एकाद्याचा पाय सांपडला, तर त्याच्या पायाचा तुकडा पडल्याशिवाय त्याची सुटका होणें शक्य नाहीं. केव्हां केव्हां या **सुसरी** एक, दोन, तीन, चार, चांगल्या पांच, सहापर्यंत सुद्धां नदीच्या तीरावर वाळवंटांत ऊन खाण्याकरितां येऊन पडतात."

" खरोखरच हिच्या आंगभर केवढाले खवले आहेत हे ! म्हणूनच ' सुसरबाई, सुसरबाई तुझी पाठ मऊ ' म्हणतात ना ? " रमाबाई म्हणाल्या.


" म्हणजे काय ? अण्णा, " शरद् म्हणाली.

" **सुसरीची** पाठ खवले असल्यामुळें मऊ असणार कीं राठ असणार ? " वसंत म्हणाला.

" अरे, ती एक तशीच गोष्ट आहे. सांगेन ही तुह्मांला केव्हां तरी. " माधवराव ह्मणाले.

" ओ हो ! एथें हें एक पक्ष्यांचें जंगी संमेलनच भरलें आहे कीं ! " वसंत तोंडावर बोटें ठेवून ह्मणाला. " हे सर्वच पक्षी **हंसा**-प्रमाणें एकजात शुभ्र आहेत. यांची मान आणि पाय मात्र खूपच लांब आहेत म्हणून, नाहीतर यांना **हंसच** म्हणतां आलें असतें." वसंत जास्त बारकाईनें पहात म्हणाला.

" बरोबर आहे तुझं. यांना **हंस** न म्हणतां ' **हंसक** ' म्हणतात. यांचे पाय लांब असल्यामुळें ' **दीर्घपाद** ' असेंहि नांव यांना देण्यांत आलें आहे. " माधवराव म्हणाले. " यांचें संमेलन भरलें आहे खरें.



हंसक (फ्लेमिंगो).

पण तें मूक-संमेलन आहे. नद्यांच्या उथळ पाण्यांतून हे कितीवेळ तरी एका पायावर उभे असतात."

"म्हणजे हे **बगळे** कीं काय?" रमाबाई पुन्हां चित्र पाहून म्हणाल्या. "कारण **बकपक्षी** सुद्धां मासे धरण्याकरितां असंच ध्यान


लावून तासन् तास बसतात असं सांगतात. आणि तेहि उडतांना पांढरे शुभ्र दिसत असून असेच लांब पायाचे असतात."

"होय, **बगळे, करकोचे, हंसक,** हे जवळ जवळ एकाच वर्गातले पक्षी आहेत." माधवराव म्हणाले. "पण **बगळ्याची** मान इतकी सुरेख नसते. **हंसक** पक्ष्यानें कशीहि मान केली तरी ती गोंडस व सुंदर दिसते. **बगळ्याच्या** पाठीवर भुरा रंग असतो. पण यांच्या शुभ्र पंखांच्या खालीं जो पिसारा असतो त्यावर गुलाबी रंगाची छटा असल्यामुळें प्रातःकाळच्या सूर्यबिंबाप्रमाणें यांच्या पाठीवर लकाकी मारते. त्यामुळें या पक्ष्यांना एक प्रकारची विशेष शोभा येते. **बगळ्यांचा** कळप अनेक रांगा करून डोक्यावरून आकाशमार्गें उंच उडून जात असतांना ज्याप्रमाणें पांढरा शुभ्र ढगच वाऱ्यामुळें जोरानें लोटला जात आहे कीं काय असें वाटतें, त्याप्रमाणेंच **हंसक** पक्ष्यांचा कळपहि आकाशांतून उडून जात असतांना रसरसलेल्या अग्निकुंडांतील ज्वालांप्रमाणें आरक्तवर्णाचे पिंजलेल्या कापसाचे अनेक पोळ एकत्र होऊन डोक्यावरून उंच सपाट्यानें वहात चालले आहेत कीं काय असें वाटतें. उडत जाणाऱ्या **हंसक** पक्षाचा डौल तर फारच बहारीचा दिसतो. त्याची लांब मान जशी पुढें फेकलेली असते तसे त्याचे पाय पाठीमागें ताणलले असतात त्यामुळें मान, धड आणि पाय एका रेषेंत येतात."

"हे पक्षी भूगोलावरील कोणत्या भागांत आढळतात?" वसंत म्हणाला.

"हे ना? या **भूमध्यसमुद्राच्या** किनाऱ्यावरील प्रदेश, **केपवर्ड बेटें, आफ्रिका खंड, मॅडगास्कर** बेट, **हिंदुस्तान, सिलोन,** त्याचप्रमाणें **दक्षिण-अमेरिकेंतील आर्जंटिना, चिली** इत्यादि भागांत म्हणजे विषुववृत्ताच्या दोहों अंगांस ३५ अक्षांशांपर्यंत येणाऱ्या बऱ्याच प्रदेशांतील नद्या, सरोवरें आणि इतर पाणथळ जागा यांच्या कांठीं आढळ-

तात. " हे सर्व देश नकाशावर क्रमवार दाखवीतच माधवरावांनीं सांगितलें.



क्रौंचपक्षी.

" एथें हें दुसऱ्या पक्ष्यांचें संमेलन नाचवीच चालला आहे की काय ? " शरद् **क्रौंच**-पक्ष्यांच्या चित्रा-

कडे बोट करून म्हणाली. " हा पहा मधला पक्षी. तो आपले दुरंगी पंख पंख्याप्रमाणें पसरून डौलानें कसा ठुमकत आहे ! "

" यांच्या डोक्यावर पिंजारलेले तुरे आहेत वाटतें ? " वसंत म्हणाला. " त्यामुळें तर यांना जास्तच डौल आला आहे. **मोर** पक्षी असाच नाचतो ना अण्णा ? "

" यांचीहि मान लांब आहे आणि पायहि लांब आहेत. यांच्या डोक्यावर जरी तुरा असला तरी यांच्या मानेची ठेवण **हंसकाच्या** मानेप्रमाणें डौलदार दिसत नाही. " रमाबाई म्हणाल्या.

" हेच ते **क्रौंच** पक्षी. कांही जातीच्या **क्रौंच** पक्ष्यांच्या डोक्यांवर असे तुरे नसतात. यांना '**सारस**' असें संस्कृत भाषेंत सुंदर नांव दिलें आहे, आपण मराठींत यांना **करकोचा** म्हणतो. हे पक्षी निरनिराळ्या ऋतूंत निरनिराळ्या कटिबंधांतील प्रदेशांत आढळतात. हिंवाळ्या दिवसांत **मध्य-आफ्रिका, हिंदुस्थान,** यांसारख्या उष्ण दशांतील नद्या, सरोवरें, तळीं, यांच्या कांठी ते येऊन राहतात; तर वसंत ऋतूंत आणि उन्हाळ्या दिवसांत हेच पक्षी **रशिया, जर्मनी, स्कँडिनेव्हिया, सायबेरिआ, लॅपलँड्** इत्यादि थंड प्रदेशांत **उत्तरमहासागराच्या** बर्फाच्छादित किन्याऱ्यावर जाऊन वस्ती करतात. म्हणजे प्रत्येक वर्षी यांना हजारों मैलांचा प्रवास आकाशांतून करावा लागतो. आणि हा प्रवास ते मोठ्या मौजेनें करतात. कारण एवढ्या मोठ्या प्रवासास निघाल्यामुळें वाटेंत त्यांना मोठमोठ्या नद्यांच्या तीरांवर विश्रांतीकरितां थांबावें लागतें. या ठिकाणीं ते आपला अल्पोपहारहि मिळवितात. त्यामुळें ताजेतवाने झाल्यामुळें त्यांना पुढचा प्रवास सुखानें करितां येतो."

" यांचें हें विमानोड्डाणच म्हणावयाचें ! " वसंत म्हणाला. " पण हें विमान वाटेंत कांहीं नादुरूस्त व्हावयाचें नाही ना ? "

" **करकोचापक्षी** डोक्यावरून उंच उडून जात असतांना करकुंचू

असा आवाज करीत जातो ना ? म्हणूनच त्याला **करकोचा** पक्षी म्हणत असतील नाही ? " रमाबाई म्हणाल्या.

" होय, यांचा आवाज तुतारीसारखा दूरवर पोहोंचतो. यांच्या श्वास-नलिकेला तुतारीसारखेच वळसे असतात आणि म्हणून यांचा तुतारीसारखा आवाज येतो. " माधवराव म्हणाले.

" **धर्मराजाला** प्रश्न करणाऱ्या **यक्षानें क्रौंचाचेंच** रूप घेतलें होतें ना ? " रमाबाई महाभारतांतील गोष्ट आठवून म्हणाल्या.

" होय, तशी महाभारतांत गोष्ट आहे खरी. " माधवराव म्हणाले.

" हा एक वेगळाच पक्षी दिसतो आहे. " वसंत म्हणाला.

" याला पंख आहेत, पिसं आहेत आणि चौरीप्रमाणें अंगावर ढाळत असलेला नेच्यांच्या पानांसारखा भरपूर पिसाराहि आहे. "



**नंदनवन-पक्षी.**

" हा एक अत्यंत सुंदर पक्षी आहे. याला **नंदनवन-पक्षी** म्हणतात. जणू कांहीं तो स्वर्गातूनच खालीं उतरलेला आहे." माधवराव म्हणाले. " खरोखर हा कावळ्याच्या वर्गातला पक्षी. परंतु याच्या डोक्यावर आणि मानेवर मखमलीप्रमाणें मऊ मऊ पिसें असतात. डोक्यावर सुरेख शेंदरी रंग असून गळ्यावर पाचेसारखा हिरवा रंग असतो. खांद्यापासून सर्व पाठीवर सोनेरी छटा असून सर्व पिसारा नारिंगी रंगाचा असतो. हा पिसारा दोन फूट लांबीचा असतो, पंखहि सोनेरी असतात. म्हणजे सर्वच शरीर चित्रविचित्र रंगांनीं माखलेलें असतें. मध्यभागीं तारांच्या जाळ्याप्रमाणें दहाबारा पिसें विणलेलीं असतात."

" आपल्याकडे **मोर** पक्षी इतकाच सुंदर आणि चित्रविचित्र रंगाचा असतो ना ? तो आपला हिरवा, निळा, जांभळा, सोनेरी डोळ्यांचा पिसारा पसरून नाचूं लागला म्हणजे अतिशयच मनोहर दिसत नाहीं का ? " रमाबाई म्हणाल्या.

" होय, या **उष्णकटिबंधांतील** अरण्यांतले बहुतेक पक्षी फारच चित्रविचित्र रंगाचे असतात." माधवराव म्हणाले. " या प्रदेशांत हरतऱ्हेच्या निरनिराळ्या वनस्पति वाढत असल्यामुळें आणि त्यांना नाना तऱ्हेचीं चित्रविचित्र पानें, फुलें येत असल्याकारणानें या अरण्यांत वावरणाऱ्या पक्ष्यांचा रंगहि पानांफुलांप्रमाणें चित्रविचित्र असतो. **ध्रुवप्रदेशांत** राहणाऱ्या प्राण्यांचा रंग जसा पांढरा, गवताळ व खडकाळ प्रदेशांत राहणाऱ्यांचा जसा भुरा, पिंगट पट्ट्यापट्ट्यांचा, किंवा ठिपक्यांचा असतो त्या नियमाला अनुसरूनच या प्रदेशांत राहणारे पक्षी अनेक रंगी असतात."

" पण अण्णा, **मोराला** जसा चित्रविचित्र रंगाचा पिसारा असतो तसा पिसारा **लांडोरीला** कुठें असतो ? " वसंत म्हणाला.

" बऱ्याच प्राण्यांमध्यें नर हे जास्त सुंदर असतात. आणि मादीनें आपल्याशीं लग्न लावावें म्हणून मादीपुढें हे आपला डौल

मिरवितात. हा **नंदनवन-पक्षी** काय, **क्रौंच** पक्षी काय, **मोर** काय किंवा **कोंबडा** काय मादीपुढें आपला सुंदर पिसारा पसरून नाचावयास लागतो. **नंदनवन-पक्षी** तर १२ ते २० पर्यंत जमून मादीपुढें आपला नाच करूं लागतात. मग मादी प्रसन्न होऊन त्यांपैकीं एकाशीं आपलें लग्न लावते."

"हें एक '**स्वयंवरच**' म्हणावयाचें मग !" रमाबाई हंसत हंसत म्हणाल्या.

"**स्वयंवर** तर खरेंच. पण इकडे **स्वयंवर** चालू असतांच मध्यें विघ्न येऊन त्यांचें **स्वातंत्र्य-हरणहि** याच वेळीं होतें. यांचा नाच अगदीं रंगांत येतो. आणि ते बेभान होतात. ही संधि साधून फासे-पारधी यांच्या अंगावर एकामागून एक बोथट बाण टाकतो, त्या सरशीं हे पक्षी एका पाठोपाठ एक बेशुद्ध होऊन खालीं पडतात. अशा तऱ्हेनें या पक्ष्यांना जिवंत पकडून आणि त्यांना विकून फासे-पारधी पुष्कळच संपत्ति मिळवितात."

"हे पक्षी कोणत्या प्रदेशांत सांपडतात ?" वसंत म्हणाला.

"हें पहा **न्यूगिनी** नांवाचें **विषुववृत्ता**जवळचें बेट." माधवराव म्हणाले. "या बेटांत आणि आजूबाजूच्या बेटांत या जातीचे पक्षी पुष्कळ सांपडतात. असो. आज चारपांच दिवस **उत्तरध्रुवा**पासून **विषुववृत्ता**पर्यंतचे प्रदेश आणि त्यांत आढळून येणारे निरनिराळे प्राणी आपण पहात आलों. उत्तर गोलार्धांतील **ध्रुवप्रदेशा**पासून **विषुववृत्ता**-पर्यंत आपले बहुतेक प्रदेश पाहून झाले. आतां दक्षिण गोलार्धांतील कांहीं मजेदार प्राणी आपणांस पहावयाचे आहेत. या गोलार्धांत आपल्याला धावणारे पक्षी, दोन पायांवर चालणारे चतुष्पाद, उडणाऱ्या खारी आणि अंडी घालणारे पशु असे विशेष विचित्र विचित्र प्राणी आढळतील. मात्र या गोलार्धांतील भूप्रदेश तुटक तुटक आहेत. सलग नाहींत. त्यामुळें प्रत्येक खंडांतले कांहीं कांहीं प्राणी पुष्कळच वेग-

ळाले असल्याकारणानें विषुववृत्तापासून दक्षिणध्रुवाकडे क्रमानें न जातां निरनिराळ्या भूखंडांतले प्राणी पृथक् पृथकच आपण पाहूं. बरं शरद्, वसंत, उठा आतां; आज फारच रात्र झाली आहे, तेव्हां आतां सर्वांनींच एकदम निजावयास जावें हें बरं. ''

# भूगोलावरील
# कांहीं विचित्र प्राणी.

## (६) द. आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि इतर बेटें.

संध्याकाळच्या जेवणाच्या आधींपासूनच आज कोणत्या विचित्र प्राण्यांची आपल्याला माहिती मिळणार आहे, याबद्दल वसंत, शरद् व रमाबाई या सर्वांनाच सारखी उत्सुकता लागून राहिली होती. धावणारे पक्षी, दोन पायांवर चालणारे, आणि अंडीं घालणारे पशु, उडणाऱ्या खारी, हे प्राणी कसे असतील याबद्दल त्यांना राहून राहून अचंबा वाटत होता. आणि त्यांच्या सर्व गोष्टी याबद्दलच चालल्या होत्या.

माधवराव ऑफिसांतून आल्यावर मुलांनी त्यांच्या भोंवतीं एकच गिल्ला केला. आणि "आम्हांला केव्हां एकदां पुढचीं चित्रें पहावयाला मिळतील असें झालें आहे." असें ती म्हणालीं.

माधवरावांनी त्यांना शांतपणें एकच उत्तर दिलें:—

"आतां जेवल्यानंतर सर्व कांहीं दाखवितोंच आणि सांगतोंच ना?"

पण मुलें अधीरतेनें पुन्हां तेंच तेंच विचारीत आणि माधवराव नेमकें तेंच उत्तर देत.

एकदांचीं सर्वांचीं जेवणें झालीं. जेवणांत चित्त होतें कोठें? सर्वांनाच आतुरता असल्यामुळें हातावर पाणी पडतांच मुळीसुद्धां वेळ न गमावतां सर्वजणें दिवाणखान्यांत जमा झाली. रमाबाईहि लगबगीनें तेथें आल्या.

माधवरावांना सर्वांची तीव्र उत्सुकता पाहून थोडें स्मित केलें आणि म्हटलें " मुलांनो, आज तुमची ही अनावर उत्सुकता पाहून मला खरोखरच आनंद होत आहे. तुम्हांलाच नव्हे तर या तुमच्या आईला सुद्धां आज केव्हां चित्रें पाहीन व माहिती ऐकेन असें झाल्याचें तिच्या चेहऱ्यावरून दिसत आहे. असो. आतां जास्त भाषण न वाढवितां आपण एकदम हीं चित्रेंच पाहूं. "

" हा पहा **शहामृग,** " पहिलें चित्र दाखवीत माधवराव म्हणाले.

" पाहूं पाहूं, केवढा मोठा हा पक्षी ! " शरद् अचंबा करीत म्हणाली.

" पक्ष्यासारखा तो दिसतो आहे, खरं ना ? पण त्याला उडतां कुठें येतें ? " माधवराव म्हणाले.

" एवढा मोठा पक्षी आणि त्याला उडतांसुद्धां येऊं नये ? काय मेलं विचित्र ! " रमाबाई त्या पक्ष्याची कीव करीत म्हणाल्या.


" मग काय ? तो नुसताच चालतो ? " वसंतानें प्रश्न केला.

" होय, पण तो सर्व चालणाऱ्या प्राण्यांत अति चपळ आहे. आणि तो किती उंच आहे, माहीत आहे ? हा प्राणी ७ फूट उंच असतो. आणि याचा आवाज **सिंहाच्या** गर्जनेसारखा घुमतो. मात्र त्याची आणखी एक गंमतच आहे. शत्रूपासून आपला बचाव करण्याकरितां म्हणून हा पक्षी आपलें तोंड भुसभुशीत अशा जमिनीत किंवा वाळूंत खुपसतो. पण याचा नेमका उलटा परिणाम होऊन तो आयताच शत्रूच्या हातीं सांपडतो. "

" दूध पितांना मांजर जसे डोळे मिटतें तसलाच मूर्खपणा याचा म्हणावयाचा हा ! " रमाबाई म्हणाल्या.

" याचं अंडं भल्या मोठ्या टरबुजाएवढं असून तें जवळजवळ तीन पौंड म्हणजे १॥ शेर वजनाचं असतं. " माधवराव म्हणाले.

" अग बया ! म्हणजे आमचा ( पायचेंडूच ) फुटबॉलच झाला म्हणावयाचा. " शरद् म्हणाली.



शहामृग.

" अग, याला ७ फूट उंच वाढावयाचें असतें, मग त्या मानानें एवढें अंडें सहज नको का ? " वसंत हात करून म्हणाला.

" हा प्राणी माणसाळला म्हणजे तो बसण्याच्या आणि ओझं वाहून नेण्याच्या कामी चांगलाच उपयोगी पडतो. हे दक्षिण **आफ्रिकेंतील** गवताळ व वाळवंटाच्या प्रदेशामध्यें पुष्कळ आढळतात. झाडांवर बसून आपलं रक्षण करणं या पक्ष्याला शक्य नसल्यामुळं **देवानें** याचे पाय व मान ही **उंटाप्रमाणेंच** लांब केलीं आहेत. **उंटाप्रमाणें** हाहि प्राणी पाण्याशिवाय पुष्कळ दिवस काढूं शकतो. शत्रूपासून आपला बचाव करण्याकरिता पळतां यावें, म्हणून तर **शहामृगाच्या** पायाला दोन दोनच बोटें असतात. **शहामृग** पक्षी कळप करून राहतात. नर मादीपेक्षां मोठा असतो; आणि एका नराला पुष्कळ माद्या असतात. "

" **मोंगल बादशहाच** म्हणावयाचा हा ! " रमाबाई हंसत म्हणाल्या.


" **शहामृगाच्या** शुभ्र व मऊ पिसांचा उपयोग टोपींत घालण्याकडे **मडमा** फार करीत; आणि या पिसांना चांगलीच किंमत येत असे. " माधवराव म्हणाले.

" प्राण्यांची हत्त्या करणं म्हणजे या लोकांना कांहीं वाटतंच नाहीं का ? " रमाबाई नेहमीप्रमाणें शहारे देऊन म्हणाल्या.

" अरे, हा बैल म्हणावा तर याला लांब लांब खूर आहेत. " शरद् चित्राकडे पहात म्हणाली.

" बैलापेक्षां हा बेढबहि आहे. कित्येक बैल फारच गोंडस असतात नाही ? आपले खिलारी पाडे किती तरी सुरेख असतात ते ! " रमाबाई म्हणाल्या.

" त्याच्या नाकावर, मानेवर आणि डोळ्याभोंवतीं पिस्कारल्या-



ग्नू.

प्रमाणें जे राठ केस आहेत त्यांमुळें आणि त्याच्या वेड्यावांकड्या शिंगांमुळें तसा तो विद्रुप दिसत असावा." वसंत म्हणाला.

"पण या प्राण्याचें नांव काय?" शरद् म्हणाली.

"याला **ग्नू** म्हणतात." माधवराव म्हणाले.

"**ग्नू**! नांव तरी काय गांवढळ बाई!" रमाबाई म्हणाल्या.

"हं, गांवढळ आहेच तो. कारण तोंड बैलाचें, अंग घोड्याचें, शेपटी गाढवाची, आणि खूर हरिणाचे घेऊन याचें विचित्र शरीर बनविलें आहे. हा उंचीनें गाढवाइतकाच असतो खरा. पण हा **शहामृग, जिराफ** किंवा **झीब्रा**, यांपैकीं कोणत्याहि प्राण्याच्या कळपांत राहूं शकतो. म्हणजे याची या प्राण्यांपैकीं कोणत्याहि प्राण्याबरोबर मैत्री होऊं शकते."

"म्हणजे, हा **आफ्रिकेच्या** कोणत्या भागांत आढळतो? दक्षिण-भागांत की उत्तरभागांत?" वसंत म्हणाला.

"हा ना? हा **आफ्रिकेच्या** दक्षिण आणि पूर्व भागांतच आढ-ळतो इतरत्र कुठेंहि आढळत नाहीं." माधवराव म्हणाले, "मात्र ज्या-प्रमाणें **आफ्रिकेच्या** उत्तरभागीं असलेल्या गवताळ भागांत **जिराफ** आणि **झीब्रा** यांचे कळप आढळतात त्याचप्रमाणें **आफ्रिकेच्या** दक्षिणभागीं असलेल्या या गवताळ भागांतहि या प्राण्यांचे कळप आढ-ळतात. **दक्षिणआफ्रिकेंत शहामृगांचे** मोठमोठाले कळप मुद्दाम पाळ-ण्यांत येतात. आणि **शहामृगाप्रमाणें** ग्नू, **जिराफ, झीब्रा** हे सर्वच प्राणी एकत्र माणसाळण्यांत येतात. म्हणजे हे सर्व प्राणी मनुष्याच्या उपयोगीं पडून ते सुखानें एकत्र नांदूंहि शकतात. असो. **आफ्रिका-**खंडाच्या दक्षिण भागांत आतां विशेष लक्ष्यांत घेण्यासारखे प्राणी नाहींत. आज आपल्याला जे विशेष विचित्र प्राणी पहावयाचे आहेत ते या **ऑस्ट्रेलिआ** खंडांत आहेत. हें पहा तें **ऑस्ट्रेलिया** खंड." माधवराव **आशिया**-खंडाच्या आग्नेय दिशेकडे बोट करून म्हणाले.

" **मोरा**सारखा दिसणारा हा कोणता पक्षी अण्णा ? " वसंत म्हणाला.

" हा एक वेगळाच पक्षी आहे. याला **वीणाधारी** म्हणतात. ही पहा वीणेसारखी याची शेपटी; आणि वीणेच्या तारांसारखे हे पिसारे. " माधवराव म्हणाले.

" हो खरंच, याच्या शेपटीवर अगदीं सतारच उभी केल्यासारखी दिसते आहे. " शरद् म्हणाली.

" एक प्रकारचा या पक्ष्यांत विशेष डौल आहे नाहीं ? " वसंत म्हणाला. " हें पहा, तो कसा आपल्या घरट्यावर अगदीं ऐटींत उभा आहे ! "


" पण अगदीं घरट्याशेजारीं मादी उभी आहे वाटतं ? " रमाबाई म्हणाल्या, " मादीला पिसारा नसतो कीं काय ? "

" होय. काल सांगितल्याप्रमाणेंच जसें **लांडोरीला** किंवा **कोंबडीला** पिसारा नसतो तसेंच **वीणाधारी**च्या मादीलाहि पिसारा नसतो. मात्र नरालासुद्धां चार वर्षांनंतरच पिसारा फुटतो. " माधवराव म्हणाले.

" **मोरा**प्रमाणें किंवा **नंदनवन**पक्ष्याप्रमाणें हा नाचत बीचत नाही का ? " शरद् म्हणाली.

" रंगांत आला म्हणजे तो नाचतो आणि गातोहि. " माधवराव म्हणाले, " **मोराचा** आवाज अति कर्कश असतो. एकाद्या वना-मध्यें ज्यावेळीं शेकडों मोर एकदम ओरडूं लागतात त्यावेळीं अगदीं कानठळ्या बसतात; आणि नको तो आवाज असें होतें. या पक्ष्यांचा आवाज मधुर आणि मंजुळ तर आहेच. शिवाय इतर पक्ष्यांच्या आवाजाप्रमाणें हुबेहुब आवाज काढण्याची कलाहि याच्या अंगांत आहे. "

" मग तो पुष्कळांना वेडावून सुद्धां दाखवीत असेल नाहीं ? "



वीणाधारी.

वसंत म्हणाला. " कांहीं पक्षी वेडावतात असें मी ऐकलें आहे. "

" होय. वेडावणारे कांहीं पक्षी आहेत आणि हा त्यांपैकीं एक आहे. असो. हा पहा **प्लॅटिपस्** नांवाचा दुसरा एक गमतीदार प्राणी. " माधवराव म्हणाले.



प्लॅटिपस्.

" याला बदकाच्या पायाप्रमाणें पडदे असलेले चार पाय आहेत वाटतं. आणि याची चोंचहि तशीच रुंद दिसते. " वसंत म्हणाला. " पण शरिराचा आकार डुकराच्या पिलासारखा आहे. "

" पण शेपूट पहा कशी बुटक्या कुंचल्यासारखी आहे ती ! " शरद् म्हणाली.

" हा पशु अंडी घालतो ! " माधवराव म्हणाले.

" म्हणजे अंडीं घालणारा पशु हाच कीं काय ? " रमाबाई म्हणाल्या.

" आणि अंड्यांतून पिल्लू बाहेर आलें कीं पुन्हां त्याला कांहीं दिवस पाजावेंहि लागतें ! " माधवराव म्हणाले. " हा प्राणी धड पशु नाहीं कीं धड पक्षी नाहीं. हा पोहतोसुद्धां. आणि नदीनाल्याकांठीं बीळ करून राहतो. "

" सर्वच विचित्र तर मग. आतां जग उलटें व्हावयाला लागलें आहे असें म्हणावयाला काय हरकत आहे ? " रमाबाई माधवरावांकडे पाहून हंसत—म्हणाल्या.

" होय, मुली शिकावयाला लागल्या मग जग कां उलटें होणार नाहीं ? " माधवराव उलट हंसत हंसत आणि शरद्कडे पहात म्हणाले. " या प्राण्याच्या अंगाला हात लावला तर तो **वई-डुकरा**-प्रमाणें स्वतःला गुंडाळून घेतो. "


" लाजाळूच्या झुडपाप्रमाणेंच लाजतो वाटतें हा प्राणी ? " शरद् म्हणाली.

" आणि हाच वाटतं मागच्या पायांवर चालणारा पशु. " वसंत **कांगारू**कडे बोट करून म्हणाला, " त्याची शेपटी पहा कशी ताठ आणि लांब आहे ती ! "

" आणि हे पुढचे हात कीं पाय ? " शरद् म्हणाली, " त्या

पायांना चांगले पंजे दिसताहेत. आणि ते असे लोंबताहेत काय म्हणून ? ”

“ तो आतां आपल्या मागल्या दोन पायांवर आणि शेपटीवर मिळून तिवईवर बसल्यासारखा बसला आहे. आणि असा बसला



कांगारू.

म्हणजे त्याचे पुढचे पाय असेच लोंबकळतात. आणि त्यामुळेंच त्याला पुढचें नीट पाहतांहि येतें " माधवराव म्हणाले.

" आणि त्याचे कान पहा कसे सशाच्या कानांसारखे भले मोठे असून नारदाच्या शेंडीप्रमाणें ताठ उभे आहेत ! " वसंत म्हणाला.

" आणि तोंड पहा कसें तुंबरासारखें आहे तें ! " रमाबाई म्हणाल्या.

" पण ही पिशवी कसली त्याच्या पोटाशी ? " वसंत म्हणाला.

" आणि त्या पिशवींत कसलेंसें एक चिमुकलें डोकें दिसत आहे तें ? " शरद् ओरडून म्हणाली.



वॅलबी.

" इतर प्राण्यांची पिलें पोटांत वाढतात, तर या प्राण्याचें पिल्लूं पोटाच्या बाहेर वाढतें कीं काय ? खरोखरच, जग उलटलंच हो आतां मात्र ! " रमाबाई म्हणाल्या.

माधवराव इतका वेळ स्वस्थ बसले होते. ते म्हणाले—" ही एक ईश्वराची करणी आहे. याला **कांगरू** म्हणतात. लहानपणीं या प्राण्याला स्वतःचें रक्षण करतां येत नाहीं; म्हणून शत्रूपासून आपला

बचाव करण्यासाठीं आईच्या पोटापाशीं बाहेरच त्याच्याकरितां ईश्वरानें एक पिशवी करून ठेविली आहे; व कोणी शत्रु जवळ येत आहे असें त्याला दिसलें की तो चट्दिशीं त्या पिशवीत जाऊन बसतो; किंवा एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणीं जावयाचें असल्यास पिलाला चालतां येत नाहीं म्हणून आई त्याला पिशवींत बसवून घेऊन दुसरीकडे जाते."

"माकड ज्याप्रमाणें आपल्या पिलांना पोटाशीं घेऊन या झाडावरून त्या झाडावर उड्या मारीत जातें त्याचप्रमाणें ना?" वसंत म्हणाला.

"होय, त्याचप्रमाणें." माधवराव म्हणाले. "आपल्याकडील बुरुडांच्या बाया आपल्या मुलांना डोकीवर टोपलींत ठेवून दोन्हीं हातांनीं चटया विणीत जात नाहींत का? किंवा भिकारिणींना किंवा वडारणींना आपल्या लहान लहान मुलांना झोळींत घालून ती झोळी खांद्यावर किंवा पाठीशी बांधून रस्त्यांतून हिंडतांना आपण पहात नाहीं का? अशानें दोन्ही हात काम करावयास मोकळे राहतात."

"गरीबी असते म्हणून कांहींतरी सोय करतात. करतील काय बिचाऱ्या?" किंचित् उसासा टाकून रमाबाई म्हणाल्या.

"**ओपोसम्** आणि **वॅलबी** नांवांचे अशाच प्रकारचे आणखी कांहीं विचित्र पशु या **ऑस्ट्रेलियांतच** आहेत. हे प्राणी पुढच्या बुटक्या पायांमुळें टुणटुण् उड्या मारीत जातात." माधवराव म्हणाले "**प्लॅटिपस्** प्राण्याप्रमाणें अंडीं घालणारा हा पहा दुसरा पशु **एचिड्ना.** अंडीं घातल्यानंतर त्यांना ऊब देण्याकरितां तो तीं अंडीं आपल्या पोटापाशीं बाहेरच्या बाजूस असलेल्या पिशवीत ठेवीत असतो; म्हणजे त्याच्या शरिराची ऊब त्या अंड्यांना आपोआप मिळते; आणि ऊब देण्याकरितां त्याला एका ठिकाणी बसून राहण्याची गरजहि पडत नाही."



## एचिड्ना.

" याच्या अंगावर साळूप्रमाणेंच दाभणासारखे राठ केस आहेत वाटतं ? " रमाबाई म्हणाल्या, " या केसांचा त्याला उपयोग होत असेल मग ? "

" याच्या पायांना तीक्ष्ण नखं असतात कीं काय ? " शरद् म्हणाली, " जमीन उकरण्याला तीं उपयोगीं पडत असतील ? "


" आणि याची चोंच पाहिलीत का किती लांबलचक आहे ती ? हिचा काय बरं उपयोग असेल ? " वसंत म्हणाला.

" ती त्याची चोंच नव्हे. तें त्याचें नाक आणि तोंड मिळूनच तसें असतें. त्याला दांत नसतात. आंत लांब जीभ असते. त्या जिभेनें तो मुंग्या आणि किडे पटापट् उचलून खातो. त्याचीं नखं खरोखर इतकीं तीक्ष्ण असतात, कीं हां हां म्हणतां म्हणतां बीळ नसेल तेथें बीळ तयार करून तो पट्दिशीं आंत जाऊन दिसेनासा सुद्धां होतो. "

" हे जोडीनें उभे असलेले दोन्ही पक्षी शहामृगाच्या वंशांतलेच आहेत कीं काय ? " वसंत म्हणाला. " यांच्याहि मानेची ठेवण

आणि यांची उभें राहण्याची तऱ्हा **शहामृगा**सारखीच आहे. ”

“ पण हे **शहामृगाहून** लहान असावेत. ” रमाबाई म्हणाल्या.



इमू.

कॅसोवरी.

“ आणि यांच्यापैकीं एकाच्या पाठीवर तर चवरीच **पसरून** ठेविल्यासारखी दिसते ! ”

" होय, हे दोन्ही पक्षी **शहामृगा**च्याच वंशांतले आहेत. यांनाहि उडतां येत नाही. मात्र ते उंचीला ६ फुटांपेक्षां जास्त उंच कधींच नसतात. ज्याच्या अंगावर चवरीच पसरली आहे की काय असं वाटतं त्याचें नांव **एमु**; आणि दुसऱ्या पक्ष्याचें नांव **कॅसोवरी**, त्याच्या डोक्यावर एक शिरस्त्राण आहे पहा. " माधवराव म्हणाले.


" आणि त्याच्या गळ्यापासून दोहोंकडे दोन लांबट पिशव्या कसल्या लोंबताहेत ? " वसंत म्हणाला.

" आपल्याकडील कांहीं शेळ्यांच्या गळ्यापासून ज्याप्रमाणें दोन मऊ मऊ कातड्याच्या पिशव्या ( ज्यांना आपण अजागल म्हणतों ) लोंबत असतात त्याप्रमाणेंच या पिशव्या असतात. मात्र यांचा रंग तांबूस असतो. डोक्यावरील शिरस्त्राणामुळें आणि या तांबूस पिशव्यांमुळें हा पक्षी कांहींसा सुंदर दिसतो. या दोन्ही पक्ष्यांच्या अंगावरील केसांना तकाकी असते. **एमु** पक्ष्याच्या डोक्याला आणि मानेला निळसर रंग असतो आणि डोक्यावर आणि मानेवरहि लहान लहान पिसें असतात. **एमु** हा जात्या भित्रा आणि गरीब आहे खरा; पण तो रागावला म्हणजे आपल्या पायांनी भराभर लाथा देतो. **कसोवरी** पक्ष्याला तर पुढून, मागून आणि बाजूनें सुद्धां लाथा मारतां येतात. शिवाय आपल्या पंखाचे तडाखेसुद्धां तो देतो. **शहामृगाला** पुष्कळ माद्या असतात तसें या पक्ष्यांचें नाहीं. या पक्ष्यांच्या नर आणि मादी अशा जोड्या असतात. मात्र नरापेक्षां मादीच मोठी आणि रासवट असते. मादी रोज कांही कांही याप्रमाणें एका हंगामांत ४० पर्यंत अंडीं घालते आणि हीं अंडी नर उबवितो ! "

" म्हणजे या गोलार्धात असेहि प्राणी आहेत म्हणावयाचे मग ? की ज्यांच्यातील नराला घरचेंच काम करावें लागतें ? " रमाबाई मोठ्यानें हंसत म्हणाल्या. " आणि मादीच नरापेक्षां मोठी ! "

" पण अंडीं घालण्याचें काम मादीलाच करावें लागतें ना ? " माधवराव उलट टोमणा देत म्हणाले.

मुलांना हा विनोद विशेष न कळल्यामुळें त्यांचें लक्ष पुढील चित्राकडे गेलें.



कृष्णहंस.

" शरद्, हे **हंस** कसे पाण्यांत पोहताहेत पाहिलेस का ? " वसंत म्हणाला. ' काय त्यांचा डौल आहे ! "

" **हंस**, आणि इतके काजळासारखे काळे कुळकुळीत ! कांहींच तरी तुझं आपलं. " शरद् म्हणाली.

" **काळे हंस** ! म्हणजे हें **ऑस्ट्रेलिआ खंड** आहे तरी कसलें ? " रमाबाई म्हणाल्या. " कुणाला खरंसुद्धां वाटणार नाहीं. "

" तसंच आहे हें. कांहीं **हंस** काळे कुळकुळीत असतात, तर कांहीची मान तेवढीच निळी असून चोंच व पावलें पोवळ्यांप्रमाणें लालबुंद असतात. **पश्चिम ऑस्ट्रेलियांत** एका नदीत हे हंस पुष्कळच आढळतात, म्हणून या नदीला **हंसनद** म्हणतात. असे हे सर्व विचित्र प्राणी या **ऑस्ट्रेलियांतील** होत. हा भूप्रदेश इतर खंडापासून फारच दूर असल्यामुळें व इतके दिवस याचा इतर खंडांशीं संबंध न आल्यामुळें हे प्राणी अगदीं वेगळे राहिल्यासारखे झाले, म्हणून आपणांस हे प्राणी एवढे विचित्र वाटतात. नाहींतर आपल्याकडील प्राणी काय कमी विचित्र आहेत ? एका प्राण्याशीं दुसऱ्या प्राण्याचा मेळ नाहीं. कोणाला शिंगें आहेत तर कोणाला सोंड आहे. कोण पाणथळ जागीं चिखलांत लोळतो तर कोण वाळवंटांतून खुशाल आठ आठ दिवस पाण्याशिवाय प्रवास करतो. कोण झाडावरून उड्या मारतो तर कोण बीळ करून त्यांतच सुखानें राहतो. कोण नदीच्या डोहांत किती वेळ तरी बुडी मारून बसतो तर कोण पर्वताच्या शिखरांवर बेधडक चरत जातो. असे एक ना अनेक प्रकारचे प्राणी आपण पाहिले. कांहीं आपल्या नेहमींच्या पाहाण्यांतले म्हणून आपणांला तितके ते विचित्र वाटले नाहींत. **वाल्मिकीच्या** आश्रमांत राहणाऱ्या **कुशलवांनीं** कितीतरी दिवस घोडा पाहिला नव्हता. जेव्हां **श्रीरामचंद्रांचा** अश्व प्रथम त्यांना पहावयास मिळाला तेव्हां त्यांना कोण आश्चर्य वाटलें ! ऋषिकुमारानें त्याचें वर्णन केलें तें तरी किती विचित्र ! असो. या जगांत आणखी कितीतरी प्राणी आहेत. हेच कांहीं सगळे नव्हेत. यांतच किती प्रकार, किती तऱ्हा. हे ढोबळ ढोबळ प्राणी झाले. अद्याप ह्या दक्षिण–अमेरिकेंतील कांही ढोबळ प्राणी आपल्याला पहावयाचे राहिले आहेत ते आपण उद्यां पाहूं. "

---

*

# भूगोलावरील

# कांहीं विचित्र प्राणी


## ( ७ ) दक्षिण–अमेरिका. ( पूर्वार्ध )

नित्याप्रमाणें सर्व मंडळी दिवाणखान्यांत जमा झाली. मुलांना आपल्या चित्रांचें पुस्तक संपत आलें म्हणून वाईट वाटत होतें. आजपर्यंत पाहिलेल्या चित्रांच्या माहितीबद्दल ते एकमेकांशीं चर्चा करीत होते व आतां आणखी काय काय माहिती मिळणार याबद्दल ते उत्सुकहि दिसत होते. रमाबाईहि कांहीं कमी उत्सुक नव्हत्या. त्यांच्याहि डोक्यांत कांहीं तरी विचार चाललेले आहेत असें दिसलें. इतक्यांत माधवरावांनी **दक्षिण–अमेरिकेचा** स्वाभाविक वनस्पतींचे पट्टे दाखविणारा नकाशा उलगडून तो त्यांच्या पुढं धरिला. इतक्यांत " अरे हा कसला नकाशा ? आकार तर **दक्षिण–अमेरिकेचाच** दिसतो आहे." वसंत म्हणाला. " आणि यांतील हे पट्टे वनस्पतींचे दिसताहेत. "

" अगदी बरोबर. " माधवराव आपल्या मुलाच्या पाठीवर हात फिरवीत म्हणाले.

शारदेला याचें किंचित् वाईट वाटलें व ती म्हणाली " आज पुन्हां वनस्पतींच्या पट्ट्यांचीच माहिती सांगणार कीं काय ? "

" या पट्ट्यांची माहिती झाली आहे खरी. " माधवराव म्हणाले. " उत्तर गोलार्धातील प्रदेशांत जसे निरनिराळे अनेक वनस्पतींचे पट्टे आपणांस लागले त्याच तऱ्हेचे पट्टे दक्षिण गोलार्धात त्याच क्रमानं आहेत हें मी तुम्हांस समजावून दिलेलें आहे खरें; आणि **दक्षिण-**


रुंदपर्णी प्रदेश.
गवताळ प्रदेश.
गवताळ आणि कांटेरी झुडपांचा प्रदेश.
वालुकामय प्रदेश.
घनदाट जगलाचा प्रदेश.
मधुर फळझाडांचा प्रदेश.



**आफ्रिका व ऑस्ट्रेलिया** या भागांतहि कांही पट्टे आपण पाहिले आहेत हेंहि खरें; पण **दक्षिण-अमेरिकेंत** त्यांचा क्रम ज्यास्त नीट दिसतो. कारण हा प्रदेश या **विषुववृत्तापासून दक्षिणध्रुवाकडे** बराच म्हणजे **आफ्रिका व ऑस्ट्रेलिया** या खंडांपेक्षां पुष्कळच दक्षिणेकडे पसरलेला आहे. म्हणून **दक्षिण–अमेरिकेंत** उत्तर गोलार्धांत आढळून येणारे बरेच पट्टे आढळतील."

"हो हो, मला आतां सर्व कांहीं आठवलें." वसंत म्हणाला. "**विषुववृत्ता**जवळ दोहों अंगांस असलेलें दाट जंगल या **दक्षिण-अमेरिकेंतच** जास्त प्रमाणांत दिसत आहे." वसंत आपल्यास सर्व नीट समजलें आहे हें दाखविण्याच्या उद्देशानेंच जरा ऐटीनें म्हणाला.

"हाय, हा पहा या खंडाचाच स्वाभाविक भू-रचना दाखविणारा हा दुसरा उठावाचा नकाशा. हा आतां नीट न्याहाळून पहा आं." माधवराव आपल्या पत्नीला उद्देशून म्हणाले.

"ही कोणती नदी अण्णा? केवढी तरी प्रचंड दिसते ही!"

"आणि काय हें नद्यांचें जाळें तरी!" शरद् उद्गारली.

वसंत बारकाईनें पहात म्हणाला. "म्हणूनच ही नदी एवढी प्रचंड होत असेल नाही?"

"वसंताचें म्हणणें अगदी बरोबर आहे. त्याला नकाशा पाहण्याची दृष्टि येऊं लागली आहे एकंदरीत." माधवराव म्हणाले.

"आणि या पर्वतांच्या ओळी वाटतें. आणि हे उंचवटे. हा मधला प्रदेश कसा अगदी द्रोणासारखा झालेला आहे." इतका वेळ स्तब्ध बसलेल्या रमाबाई म्हणाल्या. "म्हणूनच या खोऱ्यांतून ही प्रचंड नदी वाहात गेली असावी नाही?"

"होय. पण या उठावाच्या नकाशामुळेच हें सर्व कळण्याला सोपें गेलें." माधवराव पत्नीकडे पहात म्हणाले.

" आमच्या शाळेंत सुद्धां एक **महाराष्ट्राचा** उठावाचा नकाशा आहे. त्यावरूनच बाईनी आम्हांला **कृष्णा, गोदावरी, भीमा,** इत्यादि नद्या कशा वाहात जातात हें सुरेख समजावून सांगितलें. " शरद् आपल्या वर्गाची ऐट दाखवीत म्हणाली.

" पण या सर्व नद्यांना इतकें पाणी कुठलें मिळतें अण्णा ? " वसंत म्हणाला.

" या पर्वतांतून. इतकें नाहीं का कळत तुला ? **कृष्णा, गोदावरी, भीमा,** या नद्या नाहीत का सह्याद्रीमध्यें उगम पावल्या ? " शरद् वसंतास चिडविण्याच्या उद्देशानें म्हणाली.

" अग हो, मला सगळं कांही कळतं, पण नद्यांचे उगम तरी पावसाशिवाय किंवा बर्फाशिवाय होतील कसे? "

" शरद्, वसंताची शंका बरोबर आहे. पण हें पहा वसंत, हा प्रदेश अगदी **विषुववृत्तावर** आहे; म्हणून या प्रदेशांत सुद्धां दररोज म्हणजे बाराहि महिने पाऊस पडत असतो. आणि या पावसाचें प्रमाणहि फार आहे. याचीं सर्व कारणें आज तुम्हांस मी सांगत बसत नाहीं. पुन्हां केव्हां तरी सांगेन. या सतत पावसामुळें आणि या प्रचंड द्रोणाकार भू-प्रदेशामुळें या पर्वतावर आणि या सभोंवतालच्या उंचभागांवर सतत पडणारें पाणी या तिन्ही बाजूंनें वहात येणाऱ्या नद्यांच्या द्वारें या मुख्य म्हणजे **ॲमेझॉन** नदीच्या पात्रास येऊन मिळतें. **ॲमेझॉन** नदीला मिळणारी प्रत्येक नदी **गंगा, सिंधु,** किंवा **ब्रह्मपुत्रा** एवढी मोठी आहे. आणि म्हणूनच जगांत एवढी प्रचंड नदी दुसरी कोणतीच नाहीं. या नदीच्या दोहों अंगांला दोनदोनशें मैल घनदाट अरण्य आहे. तें इतकें कीं, कित्येक ठिकाणीं सूर्य-किरणें हजारों वर्षांत पोहोंचली नसतील. आणि हें विस्तीर्ण व अवाढव्य जंगल ४००० मैल लांब आहे. या प्रदेशाचा ( निदान कांहीं कडेकडेच्या भागांतून) शोध लावावा म्हणून **कर्नल् फॉसेट्** हे सुमारें पांच

सहा वर्षांपूर्वी या प्रदेशांत गेले आहेत, पण त्यांचा अद्याप पत्ता नाही. कदाचित् ते पुन्हां कधींच परत येणार नाहीत ! ' दोन वर्षे माझी वाट पहा. त्यानंतर जर मी आलों नाही किंवा माझ्याकडून कांही संदेश आला नाहीं तर मी पुढें कधींच येणें शक्य नाहीं असं धरून चाला. ' असें जातांनाच त्यांनीं सांगून ठेवलें होतें. असो. अशा या विस्तीर्ण जंगलांत हजारों प्रकारचे प्राणी व जीवजंतु आपला जीवनक्रम, आपलें आयुष्य घालवितात. केवळ फळांवरच उपजीविका करणारे असे अनेक तऱ्हेचे माकड, वानर, वाघुळें, पोपट, इतर चित्रविचित्र पक्षी, उडणारे बेडूक, सरडे आणि लाखोंवारी कीटक यांनी हें अरण्य दुमदुमून गेलें आहे. या प्राण्यांना जमिनीवरून चालण्याची कधीं गरजच पडत नाहीं. **माकड व स्लॉथ**—हें पहा त्याचें चित्र—हे तर कधीच जमिनीवर येत नाहीत. ''

वसंत, शरद् व रमाबाई हीं सर्वच इतका वेळ ह्या अरण्याची माहिती लक्षपूर्वक ऐकत होतीं. चित्र पाहतांच वसंत म्हणाला '' कोण, **स्लॉथ** नांवाचा प्राणी का हा ? याला तर हे नखांऐवजी मोठाले आंकडेच दिसत आहेत. ''


'' आणि तो कसा लोंबकळतो आहे पहा. '' शरद् म्हणाली. '' मला तर तो सरकशींतला विदूषकच वाटतो आहे. ''

'' आणि आपल्या शरीराचें केवढें धूड त्यानें तोललें आहे हें ? '' रमाबाई त्याच्या ओबडधोबड शरिराकडे बोट करून म्हणाल्या. '' किती मण असेल हें '' ?

'' हे त्याचे लांबलचक अजस्र हात पाहिलेस का ? यांनी तो आपला प्रचंड देह नेहमीच झाडावर तोलून धरितो. '' माधवराव म्हणाले.

'' अजानबाहूच आहे म्हणावयाचा. '' रमाबाई म्हणाल्या.

'' झाडावरून उड्या मारणाऱ्या बहुतेक सर्व प्राण्यांचे हात लांब-



स्लॉथ.

लचकच असतात. " माधवराव लांब हातांचें कारण सांगण्याकरितां म्हणाले.

" त्याच्या डोक्यापेक्षां त्याच्या शरिरावरच राठ व लांब केस दिसतात. नाहीं अण्णा ? " शरद् म्हणाली.

" जिवंतपणी ते हिरवे असतात. " माधवराव म्हणाले.

" आणि त्याचे डोळे पहा कसे जात्याच्या भोकाप्रमाणें बट-बटीत आहेत ते. आणि त्याच्या केंसहीन कपाळामुळें तर तो फारच बेडौल दिसतो. "

" हा दुसरा प्राणी **इग्वाना.** " माधवराव चित्र पुढें करून म्हणाले. " पाण्याच्या कांठीं असणाऱ्या झाडांवर हा राहतो. आणि उंच फांद्यांवरून थेट पाण्यांत उड्या मारण्याची याला एक विलक्षण संवय आहे. "

" सरड्याचीच एक जात दिसते आहे ही. " रमाबाई म्हणाल्या.

" पण त्याचें हें भलें मोठें पोट व गळ्याखालची लांब पिशवी पाहिलीस का ? " वसंत त्या पिशवीकडे निरखून म्हणाला.

" हा प्राणी किडे कीटकांना खाऊन आपली उपजीविका करतो." माधवराव म्हणाले " आणि या प्राण्याचे रंग वारंवार बदलत असतात."

" ' सरड्यासारखे रंग बदलणें ' अशी म्हण आपल्या परिचयाची आहेच कीं " रमाबाई म्हणाल्या.

" हा कोणता प्राणी हो अण्णा ? नागाच्या फण्याप्रमाणें उलटून रुंद पसरलेली ही याची शेपटी पहा कशी पिंजारलेल्या चवरीप्रमाणें दिसते आहे ती. " वसंत म्हणाला.

" हा प्राणी ना ? ह्याला '**मुंगीखाऊ**' म्हणतात. हा प्राणी केसाळ आहे. मात्र कांहीं जातींच्या **मुंगीखाऊंच्या** अंगावर सुसरीच्या किंवा कासवाच्या पाठीवर जसे खवले खवले असतात तसेच खवले खवले असतात. "

" याचें खाणें म्हणजे मुंग्याच असतील मग ? " वसंत शब्दाचा अर्थ लावीत म्हणाला.



मुंगीखाऊ.

" होय. या प्राण्यांचें मुख्य खाणें म्हणजे झाडांवरील मुंग्या होत. इतर किडेहि हा प्राणी खातोच. " माधवराव म्हणाले.

" त्याची जीभ पहा कशी सुतासारखी लांब बाहेर आली आहे ती ? " शरद् म्हणाली.

" तुझ्या जिभेसारखीच ती लवलवते नाही ? " वसंत हंसत म्हणाला.

" आणि तुझी जीभ **स्लॉथच्या** जिभेप्रमाणें रुंदच रुंद आहे ना ? माझी आपली सुतासारखी अरुंद आहे तीच बरी. " शरद् चिडून म्हणाली.


" या सुतासारख्या जिभेनेंच हा प्राणी झाडांच्या ढोल्यांतून मुंग्या वेचून खातो. " माधवराव म्हणाले.

" हा **अजगरच** आहे ना ? " रमाबाई पुढील चित्र निरखून म्हणाल्या. " आतां नाहीं कांहीं मी परवांप्रमाणें भिणार. "

" होय, ती एक **अजगराचीच** जात आहे. हा सर्प पक्ष्यांवर आपली उपजीविका करतो. हा प्रचंड सर्प आपल्या अजब शेपटीचा विळखा झाडांच्या फांद्यांना घालून तपस्व्याप्रमाणें समाधि लावून बसलेला असतो. परंतु हा सर्प विषारी नाही. तो आपलें भक्ष्य आपल्या विळख्यानें चेंगरतो व नंतर तो त्याला गिळतो व त्याचें त्याच्या शरिरांतच चूर्ण होत जातें. कांहीं जातींचे **अजगर** पाण्यांतहि दबा धरून बसतात. "

" परवां आमच्या शाळेंत एका जादुगारानें या जातीचा साप आणिला होता खरा. " वसंत म्हणाला. " खरोखरच केवढा प्रचंड तो साप.साप कसला **सर्पराजच** तो. आम्ही प्रथम तो पाहातांच घाबरलों. त्याच्या अंगावर चित्रविचित्र फुल्या तरी किती होत्या ! आणि तसल्या त्या सर्पाला तो जादुगार आपल्या गळ्याभोवतीं लीलेनें वेढून घेत होता. "

" आपल्या हिंदुस्थानांत असल्या सापाच्या कांहीं जाती आहेत खऱ्या; पण या प्रदेशांतील सापापुढें हिंदुस्थानांतील साप कांहींच नव्हेत. " माधवराव म्हणाले.



आहे. आणि मागचा भाग निव्वळ माशासारखा आहे. एथेंहि विचित्र प्राणी आहेतच म्हणावयाचे ! " वसंत उद्गारला.

" विचित्र प्राणी नाहींत कुठें ! " माधवराव म्हणाले. " याला 'मॅन-ॲटी' किंवा 'पाण-गाय' म्हणतात. त्याचप्रमाणें पाणथळ जागेंतहि हा राहतो. माशाप्रमाणेंच पाण्याविना याचें कांहीं चालत नाहीं. तथापि तो नेहमीं काठाकाठानेंच वावरतो आणि पाण्यांत उगवणाऱ्या वनस्पतींवर तो आपली उपजीविका करतो. या प्राण्यांना पोहतांहि तितकेंसें चांगलें येत नाहीं. तथापि त्यांना मागचे पाय नसल्यामुळें व त्यांचा मागचा भाग माशाच्या मागच्या भागासारखा असल्यामुळें त्यांना जमिनीवरहि नीट चालतां येत नाहीं. उथळ पाण्यामध्यें मात्र पुढच्या पायांवर चालत व मागचें शरीर पाण्यावर तरंगत ठेवीत ते इकडे-तिकडे जाऊं शकतात. ते आपलें भक्ष्यहि पुढच्या पायांच्या मदतीनें खातात, आणि आपल्या पिलांना पाण्यावरच पाजतात. "

" प्रत्येक प्राण्याची एक एक विचित्र तऱ्हाच खरी ! " रमाबाई म्हणाल्या.

" हा जवळ जवळ डुकरासारखा दिसणारा प्राणी कोणता ? " शरद् म्हणाली.

" डुकरापेक्षां तो पुष्कळच मोठा व धिप्पाड आहे, नाहीं अण्णा ? " वसंत म्हणाला. " मात्र त्याला शिंगबिंग कांहीं नाही आणि त्याची शेपटी किती तोटकी ! "

" त्याला 'टापीर' म्हणतात. कांहीं बाबतींत तो डुकरासारखा आहे खरा " माधवराव म्हणाले. " मात्र हा प्राणी दाट जंगलांत राहतो; कारण चित्त्यापासून याला आपलें नेहमीं संरक्षण करावें लागतें; शिवाय याचे दांत बोथट असतात म्हणून हा प्राणी रसानें भरलेल्या कंदमुळां-वर निर्वाह करण्याकरितांच जंगलांत हिंडत असतो. "

" मग आपल्याकडील **रानडुक्कर** उसाच्या फडांतून रात्रीचे खुशाल चरत असतात आणि उसाच्या मळ्यांचा फडशा पाडतात तें कसें ? " वसंत म्हणाला.

" रानडुकरांना सुळे असून दांतहि असतात " माधवराव म्हणाले.

" हा पुढचा प्राणी आपल्याकडील चित्त्यासारखाच आहे " शरद् म्हणाली. " पण त्याहून हा पुष्कळच सुंदर दिसतो नाहीं ? "



**चित्ता.**

" होय, तो चित्ताच आहे; किंवा द० **अमेरिकेंतील वाघ** म्हणेनास. हा **वाघ** झाडावर सहज चढतो. आपल्याकडील वाघांना झाडावर तितकेंसें

चढतां येत नाहीं. या वाघाचें मुख्य खाद्य म्हणजे वानर व माकडें. त्याचप्रमाणें टापीर प्राण्याचीहि हा शिकार करतो."

"जगांत कुठेंहि गेलें तरी कांहीं हिंस्र श्वापदें आहेत व कांहीं गरीब जनावरें व प्राणी आहेतच मग?" रमाबाई म्हणाल्या.

"जगाचा हा न्यायच आहे" माधवराव म्हणाले. "असो. हा अरण्याचा प्रदेश केवढा तरी विस्तीर्ण आहे हें आपण पाहिलेंच आहे. या अरण्याच्या मध्यभागीं आणखी किती आणि कोणकोणते प्राणी आहेत याची गणती नाहीं किंवा त्यांची माहितीहि अद्याप पूर्णपणें मिळालेली नाहीं. मिळणार कशी? आंत मनुष्य-प्राण्याला शिरकावच नाहीं. **कर्नल्-फॉसेट्**सारखा एकादा धाडसी प्रवाशी गेला, तर तो परत तरी आला पाहिजे?"

"अय्या, केवढें गिधाड हें! आणि काय त्याचें हें धिप्पाड शरीर!" शरद् तोंडावर बोटें ठेवून म्हणाली.

"होय, हा जगांतील सर्व पक्ष्यांमध्यें धिप्पाड व अजस्र आहे" माधवराव म्हणाले. "हें **अमेरिकन् गिधाड** होय. याला '**कॉन्डोर**' म्हणतात. याची चोंचीपासून शेपटापर्यंत भरपूर चार फूट लांबी भरते आणि यानें आपले पंख पसरले म्हणजे तो १२ फूट जागा व्यापूं शकतो."

"म्हणजे आपल्या या दिवाणखान्याच्या रुंदीइतकी म्हणाना?" वसंत म्हणाला.

"सहज," माधवराव म्हणाले. "या **अँडीज् पर्वताच्या** उंच प्रदेशावर याचें निवासस्थान असतें. कधीं कधीं तो या **पॅसिफिक्** महासागराच्या किनाऱ्यावर आलेला आढळतो. पण त्याचें खरें निवासस्थान म्हणजे समुद्रसपाटीपासून १०००० ते १६००० फूट उंचीचा प्रदेश होय., विशेषतः या **विषुववृत्तावरील** '**कोटोपॅक्सी**'

व ' **चिंबोराझो** ' नांवांच्या ज्वालामुखी पर्वतांच्या आजूबाजूस हे फारच मोठ्या प्रमाणांत सांपडतात. "



**कॉन्डोर.**

" अण्णा, याच्या त्या ऐटदार चोंचीच्या किंचित् वरच्या बाजूस व कपाळावर आणि गरगरीत वाटोळ्या डोळ्यांच्या मध्यभागीं हा खडकासारखा दगड कसला आहे हो ? " शरद् म्हणाली.

" अरेच्या, आमच्या शरद्नेंहि वर्णन करण्याची शैली बरीच संपादन केली आहे म्हणावयाची या सहा-सात दिवसांत ! " माधवराव तिच्या पाठीवरून हात फिरवीत म्हणाले.

" पण सांगा ना, तें काय आहे तें ?" शरद् खूप होऊन म्हणाली.

" नराच्या नाकावर आणि कपाळावर तो एक खरबरीत मांसाचा गोळा असतो " माधवराव म्हणाले.

" त्यामुळें त्याला एक प्रकारची ऐट आली आहे पण ! " वसंत म्हणाला.

" त्याचें डोकेंहि पण कसें केशविहीन आणि खडबडीत दिसतें आहे ? " रमाबाई अचंबा करीत म्हणाल्या. " संन्यासच घेतला आहे वाटतें बिचाऱ्यानें ? "

" पण आई, त्याच्या गळ्याभोंवती त्याची ऐट पाहिलीस का ? अगदीं पांढरा शुभ्र व भरगच्च असा गळपट्टाच जणूं वेढून घेतला आहेन त्यानें. आणि कसा अगदी ठेक्यांत मान ताठ व छाती पुढें करून उभा आहे पहा ! " वसंत म्हणाला.

" आमच्या शाळेंत परवां कलेक्टराची मडम आली होती, तिच्या गळ्यांत असेंच कांहीतरी दिसत होतें खरं आणि तीहि अशीच तोऱ्यांत व ठुमकत चालत होती " शरद् म्हणाली.

" त्याचे पंख पाहिलेस का ? कसे एकजात काळे कुळकुळीत आहेत ते!" रमाबाई म्हणाल्या.

" पण या पंखांच्या शेवटीं एक शुभ्र आणि बरीच रुंद किनारहि असते. " माधवराव म्हणाले.

" म्हणजे अलीकडे कांहीं बायका पांढऱ्या किनारीचीं पातळें नेसतात त्याप्रमाणेंच म्हणावयाचें ! " रमाबाई म्हणाल्या.

" आई, पण तो नर आहे. " वसंत हंसत म्हणाला.

" होय, मादी इतकी ऐटदार नसते. मादी एका वेळेस दोन अंडीं घालते. तीं तीन-चार इंचांचीं असतात. **कॉन्डोरच्या** पिलाला पहिलीं दोन वर्षें उडतां येत नाहीं. दोन वर्षांनंतर त्याला आपलें भक्ष्य स्वतंत्रपणें शोधतां येतें. हा पक्षी आपली उपजीविका शेळ्या, मेंढ्या, व हरणें या जनावरांवर करितो. "

" वाघासारखा याचाहि शेतकऱ्यांना व मेंढपाळांना त्रासच म्हणावयाचा ? " रमाबाई म्हणाल्या.

" होय. म्हणूनच शेतकरी लोकांना व मेंढपाळांना याचीहि नेहमीं शिकार करावी लागते. मात्र याची शिकार करणें फारसें अवघड नाहीं. हा अत्यंत आधाशी प्राणी आहे. म्हणून एकादा प्राणी फस्त करून जेव्हां हा बसतो त्या वेळीं हा अत्यंत आळसावतो आणि मग अशावेळीं याची शिकार सहज करतां येते. त्याचप्रमाणें हा अत्यंत झोंपाळू आहे. म्हणून हा झाडावर झोंप घेत असतांना सुद्धां झाडावर चढून लोक याची शिकार साधतात. "

" **कुंभकर्ण**च म्हणावयाचा ! " रमाबाई म्हणाल्या.

" आणखीहि याची एक अचंबा करण्यासारखी गोष्ट आहे. हा ४० दिवस उपवास करूं शकतो. याचें उड्डाणहि नांवाजण्यासारखें असतें " माधवराव म्हणाले. "फिरत्या किंवा चक्राकार जिन्याप्रमाणें हा प्रथम उंच उंच उडत जातो आणि कांहीं वेळ आकाशांत मनसोक्त गिरक्या घेतल्यावर एक तसूभर सुद्धां पंख पुढें-मागें न हालवितां ते भरपूर पसरून अर्धा अर्धा तास हा तसाच उंच तरंगत राहतो. "

" हात-पाय न हालवितां तास-तासभर पोहत राहण्यापैकीच आहे म्हणावयाचें हें ? " वसंत म्हणाला.

"होय, आणि दुरून अगदीं विमानाप्रमाणेंच हा दिसतो. **कमांडर-डी-पिनेडो** या वैमानिकाची अशीच फसगत झाली आणि त्याला या पक्ष्याला टाळावें लागलें; कारण विमानांना याच्यापासून बरीच भीति असते. याची आणि विमानाची जर टक्कर झाली, तर विमान खालीं आलेंच म्हणावयाचें; असा हा **पक्षिराज** आहे." माधवराव चित्र उलटतां उलटतां म्हणाले.

"पण आतां रात्र बरीच झाली नाहीं का? उद्यां मुलांना लवकर उठावयाचें आहे" रमाबाई म्हणाल्या.

"खरेंच, उद्यां आमची शाळा सकाळची आहे." दोन्ही मुलें म्हणालीं.

"बरं तर, ही राहिलेली कांहीं चित्रें आपण उद्यांच पाहूं आणि आपला हा शिक्षणसप्ताह पुरा करूं" माधवराव विनोदानें म्हणाले; आणि सर्व मंडळी आपआपल्या जागीं झोपण्यास गेली.

## भूगोलावरील

# कांहीं विचित्र प्राणी.

## ( ८ ) दक्षिण-अमेरिका ( उत्तरार्ध )

सर्वांची जेवणें झाल्यावर माधवराव म्हणाले, " आपल्या सप्ताहाचा हा शेवटचा दिवस आहे. आज सतत सात दिवस रोज नियमानें आपण हीं चित्रें पहात आहोंत. आपण सर्व खंडांतून या नकाशांच्या साहाय्यानें प्रवासच केला म्हणावयाचा. या प्रवासांत आपण निर-निराळे प्राणी तर पाहिलेच; पण त्याचप्रमाणें आपण सर्व प्रदेशांचें निरीक्षणहि केलें आहे. असो. आतां आपण हीं उरलेलीं पांच-सहा चित्रें पाहूं आणि मग थोडक्यांत मागें काय पाहिलें त्या एकंदर गोष्टींचें सिंहाव-लोकन करूं; म्हणजे कांहीं गोष्टी आपल्या मनावर चांगल्या ठसतील आणि पुढें मग केव्हांहि या माहितीचा आपल्याला प्रसंगविशेषीं उपयोग होण्यास अडचण पडणार नाहीं. हें पहा ' **लामाचें** ' चित्र. "


" काय ! ' **लामा** ' नांवाचा एक पशु आहे. तर मग तिबेटांत अस-णाऱ्या बुद्धांच्या धर्मगुरूस **लामा** म्हणतात तें कां ? " वसंत म्हणाला.

" होय, ती एक गंमत आहे खरी. पण हा '**लामा**' पशु असून हा **अँडीज्** पर्वतावर राहणारा आहे " माधवराव म्हणाले.

" हा **उंटा**सारखा दिसतो आहे कांहींसा, नाहीं अण्णा ? " शरद् म्हणाली.

" पण याच्या पाठीवर तें टेंगूळ कोठें आहे ? " वसंत फरक दाखविण्याकरितां म्हणाला.

" परंतु हाहि प्राणी उंटासारखा ओझें वाहण्याच्या कामीं फारच उपयोगीं पडतो " माधवराव म्हणाले. " तो शंभर पौंड ओझें सहज डोंगरावर वाहून नेतो आणि उंटाप्रमाणेंच पांच-सहा दिवस पाण्याविना



**लामा.**


राहूं शकतो. **उंट** हा ओसाड वाळवंटाच्या प्रदेशांत जसा अतिशय उपयोगीं पडतो, तसा '**लामा**' हा या **अँडीज्**पर्वतावरील उंच प्रदेशांतील ओसाड प्रदेशावर उपयोगीं पडतो. याच्या अंगावर एकजात शुभ्र केस असतात. क्वचित्प्रसंगीं याच्या अंगावर काळे किंवा पिंगट ठिपकेहि असतात. याला एक अति वाईट खोड आहे. याच्या मनांतून जर ओझें वाहून न्यावयाचें नसेल तर हा आपल्या मालकाकडे एकदम तोंड फिरवितो व त्याच्या अंगावर थुंकूं लागतो. याच्या थुंकींत एक प्रकारचें विष असतें व त्याला वाईट वासहि असतो; त्यामुळें माल-

काची त्रेधा उडते व त्याला त्या प्राण्याला सोडून दूर जावें लागतें. ही संधि साधून हा प्राणी आपल्या अंगावरील ओझें खालीं टाकतो. ”

“ आमच्या वर्गात एक असाच द्वाड मुलगा आहे. त्याचें कुणाशीं भांडण झालें आणि कोणी त्याला धरून ठेविलें कीं तो असाच ज्याच्या त्याच्या अंगावर थुंकूं लागतो व आपली सुटका करून घेतो ” वसंत म्हणाला. “ तसाच हा प्राणी दिसतो आहे मग ! ”

“ हा कोणता प्राणी ? याचीहि मान उंटासारखी उंच दिसते; आणि अंग मात्र मेंढ्याप्रमाणें भरगच्च केसांनीं आच्छादिलेलें आहे ” शरद् म्हणाली.

“ हा प्राणी ‘ **अल्पाका** ’ होय. हा प्राणी अँडीज् पर्वतांतील



**अल्पाका.**

१४००० ते १६००० उंचीच्या पहाडांवर आढळतो. नव्हे, यांचे तेथें मोठाले कळप पाळतात. यांचे केस फार तकतकीत असतात. आपल्या वसंताचा कोट याच कापडाचा आहे. यांच्या केसांचीं ऊबदार पांघरुणेंहि करितात. यांचे केस पांढऱ्या किंवा काळ्या रंगाचे असतात; व याहि प्राण्याला ‘ **लामा** ’ प्रमाणेंच थुंकण्याची खोडी आहे. ”

" या खंडांतील प्राण्यांत ही एक विचित्र खोडच दिसते म्हणा-वयाची ! " रमाबाई विस्मयपूर्वक म्हणाल्या.

" होय, याच वर्गातले हे दुसरे दोन प्राणी पहा. हा '**व्हिकुना**' आणि हा '**ग्वानाको**.' यांनाहि अशीच वाईट खोड आहे. "

" पण अण्णा, हा '**ग्वानाको**' प्राणी फारच उमदा दिसतो हो ! " वसंत म्हणाला. " या प्राण्यांत एक प्रकारचें सौंदर्य आहे नाहीं ? "

" खरंच, त्याचे सर्व भाग अगदीं रेखीव दिसतात पहा. " रमाबाई म्हणाल्या. " त्याची ती बाकदार व सुरेखशी मान आणि हरिणासारखे बारीक पाय आणि डोळे तरी किती सुंदर, गरगरीत वाटोळे, आणि तेजस्वी दिसताहेत ? हरिणाचीच जात का ही ? अंगावर सगळीकडेच कसे लांब व तुळतुळीत केस दिसतात नाहीं ? "

" होय, कांहींसा हरिणाप्रमाणेंच हा प्राणी दिसतो खरा, याच्या अंगावर पिंगट रंगाचे लांब व तुळतुळीत केस असतात, मात्र पोटाखाली एकजात पांढरे केस असतात. याच्या केसाला फारच किंमत येते. याच्या मांसाचा खाण्याकडे व कातडीचा पांघ-रुणाकडे बराच उपयोग करितात."

" अशा सुंदर प्राण्यांचाहि संहार करण्यास हात कसा उचलतो न कळे " रमाबाई म्हणाल्या.

" या प्राण्यांचा इतका संहार करीत नाहींत. कारण यांच्या केसाची किंमत भारी म्हणजे भारीच येते " माधवराव म्हणाले. " यांच्याहि कांहीं गमतीदार आणि आश्चर्यकारक गोष्टी लक्ष्यांत ठेवण्यासारख्या आहेत. यांचें ओरडणें कांहींसें हरिणाच्या ओरडण्या-प्रमाणें तर कांहींसें घोड्याच्या खिंकाळण्यासारखें असतें. हे प्राणी समुद्रांतून खूप लांबवर पोहत जातात आणि तहान लागली कीं, तेथलेंच खारें पाणी पितात. "


" काय ? खारें पाणी पितात ! " शरद् एकदम उद्गारली.

" मग यांच्या पोटांत आग कशी नाहीं पडत ? " वसंत म्हणाला. " कारण अतिशय तहानेनें व्याकूळ झालेले खलाशी समुद्राचें पाणी प्यालयामुळें पुष्कळ वेळां मरण पावतात असें आमच्या शिक्षकांनीं एकदां सांगितलेलें मला आठवतें. "

" होय, तुझें म्हणणें बरोबर आहे. पण हा प्राणी खारें पाणी पिऊं शकतो हेंहि खरेंच " माधवराव म्हणाले. " आणखीहि एक विशेष विचित्र गोष्ट या प्राण्याची आहे. हा प्राणी नित्य एकाच ठिकाणीं जाऊन लेंड्या घालतो आणि काय असेल तें असो, हे प्राणी एकाच ठिकाणीं जाऊन मरतात ! "

" एकाच ठिकाणीं मरतात ! म्हणजे या प्राण्यांनीं कांहीं स्मशानभूमि आखून ठेविली असते वाटतें ? " रमाबाई फारच विस्मित होऊन म्हणाल्या.

" याच्याच जोडीचा हा दुसरा प्राणी व्हिकुना. " माधवराव म्हणाले. " हा मात्र कांहींसा लहान असतो. याचा बांधाहि नाजूक



व्हिकुना.

असून त्यावर नारिंगी रंगाचे अति मऊ केस असतात. याच्याहि केसाला चांगलीच किंमत येते."

"आणि अंगावर चिलखत घातलेला हा प्राणी कोणता ?" शरद् म्हणाली.

"खरोखर, चिलखतासारखेच याच्या पाठीवर पट्टे व खवले असून ते एकमेकांत गुंतविलेले दिसताहेत." वसंत म्हणाला. "जणूं कांहीं लढाईलाच निघाला आहे हा !"

"त्याच्या अंगावर सर्वत्र हाडांचा सांपळा असून तो आंतून व बाहेरून हाडांच्याच पट्ट्यांनीं मढविलेला असतो म्हणून त्याला हालचाल करण्यास अडचण पडत नाहीं." माधवराव म्हणाले.

"याचें नांव काय अण्णा ?" शरद् म्हणाली.


"यास '**आर्मांडिलो**' म्हणतात." माधवराव म्हणाले.

"म्हणजे याच्या अंगावर चिलखत म्हणजे आरमर असतें म्हणूनच कीं काय ?" वसंत म्हणाला.

"होय अगदीं बरोबर" माधवराव म्हणाले. "तसाच त्याचा अर्थ आहे खरा. हा प्राणी सर्वभक्षक आहे; पण हा रात्रीचाच बाहेर पडतो. याला थंडी-वाऱ्यापासून फार त्रास होतो, म्हणून हा जमिनींत बीळ करून राहतो आणि हा आपलें बीळ अत्यंत जलद म्हणजे हां हां म्हणता तयार करतो. शत्रूपासूनहि संरक्षण करण्याकडे या बिळाचा त्याला फार उपयोग होतो."

"हा शेवटला प्राणी **शहामृगा**सारखाच दिसतो आहे ना ?" शरद् म्हणाली

"शेवटला कसला ? या पुस्तकांतला शेवटला. असे आणखी हजारों नव्हे लाखों प्राणी आहेत, पण ते पाहणेंहि सध्यां तरी आपल्याला शक्य नाहीं !" माधवराव म्हणाले "प्रत्येक स्वाभाविक वनस्पतींच्या पट्ट्यांतले व प्रत्येक खंडांतले मुख्य मुख्य तेवढेच



ऱ्ही.

प्राणी आपण पाहिले आहेत. हा प्राणी द० अमेरिकेंतील शहामृग. याला ' ऱ्ही ' म्हणतात. मात्र शहामृग आणि याच्यांत बऱ्याच गोष्टींत फरकहि आहे. ''

" काय याला ऱ्ही म्हणतात ? " वसंत म्हणाला. " ॐ ऱ्हां ऱ्हा ऱ्हुं या मंत्रांतील दुसरें अक्षरच म्हणावयाचें ? "

" पण **शहामृगा**पेक्षां याचे पंख पुष्कळ वाढलेले दिसत आहेत. आणि याच्या पायाला तीन तीन बोटें आहेत वाटतं ? " शरद् म्हणाली.

" याच्या मानेवर आणि डोक्यावरहि पिसें आहेत वाटतं ? " रमाबाई आपल्याहि लक्ष्यांत कांही गोष्टी येतात हें दाखविण्याकरितां म्हणाल्या.

" या प्राण्याला लहानशी का होईना पण शेंपूट आहे. " शरद् म्हणाली.

" मात्र एकदम दिसावयाला हा **शहामृगा**सारखाच वाटतो " माधवराव म्हणाले. " तसेंच **शहामृग** ज्याप्रमाणें **हरीण** किंवा **झीब्रा** यांच्या कळपांत राहतो, त्याचप्रमाणें हाहि **ग्वानाको**, **व्हिकुना** व **हरीण** यांच्या कळपांत राहतो. याच्याहि पिसांना फारच किंमत येते. "

" अण्णा, या पुस्तकांतील सगळीं चित्रें संपलीं वाटतें ? आज सतत सात-आठ दिवस आमचे फारच मजेंत गेले. अशीं आणखी कांहीं पुस्तकें आहेत का हो अण्णा ? " शरद् म्हणाली.

" मोठ्या मजेंतच कां म्हणतेस ? आपल्याला किती तरी भूगोलाची सुद्धां उपयुक्त व मनोरंजक अशी माहिती मिळाली " वसंत म्हणाला. " **विषुववृत्तापासून ध्रुवबिंदूपर्यंत** कोणत्या खंडांत कोणत्या प्रकारचे प्रदेश आहेत ? पाऊस कुठें किती पडतो ? नद्यांचें जाळें कसें निर्माण होतें ? त्यामुळें तेथें वनस्पति कोणत्या वाढतात ? वाढतात कीं नाहींत ? वाढल्या तर त्या कितपत वाढतात ? म्हणजे झाडें खुरटीं असतात कीं आकाशाला भिडण्याइतकी उंच असतात ? त्यांना दाभणासारखीं निरुंद व बोथट पानें असतात कीं कढईएवढीं रुंद आणि जाड अशीं असतात, कीं केवळ त्या प्रदेशांतून गवतच वाढतें, कीं मुळीं कांहीं उगवतच नाहीं ? हें सर्व आपल्याला सहज

काढलें आहे. त्याचप्रमाणें निरनिराळ्या पट्ट्यांत जे जे मुख्य मुख्य प्राणी वावरतात त्यांच्याबद्दल तर अगदीं भरपूर माहिती आपल्याला मिळाली आहे. आणि त्यांचा मनुष्यांना काय उपयोग होतो हेंहि अण्णांनीं आपल्याला ओघानेंच नीट समजावून दिलें आहे. मला तर हें पुस्तक पाहतांना खरोखर अतिशयच आनंद होत होता आणि आतां तें संपलें म्हणून मनापासून वाईटहि वाटत आहे. ''

'' शाबास वसंत ! उपसंहार करण्याचें माझें काम तूंच केलेंस, याबद्दल मला अंतःकरणापासून अतिशय आनंद होत आहे आणि तुझें कौतुक करावेंसें वाटतें; कारण खरोखरच तें तूं थोडक्यांत आणि सुंदर शब्दांत केलें आहेस.'' माधवरावांना मनापासून आनंद झाला होता. त्यांनी वसंताची पाठ प्रेमानेंच थोपटली आणि म्हटलें, '' मीं हें पुस्तक आणिल्याचें आज खरें खरें सार्थक झालें. ''

'' आम्हां बायकांना सुद्धां किती तरी नवीन नवीन माहिती मिळाली. असें शिक्षण खरोखरीच जर शाळांतून मिळालें तर पुढची पिढी ( मुलगे आणि मुली सुद्धां ) खात्रीनें जास्त शहाणी होईल असें माझेंहि मत या आठ दिवसांत झालें आहे.'' रमाबाई थोड्याशा गांभीर्यानें आणि मार्मिकतेनेंहि म्हणाल्या.

'' खरोखरच, आपल्या मराठी वाङ्मयांत अशीं पुस्तकें अलीकडे निर्माण होऊं लागलीं आहेत हें महाराष्ट्राचें सुचिन्हच होय. या पुस्तकापासून आपणा सर्वांनाच आनंद झाला, करमणूक झाली व आपल्या ज्ञानांत भरहि पडली, हें तर खरेंच. यापुढें असेंच दुसरें एक पुस्तक वनस्पतींसंबंधीं आहे; तें पुढें मागें केव्हां तरी असेंच मी तुम्हांस दाखवून त्याची माहिती देणार आहे. तेंहि कांहीं कमी महत्त्वाचें नाहीं. '' माधवराव प्रसन्न मुद्रेनें म्हणाले.

'' असें झाल्यास फारच उत्तम. '' सर्वच आनंदानें उद्गारलीं.

[ समाप्त. ]